विषय ...शिवाजी...
सं. क्र. 2814

सदाफुली

सुहासिनी मुकणीवकर



REFBK-0023290

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २८८५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

9/9/87
15 NOV 1981
22 NOV 1981
20 DEC 1981
10 JAN 1982
17 JAN 1982
21 FEB 1982
28 APR 1982
18 JUL 1982
1 AUG 1982
1 SEP 1982
1 SEP 1983
23 NOV 1983
14 OCT 1984
28 AP
4 H
8 APR 1985
10 NOV 1985
24 NOV 1985
(क्र. मा. प.)
22 JAN 1986
18 MAR 1992


सदभे
निबंध
२८८५
23290
गणेश



सदाफुली

सुहासिनी मुळगावकर

REFBK-0023290




प्रकाशक :
राजा फडणीस
श्री विशाखा प्रकाशन
५८ शनवार, पुणे ३०.
मुद्रक :
सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ, पुणे ३०.
प्रथमावृत्ती : १४ ऑगस्ट १९८१
© सुहासिनी मुळगांवकर, मुंबई.
मुखपृष्ठ, आतील चित्रे व मांडणी : सुभाष अवचट
मूल्य : पंचवीस रुपये

श्री विशाखा
प्रकाशन



मलाही एक सदाफुली
भेटली होती.
अकालीच ती
नाहीशी झाली.
पण माझ्या मनात
एक बारमास प्रसन्न वृत्ती
रुजवून गेली.
त्या माझ्या मैत्रिणीला...
शशी सुळेला...



मनोगत


अक्षरं जुळवून, त्यांची वाक्यं गुंफून, ती कागदावर उतरवून, त्यातून माझ्या भावना व्यक्त करण्याअगोदर सूर आणि अभिनय या दोन माध्यमांतून मी त्या व्यक्त केल्या होत्या. पण हे जग, हे जगणं, हे असणं मला इतकं आवडतं की माझ्या सर्वस्वातून ते बाहेर फुटू पाहतं. कधी त्याची लकेर होते. कधी नाट्य होतं. कधी कागदावरचं वाक्य होतं. माझा अनुभव दुसऱ्या कुणाला तरी सांगितल्याशिवाय माझ्यापुरता तरी तो पूर्ण होत नाही. या जीवसृष्टीतला चैतन्याचा प्रत्येक कण मला जाणवल्यानंतर तो कुणापर्यंत तरी पोहोचल्याशिवाय मला चैन पडत नाही. म्हणून मी गाते. अभिनय करते. लेखन करते. विश्वाच्या या पसाऱ्यातील निर्मितीचा आनंद घेत जगते.

फार पूर्वी चं. वि बावडेकरांनी आलमगीरसाठी माझ्याकडून लिहवून घेतलं. दर आठवड्याला लेखन मी तेव्हाच प्रथम केलं. ' अंबतीभंबती 'नामक एक सदर लिहिलं. मग शिरीष पै यांच्या सांगण्यावरून मराठ्यात ' मयूरपंख ' लिहिलं. तेही आठवड्याला एक याप्रमाणे दोन वर्षं. आता माधव गडकरी यांच्या प्रेरणेनं मुंबई रविवार-सकाळमधून ही ' सदाफुली '.

कोळशाच्या काळ्याकुट्ट गोदामातून अंगभर काळं
लागलेला एखादा इसम बाहेर यावा आणि त्याच्या
डोळ्यासमोरून इवलंसं सुरंगी ठिपकेबहाद्दर फुलपाखरू
उडत जावं. त्या इसमाला क्षणभर का होईना जसं
लख्ख् वाटेल. चिंता, काळजी, व्यथा यांचं गाठोडं
प्रत्येकाच्या खांद्यावर आहेच. 'सदाफुली'तून फक्त थेंडी
खळखळ, थोडी लखलख, थोडी चमचम टाकायची
असंच ठरवलं. गेली दोन वर्षे दर आठवड्याला
टाकलेल्या एकेक ठिपक्यांची आज एक सलग रांगोळी
झाली आहे. 'सदाफुली'चं पुस्तक बनलं आहे.

ते ज्या राजाभाऊ फडणीसांनी बनवलं, त्यांची हिंमत
खरीच मोठी. नाटक गाण्यातली बाई लिहिणार काय असं
न मानता, सदाफुलीचा एक गुच्छ बांधायला ते सरसावले.
सुभाष अवचट स्वतः बहुगुणी. सीमेचे चोखंदळ.
त्यांनी सदाफुलीला रंगरूप दिलं. मला लिहितं
करणाऱ्यांमधे — कदाचित् विश्वास नाही बसणार —
फार मोठा वाटा आहे विजय तेंडुलकरांचा. प्रास्ताविकातील
त्यांचे स्पष्ट विचार म्हणूनच मला फार मोलाचे वाटतात.
या सर्वांच्या विश्वासाचं, स्नेह्यासोबत्यांच्या सदिच्छेचं
खतपाणी 'सदाफुली'ला लाभलं आहे.
निर्गंधी म्हणून तिचा अव्हेर करायचा की बारमास
आनंद प्रसवते म्हणून तिचा स्वीकार करायचा
हे आता वाचकच ठरवतील.

सुहासिनी मुळगांवकर
४ ऑगस्ट १९८१
३६ जलदर्शन,
नेपियन् सी रोड,
मुंबई ४०००३६



मनोगत


अक्षरं जुळवून, त्यांची वाक्यं गुंफून, ती कागदावर उतरवून, त्यातून माझ्या भावना व्यक्त करण्याअगोदर सूर आणि अभिनय या दोन माध्यमांतून मी त्या व्यक्त केल्या होत्या. पण हे जग, हे जगणं, हे असणं मला इतकं आवडतं की माझ्या सर्वस्वातून ते बाहेर फुटू पाहतं. कधी त्याची लकेर होते. कधी नाट्य होतं. कधी कागदावरचं वाक्य होतं. माझा अनुभव दुसऱ्या कुणाला तरी सांगितल्याशिवाय माझ्यापुरता तरी तो पूर्ण होत नाही. या जीवसृष्टीतला चैतन्याचा प्रत्येक कण मला जाणवल्यानंतर तो कुणापर्यंत तरी पोहोचल्याशिवाय मला चैन पडत नाही. म्हणून मी गाते. अभिनय करते. लेखन करते. विश्वाच्या या पसाऱ्यातील निर्मितीचा आनंद घेत जगते.

फार पूर्वी चं. वि बावडेकरांनी आलमगीरसाठी माझ्याकडून लिहवून घेतलं. दर आठवड्याला लेखन मी तेव्हाच प्रथम केलं. ' अंबतीभंबती 'नामक एक सदर लिहिलं. मग शिरीष पै यांच्या सांगण्यावरून मराठ्यात ' मयूरपंख ' लिहिलं. तेही आठवड्याला एक याप्रमाणे दोन वर्षं. आता माधव गडकरी यांच्या प्रेरणेनं मुंबई रविवार-सकाळमधून ही ' सदाफुली '.

कोळशाच्या काळ्याकुट्ट गोदामातून अंगभर काळं
लागलेला एखादा इसम बाहेर यावा आणि त्याच्या
ओळ्यासमोरून इवलंसं सुरंगी ठिपकेबहाद्दर फुलपाखरू
उडत जावं. त्या इसमाला क्षणभर का होईना जसं
लख्ख् वाटेल. चिंता, काळजी, व्यथा यांचं गाठोडं
प्रत्येकाच्या खांद्यावर आहेच. 'सदाफुली 'तून फक्त थेंडी
खळखळ, थोडी लखलख, थोडी चमचम टाकायची
असंच ठरवलं. गेली दोन वर्षे दर आठवड्याला
टाकलेल्या एकेक ठिपक्यांची आज एक सलग रांगोळी
झाली आहे. 'सदाफुली 'चं पुस्तक बनलं आहे.

ते ज्या राजाभाऊ फडणीसांनी बनवलं, त्यांची हिंमत
खरीच मोठी. नाटक गाण्यातली बाई लिहिणार काय असं
न मानता, सदाफुलीचा एक गुच्छ बांधायला ते सरसावले.
सुभाष अवचट स्वतः बहुगुणी. सीमेचे चोखंदळ.
त्यांनी सदाफुलीला रंगरूप दिल. मला लिहितं
करणाऱ्यांमधे — कदाचित् विश्वास नाही बसणार —
फार मोठा वाटा आहे विजय तेंडुलकरांचा. प्रास्ताविकातील
त्यांचे स्पष्ट विचार म्हणूनच मला फार मोलाचे वाटतात.
या सर्वांच्या विश्वासाचं, स्नेह्यासोबत्यांच्या सदिच्छेचं
खतपाणी 'सदाफुली 'ला लाभलं आहे.
निर्गंधी म्हणून तिचा अव्हेर करायचा की बारमास
आनंद प्रसवते म्हणून तिचा स्वीकार करायचा
हे आता वाचकच ठरवतील.

सुहासिनी मुळगांवकर
४ ऑगस्ट १९८१
३६ जलदर्शन,
नेपियन् सी रोड,
मुंबई ४०००३६



प्रास्ताविक

वर्तमान-पत्रातले ललित लेखन आता मराठीत पुष्कळ होऊ लागले आहे. किंवा वाटल्यास असे म्हणावे की ललित लेखन मराठी वृत्तपत्रे नियमाने छापू लागली आहेत.

या प्रकारचे लेखन साहित्यात जमा करायचे की वृत्तपत्रीय लेखनात असा प्रश्न या संदर्भात निर्माण होऊ शकतो. मराठीतल्या ललित लेखनाचे साहित्यिक आढावे घेताना या प्रकारचे लेखन वगळले जाते असा अनुभव आहे, हे लेखन पुस्तकरूपाने उपलब्ध नसल्याने त्याचा असा विचार होऊ शकत नाही असेही म्हणता येणार नाही; कारण यातले काही यापूर्वी संग्रहांच्या स्वरूपात प्रसिद्ध झाले आहे आणि ही पुस्तके उपलब्ध आहेत. तरीही ते अशा आढाव्यांमध्ये बाजूला ठेवले जाते याचा अर्थ एकच असू शकतो; ते 'साहित्य' नव्हे असे निदान काही समीक्षकांना वाटते.


एक तर ते अशा ठिकाणी प्रथम छापले जाते, जिथला मजकूर सकाळी सातला वाचून आठला विसरायचा असतो. अगदी रविवारचा अंक म्हटला तरी सोमवारी तो रद्दीत गेलेला असतो. दुसरे, अशा ललित लेखनाचे विषयही कित्येकदा नैमित्तिक आणि तात्पुरते असतात. दसरा आला की सीमोल्लंघन, गणेशचतुर्थी आली की गणपतीबाप्पा मोरया; नाहीतर पुढल्या वर्षी लौकर या, दिवाळी आली की आकाशदिवे, फुलबाज्या आणि ओवाळणी,

शिमगा आला की होळी, पावसाळा आला की 'सावन घन अव्यो', उन्हाळा आला की वसंतागमन, हिवाळा येताच पाचोळा आणि पानगळ, असे निमित्ताला टेकून केल्यासारखे एका परीने 'जो हुकूम' लेखन या प्रांतात पुष्कळ घडते.

या प्रकारच्या लेखनावरची बंधनेही स्पष्ट आहेत. वर्तमानपत्री रुक्ष धबडग्यात त्याने लक्ष वेधून घेतले पाहिजे आणि वाचनीय ठरले पाहिजे. यासाठी त्याने जरा जास्तच अनौपचारिक आणि नाट्यपूर्ण असायला हवे. सोपे आणि आकर्षक दिसायला हवे. चतुर आणि चटपटीत राहायला हवे पुन्हा या प्रयत्नात अगदीच हलके वाटूनही चालत नाही, थोडे वजन हवेच; त्यासाठी तत्त्वचिंतकाचा मुखवटा चढवला पाहिजे, काहीतरी 'बोध' वाचकाला घडवला पाहिजे. असे लेखन नैमित्तिक स्वरूपात करणाऱ्यांना खऱ्या-खोट्या स्फूर्तीची वाट पाहता येते, काही काळ न लिहिले तरी चालते. परंतु स्तंभलेखन म्हणून हे लेखन करणाऱ्यांना ही सूट नसते. त्यांना एका अर्थाने अशा लेखनाचा 'रतीब' घालावा लागतो स्फूर्ती नसली तरी मानेवर दगड ठेवून लिहावेच लागते. विषय न सुचला तर तो खणून काढावा लागतो, तो नैसर्गिकपणे फुलत नसला तर सक्तीने फुलवावा लागतो. अतिशय अ-प्रसन्न वाटत असले तरी प्रसन्न भाषाशैली वेठीला धरावी लागते अशा वेळी हे प्रयास चाणाक्ष वाचकाला तेव्हाच जाणवतात. परंतु सर्वसामान्य वाचक मात्र रोजच्या किंवा दर रविवारच्या सवयीने हाही मजकूर मटकावतो आणि ढेकरदेखील देताना ऐकू येतो.

व्यावसायिक रंगभूमीवरच्या नटाला रोज रात्री अगदी रिकाम्या किंवा मख्ख प्रेक्षागृहासमोरदेखील मनःपूर्वकतेचा आव आणून हसावे, गहिवरावे आणि रडावे लागते. आज जमत नाही ही सबब चालत नाही. चुकारपणाला क्षमा नाही. तसे स्तंभलेखकाला नियमितपणे आणि ठरल्यावेळी लिहावेच लागते. वर्तमानपत्रात नोकरी करीत नसला तरी तो स्तंभलेखक म्हणून 'व्यावसायिक' असतो. सर्वांना हे सक्तीने वा आर्थिक गरजेपोटी करावे लागते असे नाही काहीजण ही जबाबदारी मोठ्या हौसेने पत्करतात. सुहासिनी मुळगांवकर या काहींपैकी आहेत. त्यांना व्यवसाय म्हणून त्यांचे टेलिव्हिजनचे क्षेत्र वर्तमानपत्राइतकेच धबडग्याचे आहे. हौस म्हणून संगीत आणि नाट्याचा नाद त्यांच्याकडे आहे. याउप्पर लेखनाचीही हौस कोणी बाळगू शकते. अनेक वर्षे अधूनमधून कथा, प्रवासवर्णने, ललित-लेख लिहून त्या ही हौस भागवीतही आल्या. परंतु एवढ्याने त्यांचे समाधान होत नसावे म्हणूनच की काय, त्यांनी नियमित स्तंभ-लेखनाचे 'व्रत' घेतले आणि अजून त्या ते निष्ठेने चालवीत आहेत.

या संग्रहात त्यांच्या अशा लेखनातले वेचीव लेखन एकत्र केले आहे.



प्रास्ताविक

वर्तमान-पत्रातले ललित लेखन आता मराठीत पुष्कळ होऊ लागले आहे. किंवा वाटल्यास असे म्हणावे की ललित लेखन मराठी वृत्तपत्रे नियमाने छापू लागली आहेत.

या प्रकारचे लेखन साहित्यात जमा करायचे की वृत्तपत्रीय लेखनात असा प्रश्न या संदर्भात निर्माण होऊ शकतो. मराठीतल्या ललित लेखनाचे साहित्यिक आढावे घेताना या प्रकारचे लेखन वगळले जाते असा अनुभव आहे, हे लेखन पुस्तकरूपाने उपलब्ध नसल्याने त्याचा असा विचार होऊ शकत नाही असेही म्हणता येणार नाही; कारण यातले काही यापूर्वी संग्रहांच्या स्वरूपात प्रसिद्ध झाले आहे आणि ही पुस्तके उपलब्ध आहेत. तरीही ते अशा आढाव्यांमध्ये बाजूला ठेवले जाते याचा अर्थ एकच असू शकतो; ते 'साहित्य' नव्हे असे निदान काही समीक्षकांना वाटते.

एक तर ते अशा ठिकाणी प्रथम छापले जाते, जिथला मजकूर सकाळी सातला वाचून आठला विसरायचा असतो. अगदी रविवारचा अंक म्हटला तरी सोमवारी तो रद्दीत गेलेला असतो. दुसरे, अशा ललित लेखनाचे विषयही कित्येकदा नैमित्तिक आणि तात्पुरते असतात. दसरा आला की सीमोल्लंघन, गणेशचतुर्थी आली की गणपतीबाप्पा मोरया; नाहीतर पुढल्या वर्षी लौकर या, दिवाळी आली की आकाशदिवे, फुलबाज्या आणि ओवाळणी,

शिमगा आला की होळी, पावसाळा आला की 'सावन घन अव्यो', उन्हाळा आला की वसंतागमन, हिवाळा येताच पाचोळा आणि पानगळ, असे निमित्ताला टेकून केल्यासारखे एका परीने 'जो हुकूम' लेखन या प्रांतात पुष्कळ घडते.

या प्रकारच्या लेखनावरची बंधनेही स्पष्ट आहेत. वर्तमानपत्री रुक्ष धबडग्यात त्याने लक्ष वेधून घेतले पाहिजे आणि वाचनीय ठरले पाहिजे. यासाठी त्याने जरा जास्तच अनौपचारिक आणि नाट्यपूर्ण असायला हवे. सोपे आणि आकर्षक दिसायला हवे. चतुर आणि चटपटीत राहायला हवे पुन्हा या प्रयत्नात अगदीच हलके वाटूनही चालत नाही, थोडे वजन हवेच; त्यासाठी तत्त्वचिंतकाचा मुखवटा चढवला पाहिजे, काहीतरी 'बोध' वाचकाला घडवला पाहिजे. असे लेखन नैमित्तिक स्वरूपात करणाऱ्यांना खऱ्या-खोट्या स्फूर्तीची वाट पाहता येते, काही काळ न लिहिले तरी चालते. परंतु स्तंभलेखन म्हणून हे लेखन करणाऱ्यांना ही सूट नसते. त्यांना एका अर्थाने अशा लेखनाचा 'रतीब' घालावा लागतो स्फूर्ती नसली तरी मानेवर दगड ठेवून लिहावेच लागते. विषय न सुचला तर तो खणून काढावा लागतो, तो नैसर्गिकपणे फुलत नसला तर सक्तीने फुलवावा लागतो. अतिशय अ-प्रसन्न वाटत असले तरी प्रसन्न भाषाशैली वेठीला धरावी लागते अशा वेळी हे प्रयास चाणाक्ष वाचकाला तेव्हाच जाणवतात. परंतु सर्वसामान्य वाचक मात्र रोजच्या किंवा दर रविवारच्या सवयीने हाही मजकूर मटकावतो आणि ढेकरदेखील देताना ऐकू येतो.

व्यावसायिक रंगभूमीवरच्या नटाला रोज रात्री अगदी रिकाम्या किंवा मख्ख प्रेक्षागृहासमोरदेखील मनःपूर्वकतेचा आव आणून हसावे, गहिवरावे आणि रडावे लागते. आज जमत नाही ही सबब चालत नाही. चुकारपणाला क्षमा नाही. तसे स्तंभलेखकाला नियमितपणे आणि ठरल्यावेळी लिहावेच लागते. वर्तमानपत्रात नोकरी करीत नसला तरी तो स्तंभलेखक म्हणून 'व्यावसायिक' असतो. सर्वांना हे सक्तीने वा आर्थिक गरजेपोटी करावे लागते असे नाही काहीजण ही जबाबदारी मोठ्या हौसेने पत्करतात. सुहासिनी मुळगांवकर या काहींपैकी आहेत. त्यांना व्यवसाय म्हणून त्यांचे टेलिव्हिजनचे क्षेत्र वर्तमानपत्राइतकेच धबडग्याचे आहे. हौस म्हणून संगीत आणि नाट्याचा नाद त्यांच्याकडे आहे. याउप्पर लेखनाचीही हौस कोणी बाळगू शकते. अनेक वर्षे अधूनमधून कथा, प्रवासवर्णने, ललित-लेख लिहून त्या ही हौस भागवीतही आल्या. परंतु एवढ्याने त्यांचे समाधान होत नसावे म्हणूनच की काय, त्यांनी नियमित स्तंभ-लेखनाचे 'व्रत' घेतले आणि अजून त्या ते निष्ठेने चालवीत आहेत.

या संग्रहात त्यांच्या अशा लेखनातले वेचीव लेखन एकत्र केले आहे.

या लेखनाचा साचा आरंभी वर्णन केलेल्या वर्तमानपत्री ललित लेखनाच्या रूढ साच्याहून तसा वेगळा नाही. काहीशी वेगळी आहे ती मनःपूर्वकता. इथला सौंदर्याचा सोस अंगचा आहे, कृतक नव्हे. इथला उल्हास स्वभावगत आहे, ओढून आणलेला नव्हे. इथली बहुश्रुतता एका परंपरेतली आहे, फॅशनेबल नाही. शाब्दिक श्लेषांविषयी इथे मूळचेच अनावर प्रेम आहे, लेखनाची गरज म्हणून ते टाकलेले नाहीत. इथले मऊ मुलायम अनुभव-विश्व काल्पनिक नव्हे. एका उच्च मध्यमवर्गीय स्त्रीने जगलेले आणि भोगलेले ते आहे. संगीत, नाट्य, अशा कलांविषयीचे या लेखनातले संदर्भ या माध्यमात काही तपश्चर्या केलेल्या मनाशी आलेले आहेत, ते तसे उपरे आणि तोंडी लावण्यापुरते नाहीत.

त्याचबरोबर हेही खरे की या मनःपूर्वक केलेल्या लेखनाला एक मोठी मर्यादा आहे. (विपुल लेखनात मर्यादा उघड होतातच.) साधारणतः एका सुखवस्तू आयुष्याच्या आणि त्या आयुष्याने दिलेल्या जाणिवेच्या बाहेर हे लेखन सरकत नाही या परीघा-बाहेरच्या वेगळ्या, अवघड आणि व्यापक विश्वात डोकावण्याचा प्रयत्नदेखील इथे भासत नाही. जगण्यातली गुंतागुंत जणू कधी जाणवलीच नसावी (असे सहसा घडत नाही;) इतके ते एका सोप्या आणि निर्व्याज समजुतीने केलेले वाटते. त्यातला बोध बहुशः एकपदरीच आहे.

परंतु जे या लेखनात नाहीच ते असावे अशी वृत्तपत्रीय ललित स्तंभ-लेखनातून अपेक्षाही असण्याचे कारण नाही. भावगीतात चांगल्या काव्याची अपेक्षा आपण कुठे करतो ? ते चांगल गीत असले पाहिजे. तसे हे चांगले वृत्तपत्रीय ललित स्तंभ-लेखन आहे. हलकेफुलके आहे, रंजक आहे, वाचता वाचता विसरता यावे इतके बिनगुंतागुंतीचे, ओघवते आणि निरुपद्रवी आहे. मानणाराला याच्या वाचनाने आल्हादही वाटेल.

चाणाक्षांना कोठे कोठे सायास जाणवले तर ते समजून घ्यावेत. गाता गळा कधी तरी खराब असतोच. दोष गायकाचा नसतो. ठरलेली बठक म्हणून गावेही लागते. अशा वेळी सुज्ञ श्रोत्यांनी समजून घ्यायचे असते.

आता, या संग्रहातले लेखन ' साहित्य ' की ' वृत्तपत्रीय लेखन ? ' वाचकाला हा प्रश्न पडणार नाही समीक्षकांना पडलाच तर त्याचे उत्तर ते ' वृत्तपत्रीय लेखन ' असे देण्याची शक्यता आहे. लेखिकेला या वादात रस असण्याचे कारण नाही.

लिहिणाराचा आनंद मुख्यतः लिहिण्यात असतो. निदान तसा तो असला पाहिजे.

विजय तेंडुलकर

१८ जुलै '८१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८५१
दा. क. २३२९०
निबंध
१७।५।१

१ ◇ ◇ 'मोहकमूर्ती' मोरया

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुन्दर उटि शेंदूराची
कंठि झळके माळ मुक्ताफळांची ।
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती
दर्शनमात्रे मनकामना पुरती ॥

आरती म्हणत म्हणत मी गजाननाच्या मूर्तीकडे पाहत होते. चौफेर खूप आरास होती. दोहोंबाजूला ऋद्धिसिद्धी उभ्या राहून चवऱ्या ढाळीत होत्या. गणपतीच्या बैठकीखालून उंदीर सारखे आतबाहेर पळत होते. तू होतोस गजाननाचं वाहन की मी होतो अशा अहमहमिकेने. पुढ्यात पाच मोठाले रव्याचे लाडू होते. त्या लाडवांवर देखील एक खटयाळ उंदीर बसून तुम्हा सर्वांदेखत बघा मी आत्ताच लाडू खाणार असं मिस्किलपणे सांगत होता. खाली भलामोठा कैलास पर्वताचा विस्तार होता. त्यातल्याच एका शिखराजवळ मस्तकी जटा, गंगा आणि चंद्रलेखा धारण करून शिवशंकर बसले होते. पण या खेपेस ते ध्यानस्थ नव्हते त्यांची नजर उत्सुक होती आणि खाली गिरक्या घेत नाचत असलेल्या मिछिणीच्या वेषातल्या पार्वतीकडे ते अनिमिष पाहत होते. आरास खूपच शोभिवंत होती. सरखतीच्या भोवताली, सुन्दर पिसारा फुलवून मोरांची जोडी नाचत होती. पृथ्वीसारखी सरस्वतीभोवती आणि स्वतःभोवती गिरक्या घेत घेत. चोहोबाजूंनी उमललेल्या, सहस्रदळी लाल कमळात लक्ष्मी उभी होती. एक देखणी हंसाची जोडी तिच्याभोवती पाण्यात अखंड फिरत होती. कृष्ण मधोमध उभा होता. आणि सात गवळणींनी त्याच्या-

भोवती गिरक्या मारीत मारीत फेर धरला होता. फुलं, पानं, वेली, कुंड्या, दिव्यांची तोरणं अशी सगळी बहारही होती.

पण एवढ्या सगळ्या पसाऱ्यांतूनही माझी नजर मात्र खिळली होती त्या दर्शनमात्रे मनकामना पुरवणाऱ्या गजमुखी देवावर.

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा
चंदनाची उटी कुंकुमकेशरा।
हिरेजडित मुकुट शोभतो बरा
रुणझुणती नूपुरे चरणी घागरिया॥

सर्वांगसुन्दर अशा ह्या मूर्तीकडे मी टक लावून पाहत होते. त्या गौरी-कुमाराला सगळे अलंकार कसे शोभून दिसत होते. त्याचं ते पितांबर, तो शेला, तो गळ्यातला कंठा, ह्या पायातल्या घागऱ्या, तो केशकलापाची शोभा दाखवणारा, मस्तकीचा नेटका मुकुट, हातातली कंकणं, सर्वांगावरच्या केशरचंदनाच्या मुद्रा, भाळीचा तिलक, काय राजस रूप दिसत होतं.

लंबोदर पीतांबर फणिवरवंदना
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना
दास रामाचा वाट पाहे सदना
संकटी पावावे,
निर्वाणी रक्षावे,
सुरवरवंदना–

आरती चाललेली होती आणि माझी नजर श्रीमूर्तीच्या डोळ्यांवर खिळली. ते डोळे किती बोलके होते. ते मला सांगत होते, तुझ्यावर माझी सदैव कृपापखरण असते. मात्र शुभकार्यातच हं. अशुभाचा विचार सुद्धा तुझ्या मनाला शिवू नये अशीही मी दक्षता घेतो. तू जगतेस ना ती फक्त तुझ्यासाठी नको जगू. जरा आजूबाजूला बघ कुणी चिंतेत असेल, अडचणीत असेल, दुःखात असेल तर त्याच्या मदतीला जा. मी संकटी त्यांनाच पावतो, की जे इतरांच्या संकटकाळी धावून जातात. मी सर्वांच्यावर माझी मयेची पाखर घालीत असतो. प्रसन्नता पसरीत असतो. आनंददान करीत असतो.

असं ती नजर मला सांगत होती. जसजसं मी ह्या डोळ्यांकडे बघत होते तसतसे ते डोळे माझ्याशी अधिकाधिक हितगुज करीत होते. बघता बघता

आमचा संवाद सुरू झाला. ते डोळे क्षणात हसत होते. क्षणात ममतेने बघत होते. क्षणात माझी विचारपूस करीत होते. क्षणात माझ्या मनातल्या शंकेचं निरसन करीत होते. खूप प्रसन्न होते. शांत होते. तेजस्वी होते. मला दृष्टी काढावीशीच वाटत नव्हती. सारखं या मूर्तीकडे बघत राहावं, सारखं या मूर्तीशी बोलत राहावं, सारखं तिच्यापासून नवीन काही शिकत राहावं, स्फूर्ती घेत राहावी, प्रेम घेत राहावं, आनंद घेत राहावा अशी ऊर्मी एकसारखी मनात उसळत होती.

आणि मला एक वाचलेली गोष्ट आठवली. इंग्लिशमध्ये आपण जेव्हा एखाद्या माणसाला चार्मिंग पर्सन म्हणतो, तेव्हा त्याचा अर्थ काय असतो? तर चार्मिंग पर्सन् म्हणजे मोहक माणूस. असं माणूस सुज्ञ आणि विद्वान तर असतंच पण खूप प्रसन्न सतत असतं. स्मितमुखी असतं. आपल्या विद्वत्तेचं गांभीर्य कपाळावर आठ्यांच्या रूपानं न वागवता, आपल्या वागण्या-बोलण्याने ते दुसऱ्या माणसाच्या मनात आत्मविश्वास निर्माण करतं. त्याला आनंदित करतं. उल्हसित करतं. कठीण गोष्टी अशा सोप्या आणि सुंदर करून सांगतं की जग नुसतंच वाईट नाही तर भलंही आहे, खरंही आहे, सुंदरही आहे असा विश्वास त्या दुसऱ्या माणसाच्या ठिकाणी उत्पन्न होतो. मोहक माणूस सतत आपल्याशी बोलत राहावं, त्याचा सहवास आपल्याला सतत घडावा आणि जमलंच तर थोडं त्याच्यासारखं आपल्यालाही होता यावं असं वाटत राहतं.

गजाननाच्या मंगलमूर्तीकडे पाहून मला अगदी अस्संच वाटलं. मी मनोमन म्हणत राहिले, 'जयदेव जयदेव जयमोहकमूर्ती, जयमोहकमूर्ती.....'

♣ ♣ ♣

२ ◇ छा रही है काली घटा

घडणाऱ्या प्रत्येक घटनेची एखादी खूण असते. आधी ती पटते आणि मग ती घटना घडते. आधी नूपुरं वाजतात, मग नर्तिका येते. आधी तंबोरा छेडतात, मग गाणं सुरू होतं. आधी बँडचा आवाज येतो, मग लग्नाची वरात येते. आधी तांबडं फुटतं, मग सूर्य उगवतो. आधी सावल्या लांबलांब होतात मग अंधार होतो. आधी पेपरवाला पेपराची सुरळी फेकतो, स्वयंपाकघरातून कपबशांची किणकिण कानी येते, मग सकाळ झाल्याचं समजतं. आधी घटा होते, मग पडदा वर जातो. आधी पत्रांची देवघेव होते, मगच प्रेम प्रकट होतं. आधी पालवी फुटते, मग वसंताचं साम्राज्य सुरू झाल्याचं समजतं.

अशीच परवा मी समुद्राकडे पाहत उभी होते. बघता बघता सूर्याचा डोळा मिटला. समोरची खिडकी थाडदिशी आपटली. काच फुटली नाही हे नशीब. इतके दिवस लाटा कशा मिटल्यासारख्याच उमलत होत्या. नाजुक, वेलांटीदार, आज्ञाधारक. पण आता बघते तर त्यांचा मोर्चाच निघाला होता. एकीपेक्षा दुसरी उंच. पहिली फुटून पाण्याशी एकजीव होईपर्यंत दुसरी कथाकलीमधल्या रावणासारखी फेस परजीत उभी जोडीला ढगांची पळापळ. ते कबऱ्याचे काळे कधी झाले समजलंच नाही. यांचा घेराव मोडून काढायला वारा सारखा त्यांच्यावर चाल करून. मग ढगांची पळापळ द्रौपदीच्या वस्त्रहरणप्रसंगाची आठवण झाली वाऱ्याने कितीतरी ढग पळवले माझ्या डोळ्यांसमोरून ते पळत-पळत, उडत-उडत खूप वेगाने सरकत, सरपटत नाहीसे होत होते. ढगांचा तो प्रवास एकशेवीस डिग्रीपर्यंत मान वळवून मी पाहत होते. उजवीकडे वळवलेल्या मानेच्या टप्प्याच्या बाहेर एकदा ते गेले की मी पुन्हा डावीकडे

मान वळवून पाही, तर पुन्हा तिकडून आणखी ढग धावत–पळत, आपली ढेरपोटं सांभाळत धावत येताना दिसत. वस्त्राखाली दुसरं वस्त्र. ढगामागोमाग दुसरे ढग.

त्या काळ्या कबऱ्या ढगांकडे पाहता पाहता एक अनामिक उत्सुकता मनात दाटू लागली. शाकुंतलातला कालिदासाने सांगितलेला एक अनुभव प्रत्यक्षच घेत होते.

रम्याणि वीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दान् पर्युत्सुकी भवति यत्सुखिनोऽपि जन्तुः।

सांगता येत नाही. असं का होतं. उरात हुरहुर का दाटते. मनात ऊर्मी का उसळतात. चित्तात संतोष का साठतो. काही तरी सुरेखसं दिसतं. काही तरी मधुर आवाज कानी पडतो आणि एरवी सुखात असलेले आपण अचानक बेचैन होतो.

ही कालीघटाच याला कारण. बेगम अख्तरची एक सुरेख गजल आठवली. ज्याच्यात असेच काळे बादल जमले आहेत, प्रियकराशिवाय प्रियतमा तडपते आहे, मुलुखगिरीवर गेलेला तिचा बेलमा आलेला नाही त्याला ही साद घालतेय. त्यातच विजांचा पडघम वाजतोय. कोमल पुकारतेय आणि विरहिणी म्हणतेय् —

छा रही काली घटा
जिया मोरा लहराये रे।

आमच्या सबंध वाङ्मयात आणि संगीतात या सावनकी रितुला भलतंच महत्त्व. जमीन आणि प्रियतमा दोघी बरसातीसाठी आसुसलेल्या. आंब्यावरून कोयल साद घालतेय. पपीहा पीयू पीय पुकारतोय. कंगवाला प्रियतमा गळ्याची शपथ घालून लवकर प्राणवल्लभाला माझ्याजवळ घेऊन ये म्हणून विनवतेय. काळे बादल आकाशात आणि प्रियकराच्या सुखरूपतेविषयीची काळी हुरहूर हिच्या हृदयात. धुळीचं वादळ उठलंय. आकाशदेवीनं ढगांचं काजळ घातलंय. विजा काळ्या शालूवर रुपेरी झीगकाम करताहेत. मातीचा वास साध्या सरळ जिवालाही उन्मत्त बनवतोय. वसुंधरेचं हे सावळं रूप, चराचरातून स्रवू लागलेला सृजनशक्तिरस, अनावर मृद्गंध सगळ्या सगळ्या खुणा पटताहेत.

पण तो आहे कुठे? इतक्यात बादल बिजलीची कडकडून टाळी वाजते आणि.... नाका-तोंडावर सपसपणारे पहिल्या पावसाचे थेंब पडायला लागतात.

खिडकी बंद न करताच, अंगावर ते शीतल थेंब घेत घेत मी गुणगुणत राहते—

छा रही काली घटा
जिया मोरा लहराये रे...

♣ ♣ ♣

३ ◇ जलधरसंघें नभ भरलें तें

पडघमाचा नाद ऐकून मध्यरात्रीच जाग आली. वाऱ्यानेही वेग घेतला होता. तसा वैशाखातही वारा छान वाहतो. आणि मुंबईसारख्या समुद्रकिनाऱ्यावरच्या शहरात उन्हाची तल्खी जरी दुपारी भासली, घामाच्या धारा वाहिल्या, अंग चिकचिकलं तरी जरा झाडाच्या सावलीला उभं राहिलं, पंख्याखाली बसलं, नुसतं बसस्टॉपच्या छताखाली जरी थांबलं, तरी कसं शीतल वाटतं. पण मध्यरात्रीचा हा वारा आज नुसताच वाहत नव्हता. बरोबर ओल्या मातीचा गंध वाहून आणीत होता. जगातली सगळी उत्तमोत्तम अत्तरं एका बाजूला आणि पहिल्या पावसाच्या मातीचा वास एका बाजूला यातून निवड करायला सांगितली तर मी हा मृद्‌गंधच घेईन. आमच्या भारतीय मनाला दोनच ऋतू मोह घालतात. एक वसंत आणि दुसरा वर्षा. तर असा मृद्‌गंधी वारा वाहतोय. ढगांचा पडघम वाजतोय. चांदीच्या तारांची नक्षी विणल्यासारख्या विजा चमकताहेत. अशा वेळी गादीवर काय पडून राहायचं ? म्हणून उठून खिडकीत आले. समोर समुद्राला उधाण आलं होतं. आपली मुलगी परीक्षेत पहिल्या पाचात यावी आणि आईला आनंदाच्या उकळ्या फुटाव्या तशा लाटा उसळत होत्या. रस्त्यावरचे दिवे तेवढे या सुंदर अद्‌भुतरम्यतेत एक उदास वास्तवाचा स्पर्श करीत होते. पावसामुळे होणारे बहुसंख्य फूटपाथवासियांचे हाल, विस्कळून जाणारी रेल्वे वाहतूक, भाजीपाल्याचा तुटवडा वगैरे सगळं त्या दिव्यांच्या उजेडात दिसत होतं. तरी मी नेट धरला. ती जादूमय प्रकाशयोजना केलेलं आभाळ, समुद्रावर, रस्त्यावर, समोर झाडाझुडुपांवर पडणारे पावसाचे थेंब, विजांच्या लखलख चंदेरी तेजाच्या न्याऱ्या दुनियेत दिसणाऱ्या मोत्यांच्या धारा, वाट पाहत असलेल्या माणसाला त्याचं आवडतं माणूस अगदी ठरल्या-

वेळी मेटावं, तसा सुवेळी आलेला तो पाऊस पाहता पाहता मी मनोमन हरखले. शरीराने फक्त मी खिडकीत उभी होते, पण माझं मन केव्हाच मेघदूत, ऋतुसंहार, रघुवंश, मृच्छकटिक अशा संस्कृत काव्यनाटकात रंगवलेल्या, काळ्यासावळ्या मेघांनी नितांत निळ्यासावळ्या रंगवलेल्या धारांच्या वर्षावात जाऊन नहात बसलं होतं.

मला त्या समुद्राच्या जागी नीलकमलांनी फुललेलं सुंदर सरोवर दिसत होतं. त्या निळ्या पाकळ्यांच्या कमळांवर घोंघावणारे काळे भुंगे पावसाळी निळ्या काळ्या मेघांसारखे दिसत होते. ते काळे निळे मेघ कधी हत्तीचा आकार घेत होते. पावसाचे थेंब म्हणजे मदोन्मत्त झालेल्या त्या हत्तीच्या गण्डस्थळांवरून वाहणारा उन्मादरस होत होते. रात्रराणीने काजळ घालावं आणि विजेच्या प्रकाशात ते बोटांनी डोळ्यांत काळजीपूर्वक रेखावं असा भास होत होता. त्या चमकणाऱ्या विजा, ते बदलणारे ढगांचे गडद निळे रंग, पिसारा फुलवून नाचणाऱ्या मयूरवृंदासारखे नजर खिळवून ठेवीत होते. कालिदासाच्या डोळ्यांनी मी बघत होते. त्या तशा पावसाळी मध्यरात्री, केवळ विजेच्याच प्रकाशात अंधुक अंधुक दिसणारी वाट, आकांताने तुडवीत आवाज होऊ नये म्हणून पायातले नूपुर हातात घेऊन, वस्त्राच्या फिक्या रंगामुळे ओळख पटू नये म्हणून शबल वस्त्रं पांघरलेली एखादी अभिसारिका कुठे दिसते का म्हणून न्याहाळत होते. सुन्दरीच्या मोकळ्या सोडलेल्या काळ्याभोर केशकलापात मोगरीच्या फुलांचे हार लटकावून दिल्यासारख्या त्या पांढऱ्याशुभ्र विजा आणि तो काळ्या ढगांचा विस्तार मला दिसत होता.

वैशाखी उन्हाने तप्त झालेली माती, या पहिल्या पावसाच्या धारांनी तृप्त होऊन सुगंधी निःश्वास सोडीत होती. आता पुढे चार महिने उमलणाऱ्या बकुळीच्या फुलांच्या नाजुक सुगंधाचा संदेश देत होती. चमेली, मदनबाण, चाफा हे येत्या पावसाळ्यात मनाची उदासी दूर करणार आहेत असा दिलासा देत होती. केवड्याचं कणीस गंधभार घेऊन येणार आहे त्याच्या स्वागताकरिता तयारीत राहा अशी उत्साही सूचना देत होती. काल-परवापर्यंत चंद्राच्या ज्योत्स्नेने सुसह्य वाटणारीही रात्र आज विजेच्या नक्षीदार मांडवात शोभणाऱ्या एखाद्या काळ्या कुळकुळीत आणि म्हणूनच मनस्वी लोभस दिसणाऱ्या एखाद्या रसरसलेल्या आदिवासी तरुणीसारखी देखणी वाटत होती.

मांडव गजबजणार आहे. मेघराज्यातले अजून खूप वऱ्हाडी जमायचे आहेत. श्रावणसरींची हळद नवरीला लागायची आहे. नगारे वाजायचे आहेत. हिरवे गालिचे पसरायचे आहेत. झरे, ओढे खळखळायचे आहेत. परिणामाची तमा न बाळगता नदी समुद्राकडे झेपावयाची आहे. अनंताची फुलं फुलून सुगंध दरवळायचा आहे. खरा पाऊस अजून यायचा आहे. पण नोम्थोमच इतकी वेळेवर सुरू झालीय की, पुढली मैफल रंगणारच असा विश्वास बाळगायला हरकत नाही. उसळणाऱ्या लाटा आणि लकाकणाऱ्या विजा पाहणारे माझे डोळे खिडकीतून दिसणाऱ्या दृश्यावर खिळून बसले होते.

मेघाला विजेचा वळसा म्हणजे वल्लभाला प्रियतमेनं दिलेला सहवास असं चारुदत्त वसंतसेनेला मृच्छकटिकात सांगतो. वैभवहीन चारुदत्ताचा तो प्रशस्त वाडा, त्याच्या गुणांवर लुब्ध होऊन, त्या काळ्याकभिन्न रात्री विजांची अस्त्रं सोडणाऱ्या ढगांच्या माऱ्याला भीक न घालता, अभिसारिकेसारखी आपल्या प्रियकराजवळ आलेली वसंतसेना आणि तिचीच वाट पाहत असलेला चारुदत्त, तिच्या अगदी निकट सान्निध्यात प्रफुल्लित होऊन म्हणतो आहे ते शब्द मला त्या ढगांच्या तालावर आणि सरींच्या सुरावर अगदी स्पष्ट ऐकू येत होते.

जलधरसंघें नभ भरलें तें....
शोभित झालें सौरभवातें....

♣ ♣ ♣

४ ◇ सावळाच रंग तुझा

दोहों बाजूंना डोंगराच्या याऽऽ बलिष्ठ रांगा. माथ्यावर हिरव्या. बाकी उज्जाड. नाही म्हणायला खुरट्या करवंदीच्या जाळ्या न् फुफाट झाडझाडोरा मधेमधे, लाज राखण्यापुरता नेसूंच्या धडोत्यासारखा. दोन दोन रांगांमध्ये जमिनीचा एक लांबचलांब पट्टा. रांगांच्याबरोबर तोही निमुळता होत गेलेला. त्या पट्ट्याच्या मधोमध महादेवाचं एक देऊळ. देवळाचा चौथरा तेवढा चोहों बाजूंच्या आंब्यालिंबांच्या झाडांनी हिरवाचार. बाकी जमीन वैराण. चौथऱ्याच्या मधोमध निळ्याशार धारेनं रंगवलेल्या, चुन्याच्या सफेतीचं देवळाचं गर्भागार आणि गर्भागाराच्या छपरावर, सोनेरी वर्ख देऊन लकाकणारा देवळाचा देखणा कळस. माध्यान्हीचा अंगार सूर्य कितीही घुसला असला डोळ्यांत, तरी त्याच डोळ्यांच्या फटीतनं बघूबघूसा वाटायचा देवळाचा चकमक कळस.

एकदा काय झालं...एकदम आठादिशीं चमत्कार. सूर्याचा भपका दिवसाच खल्लास. आभाळाचा तांबा ढगांनी घेतला. रंगसफेदीचा मुखडा उतरवून ठेवून मुळातच काळाकबरा रंग दाखवला. पिसाट वाऱ्याला सोबतीला बलिवलं. देवी अंगात आल्यागत, चांदीच्या सळ्या घेऊन, विजाबी आपसूक हजर झाल्या. घालाया लागल्या पिंगा. सर्वांनी मिळून घेवा वसणाला आवंतन धाडलं. कधी नव्हे ती पहिल्याच हाळीला घेवानं ओ दिली न लागल्या कोसळाया धारा आडव्या तिडव्या.

नदीनाले तुडुंब भरले. वढ्यांच्या बेडकांना कंठ फुटला. करंगळीएवढ्या बोटधारा फुफांडत धावाया लागल्या. गाडीवानांना वाट वाकडी करावी लागली. धबधबे उमेसोट कोसळाया लागलं. वय झालेल्या डोंगरांना हिरवी मिशी

फुटली. त्यांच्या कुशीतला तो लांबलचक जमिनीचा पट्टा पाण्यानं भरून गेला. गावकरी त्याला तलाव म्हणाया लागले. तलावाचं पाणी देवळाच्या चौथऱ्याशी शिळोप्याच्या गोष्टी बोलाया लागलं. पार पायऱ्यापर्यंत जाऊन ठेपलं–देवळाकडं आता व्हडीतनंच जाया व्होवं– गावकरी म्हनत. देवळाचा तो सोनेरी कळस सावळ्या आबाळाला कसला निरोप देतोय काय की. बघता बघता वाटलं, आपणही या सावळ्या ढगांबरोबर वरच्या निळ्याकाळ्या विठ्ठलाला, नीळकंठ महादेवाला, घननीळ श्रीरामाला नाही तर आपल्या सर्वांच्या लाडक्या श्रीकृष्णाला एक छानसा पावसाळी निरोप पाठवावा.... म्हणेतोवर तळ्यातल्या गार पाण्याच्या एका लाटेने माझं हे सगळं स्वप्न भिजवून टाकलं.

म्हणजे त्याचं काय झालं की तळ्यात पाय बुडवून, चुबुक चुबुक लाटा पायावर घेत, देवळाच्या कळसाकडे पाहत पाहत ही वरची गोष्ट मी रचली देऊळ ना? खरोखरीचंच आहे तळं ना? तेही खरं. पण फक्त पावसातच ते तळं असतं. एरवी जमिनीचा एक लांबलचक पट्टा. कुठे? फार लांब नाही काही. आपल्या लोणावळ्यात हो. भुशीच्या तलावाला जाताना वाटेत लागतं ना ते. दरवर्षी हा पावसाळी चमत्कार पाहून मी अशीच गुंगून जाते.

आणि प्रत्येक वर्षी अशीच चकित होऊन एकटक बघत बसते. म्हणजे लोणावळ्यात नुसतं संध्याकाळी फिरायला म्हणून तुंगारलीच्या तलावाची ती निरुपद्रवी चढण चढली तरी पाणी पाणी म्हणून शोष लागतो कंठाला. त्याच तुंगारलीच्या सबंध डोंगराला पार वळसा घातला तरी पाण्याची आटवण होत नाही जिमेला, असा हा लोणावळ्याचा मंथर पाऊस. वर्षानुवर्षांचं ओळखीचं माणूस, एखाद्या सौंदर्यप्रसाधन दालनात जाऊन, लावण्यस्नान घेऊन बाहेर येताना, अलौकिक दैदिप्यमान दिसावं तसं हे लोणावळं पावसाची आंघोळ झाल्यावर दिसतं. झरे काय नाजुक मुरडतात. ओढे काय खुषीत खळखळतात. धबधबे काय घरबंद सोडून कोसळतात. झाडे काय फ्रेश हिरवा मेकअप करतात. एरवीचा आपला ओळखीचा वाटाड्या दगड, आता उसळत्या प्रवाहाच्या मधोमध असल्याने पाणी माथ्यावर नसताना लककन् ओळखीचे काय हसतो; क्षणात पाण्यात ओळख काय लपवतो. ढगांशी ओळख व्हावी असं नुसतं

मनात येतं आणि काही क्षणातच ते स्वत:हून खाली येतात; गर्दीगर्दीनं आपल्याशी जवळीक साधतात आणि त्या लडिवाळ धुक्यात आपण पार हरवून जातो.

आम्हा दक्षिणेकडल्या लोकांना खरं म्हणजे दोनच ऋतू. उन्हाळा आणि पावसाळा. हिवाळा डोकावतो जरासा, पण उपऱ्यासारखा, लग्नाच्या पंक्तीत 'मड्डा'....'मड्डा'...'मड्डा' करत, न वाढता, नुसतंच अंगावर ओरडत जाणाऱ्या वाढप्यासारखा. हे सावळं आभाळ आणि तो सावळा घननीळ आपल्या भारतीय मनाला या दोन सावळ्यांचं फार मोठं आकर्षण आहे. हळदपिंजर, ताटवाटी, सूरसंगीत असं हे एक जुळं आहे. आमचं संगीत आणि आमचं साहित्य भरभरून सावळं आहे. आमचं आभाळ निळं झालं रे झालं की त्या आभाळात आमच्या राधेला तिचा सावळा वनमाळी दिसतो. आमच्या मीरेला तिचा सांवरो गिरिधारी दिसतो. आमच्या ठुमरीतली विरहिणी तिच्या सांवळ्या श्यामसुंदराशिवाय तरपत तरपत रात्र घालवते. आमची यशोदामाई तिच्या सांवळ्या माखनचोराला शोधायला धावते. आमच्या या अखिल पृथ्वीची गोकुळ, वृन्दावन, मथुरा, द्वारका होते. कि-येकदा वाटतं ही पावसकी रितू आणि हा सुंदर श्याम हमारा नसता तर आमच्या संगीतात आणि साहित्यात एक मोठी पोकळी निर्माण झाली असती.

काळ्या सावळ्या ढगांनी भरलेल्या या पावसाळी आकाशाकडे मी पाहते आणि ती पोकळी भरून आल्याचं सुख मला होतं. वाटतं हा सावळा रंग आमच्या तृप्तीचा आहे. आमच्या नित्यनूतन संसाराचा आहे. माझा आहे. माझ्या देशबांधवांचा आहे. हा आमचं एकमेकांचं जन्मोजन्मीचं नातं सांगणाऱ्या कृतज्ञतेचा आहे. हा आमचा, आमच्या मातीशी आणि आभाळाशी संगत जोडणारा दुवा आहे. हा आमच्या जीवस्वरूपात या विश्वाच्या प्रेमस्वरूपांनी मिळवून टाकणारा प्रीतिदूत आहे. आणि त्या प्रीतिदूताला प्रत्येक पावसाळ्यात मी अशीच साद घालत राहते – 'सावळाच रंग तुझा....'

♣ ♣ ♣

५ ◇ पंचरंगी चोला

मलबार हिलची चढण चढताना वाऱ्याच्या झुळुकीनं जरा घाईनच सांगितलं नाव. अग, अग, पण ही काय ओळख करून देण्याची रीत, वगैरे मी म्हणेपर्यंत झुळुक अंगावरून निघूनसुद्धा गेली. गंध तर येतच होता. विदेशी सुवासाचं वेडं आकर्षण असणारी कुणीतरी वैभवी वनिता तर नाही ना गेली बाजूने, म्हणून मी जरा आजूबाजूला मान फिरवली. नाही. तसंही कुणी नाही. मग हा मोहक गंध आला तरी कुठून ? आणि मघाशी ती अतिमंद वायुलहरी काय गुणगुणून गेली कानात...ओसं म्हणेम्हणेतोवर नजर मॅग्नोलियाच्या झाडांवर गेली आणि शुभ्र स्वच्छ फुलांच्या गुच्छांनी बहरलेल्या त्या झाडाला चिकटूनच बसली. झाड काहीतरी बोलायला लागलं असावं आणि वाक्यावाक्यागणिक कधी अर्धविराम, कधी उद्‌गारचिन्ह तर कधी प्रश्नचिन्ह अशी चिन्हं द्यायला हे शुभ्र फुलांचे गुच्छ डहाळीडहाळीवर उगवले असावेत. हीच, हीच चैत्रलक्ष्मीची सुगंधी ओळख मघा कानात सांगून गेली ती झुळुक. आता पटली खूण. मग काय आवतीभोवती भिरभिरतच चालायला लागले. ठेचकाळत होते, अंगठ्याला सणकून एकदा गोटा लागत होता. बाजूने जाणारा, सकाळीच घाईत असलेला, कोवळ्या उन्हाचीसुद्धा अधिक सलगी नको म्हणून भला मोठा काळा चष्मा डोळ्यांना लावलेला एखादा मोटारवाला मघेच अडमडणाऱ्या माझ्या सात पिढ्यांचा उद्धार मनातल्या मनात करीत जात होता. पण आता मी खाली बघणारच नव्हते. लालचुटूक पांगाऱ्याच्या शेंड्यावर बसलेले सातआठ कावळे, त्या लाल पांगाऱ्याची काळं टप असलेली पोस्टाची पेटी बनवीत होते सोळावं सरून नुकतंच सतरावं लागलेलं असावं आणि एवढ्या-तेवढ्याबरून गाल लाजून गुलाबी व्हावेत तशी

शिरीषाची झाडं नाजुक गुलाबी फुलांनी ओसंडत होती. चाफ्याची खंत केव्हाच संरली होती. त्यानेही पांढऱ्या फुलांतून मुक्त हास्याची उधळण लावली होती. पताकांनी नगर शृंगारायची कल्पना आपल्या पूर्वजांना बहुतेक पिंपळाच्या या फिकट गुलाबी, कुसुंबी, अंजिरी अशा पालवीच्या उधळणीनेच सुचली असावी. आठवड्याभरापूर्वी पार खंगलेल्या या पिंपळाने काय च्यवनप्राश वगैरे घेतलं की काय? उमदा दिसतोय. पिंपळपानांवरून तर दृष्टी हलेचना. आईचा ओचा गोटू जसा सोडतच नाही तसे माझे डोळे पिंपळाच्या त्या रेशीमबंधात पुरेपूर अडकले. रस्त्याच्या बाजूच्या एका जरा बसणीय दगडावर टेकून एकटक बघत राहिले त्या रातोरात, तारुण्याच्या उन्मादाने बहरलेल्या पिंपळवृक्षाकडे.

बघता बघता एक भाषेची गंमत आठवली. संस्कृत भाषेमध्ये व्याकरण आणि अलंकार या दोन शाखांचे विद्यार्थी होते म्हणे. त्यांना एकदा त्यांच्या गुरुजींनी सांगितलं : हे पाहा समोरचं झाड कसं सुकून खाक झालंय. करा बरं एका वाक्यात याचं वर्णन. गुरुजींचीच आज्ञा ती. ताबडतोब पालन केलं विद्यार्थ्यांनी. व्याकरणाचे विद्यार्थी म्हणजे वैयाकरणी. त्यांनी अगदी शुद्ध रुक्ष संस्कृतमध्ये रचलं वाक्य—

शुष्कः वृक्षः तिष्ठति अग्रे।

अलंकाराचे विद्यार्थी रसिक. भाषेच्या शुद्धते-बरोबरच रसाळपणाकडे त्यांचे लक्ष. त्यांनीही रचलं वाक्य —

नीरस तरूरिह विलसति पुरतः।

दोन्ही वाक्यांचा अर्थ तोच. पण एक कानाला कडकडीत लागतं तर दुसरं मृदुमधुर. मनात आलं. चैत्राच्या एखाद्या संध्याकाळी पाहिला असेल आलंकारिकांनी पानं झडलेला एखादा पिंपळवृक्ष. पण जादूची कांडी फिरवणारी एखादी रात्र मधे जाऊन दुसऱ्या दिवशी सकाळीच रेशीमपानांनी मढलेला हा असा पिंपळवृक्ष जर पाहिला असता त्या आलंकारिकांनी तर म्हटलं असतं —

रसमय तरुरिह विलसति पुरतः।

बाकी पानांच्या रंगांची शोभा बघावी शिशिराच्या सुरुवातीला कॅनडा सारख्या एखाद्या परदेशात. आपल्या काश्मिरी बांधवांचा चिनार वृक्ष जसा

एक अभिमानचिन्ह, तसंच या कनेडियन् लोकांचा मेपल वृक्ष. कॅनडाने तर त्याच्या राष्ट्रध्वजावरच जागा दिलीय् या मेपलच्या पानाला. ऑक्टोबरच्या सुरुवातीस ही मेपलची झाडं पूर्वीच्या आपल्या मराठी नाटकातून पुरुषांनी स्त्री-भूमिका केल्यासारखी देखणी दिसतात. एरवी हिरव्याचार पानांच्या शाली पांघरलेले हे वृक्षवर्य, त्याच पानांचा हिरवा रंग जाऊन त्याजागी अंजिरी, तांबूस, सोनसळी, कुसुंबी, जास्वंदी, गुलबाक्षी, राजवर्खी असे सप्तरंगी शालू लेवून रूपगर्वितांसारखे डौलात उभे राहतात. एकाच झाडात सातसात रंग. संगीतात असे काही राग आहेत. भंकार, भवसाग असे. ते ऐकताना क्षणात जीवनपुरीचा भास होतो, तर दुसऱ्या क्षणी आसावरी, आता तोडी तर नंतर देसी असं चत्तरवत्तर होऊन जातं. हां ऽऽ पटली ओळख. हा तर देसी. म्हणे म्हणेपर्यंत तो भटियार वाटायला लागतो. कॅनडामधली ती मेपल वृक्षराजी बघताना हे असं हरवायला झालं. झाडाचा डावा खालचा पर्णभार अंजिरी तर जरा वरती राजवर्खी, मध्ये गुलाबी तर उजव्या अंगाला सोनेरी. परीराज्यात गेल्यासारखं वाटलं. मोटारीमधून जाताना तर दोहों बाजूंनी ही अशी मेपलची खडी ताजीम. आपण कुणीतरी बडे परदेशी पाहुणे आहोत, दिल्लीच्या पालमपासून आपण उघड्या टपाच्या गाडीतून चाललो आहोत आणि दुतर्फा उभी असलेली जनता आपल्यावर रंगीबेरंगी गुलाल उधळतेय्.

बघत होते ल्या रंगरंगील्या शोभेकडे. आकंठ पीत होते ती सुरंगी वारुणी. वाहून जात होते रंगसागरात. लाटांवर लाटा फुटत होत्या रंगांच्या. इन् आँखोंका आलम गुलाबी झाला होता. अचानक मनाचा पक्षी उडाला. एक भरारी मारून राजस्थानात आला. मेपलच्या पानपिसाऱ्यांचे लाल-केशरी घागरे झाले. कुसुंबी-पिवळ्या ओढण्या झाल्या. घाणेरीच्या फुलांचे असेच लालपिवळे उत्साही रंग आठवले. डोईवर सोन्यासारखे चमचमणारे हंडे घेऊन रंगीबेरंगी घागरे चोळ्या लेवून आणि माथ्यावर लालचुटुक ओढणी ओढून पाण्याला निघालेल्या राजस्थानी राजसबाळ्या आठवल्या. मी गुणगुणायला लागले, "पंचरंग चोला पहिरी सखी मैं तो...."

♣ ♣ ♣

६ ◇ हाकेवरचा डोंगर

एखाद्या गावाला कुशीत घेऊन जेव्हा डोंगर उभे असतात तेव्हा ते अतिशय मायाळू दिसतात.

डोंगरावरचं धुकं ही एक अद्‌भुत चीज आहे. मात्र हे बघायला आपण त्याहीपेक्षा उंच अशा एखाद्या बाजूच्या डोंगरावर उभं असायला हवं. महाबळेश्वरला दिसतो हा नजारा. पहाटेची थंडी उठू देत नसावी. तरी स्वेटर चढवून कानटोपी घालून, मफलर गुंडाळून आपण निघावं. गवताझाडांवर रात्री पडलेल्या धुक्याचा दरवळ दोन्ही नाकपुड्यांनी आतपर्यंत साठवत कुठल्या कुठल्या अजनबी पक्षांच्या शिळा 'हे माझ्यास्तव, हे माझ्यास्तव' म्हणत एखाद्या पॉइंटला जाऊन थांबावं. समोर धुक्याचा समुद्र. आपल्या एकमेकांमधून देखील धुकं धक्का देतं. धुक्याला कधी वास असतो? पण या धुक्याला आहे. रानफुलांचा, गवताचा आणि दवाने ओलसर झालेल्या मातीचा. आता उघडेल पडदा, हे असंच असतं. आता सूर्य आला वर की पळेल धुकं वगैरे काहीबाही बोलत आपण आपले कुडकुडत हुडहुडत वेळ काढीत असतो. अचानक समोर इंद्रधनुष्य उमटतं. समोरच्या दगडी बांधावर कुणीतरी हिरेमाणकांची रास ओतल्यासारखी दिसायला लागते. धुकं निवळायला लागतं. बाजूचा एक डोंगरमाथा ओळख दाखवतो. धुकं आणखी पातळ होतं. दुसरा डोंगर मिस्किल हसत पडदा फेकून देतो. करता करता तिसऱ्या घंटेनंतरचा पडदा उघडतो. आणि फक्त गळ्याभोवती धुक्याचे गजरे माळलेले दहावीस डोंगर अरुणोदय झाल्याची ललकारी देत भेटायला येतात.

बाकी डोंगराच्या माथ्यावर जेव्हा बर्फाचा मुकुट येतो तेव्हा तो एखाद्या सम्राटासारखा दिसतो. म्हणून तर हिमालय नगाधिराज देवात्मा. या पृथ्वीचा

मानदंड. हिमालय म्हणजे सरकता रंगमंच. आधी साधे आपल्या सह्याद्रीसारखे हिरवेकाळे डोंगर. हळूहळू जशी उंची वाढत जाते तसतशी झाडं बदलतात. माती ठिसूळ होत जाते. आपल्या बाजूने हितगुज करीत वाहणारी नदी खूप खोल दिसायला लागते वारा बर्फाच्या शिखरांचा सांगावा घेऊन येतो. समोर बर्फाचे डोंगर दिसायला लागतात. असाच मग एखादा बद्रीनाथ, केदारनाथ, मुक्तीनाथ वर बर्फातल्या मंदिरात आपली वाट पाहत असतो. पांडव त्याला स्वर्गाची वाट विचारून गेलेले असतात. असंख्य ऋषिमुनींनी त्याच्या भेटीकरता वाटेतच देह टेवलेले. पूर्वजांच्या आठवणी घोळवीत आपणही कधीतरी सत्याचा शुभ्ररंग ब्रह्माचा माथ्यावर बागवीत असलेल्या हिमालयाला दंडवत घालायला पोहोचतो.

डोंगर मला खूप काही सांगतो. धीर देतो. घट्ट राहायला सांगतो. उंच व्हायचं आव्हान करतो. जुन्या माणसांच्या, देवादिकांच्या गोष्टी सांगतो. गिरिधारी कृष्णाने उचललेल्या गोवर्धनाबद्दल सांगतो. औषधी वनस्पतींच्या द्रोणागिरीबद्दल, हनुमानाबद्दल सांगतो. मग मला डोंगराचं आणि माणसाचं प्राचीन नातं पुन्हा एकदा नव्यानं उमगतं. त्याची ओढ लागते. त्याची हाक ऐकू येते आणि मला सहज जाता येण्यासारख्या असलेल्या माझ्या सह्याद्रीकडे मी पळत जाते.



७ ◇ 'अब का करि'

पौर्णिमेची रात्र होती चंद्र चांदीचा पण रात्र काजळाचीच. जसा माझा सैंया आणि जशी मी. रात्रभर घुंघटा दूर करून, बाई माझा चेहराच निरखीत राहिला. काळ्या रात्रीसारखा शार माझा चेहरा. चंद्राच्या डोळ्यांनी एवढं काय तरी न्याहाळून पहायचं? बरं पाहिलं ते पाहिलं. माझे प्राण कासावीस करून ठेवले ते ठेवले. आणि आता जायची परवानगी माझ्याजवळच मागतोय. आता माणसानं बोलावं तरी काय आणि सांगावं तरी कुणाला बाई! अब का करि!

शोभाबाई हे सगळं त्यांच्या त्या क्षणात गुजगोष्टी करणाऱ्या, क्षणात आर्त साद घालणाऱ्या, क्षणात तक्रारीच्या, क्षणात लडिवाळ, क्षणात जोरकस हुकमी तर क्षणात रुसव्या लाघवी स्वरात सांगत होत्या—

सैंया मोरा माँगे गवनवा
अब का करि।

आणि त्यांचं ते सप्तरंगी गाणं ऐकता ऐकता आम्हा श्रोत्यांचीही अवस्था होत होती 'अब का करि'!

शोभा गुर्टूंचं गाणं ऐकणं हा नेहमीच एक आनंदाचा अनुभव असतो. त्यांची गायनकला तर जडावाच्या दागिन्यासारखी लखलखीत आहेच. पण कलावंत म्हणून त्या जशा वागतात, बावरतात, आपली कला पेश करतात, तेही फार लोभसवाणं असतं. आता परवाचीच गोष्ट. खरं गाणं ठरलं होतं एअरकंडिशण्ड हॉलमध्ये—'वातानुकूलित दालन' हा क्लिष्ट शब्द मुद्दाम टाळून एअरकंडिशण्ड हॉल असे साधे मराठी शब्द वापरल्याचं मराठी अन्याय

निर्मूलन समितीनं लक्षात घ्यावं; पण तूर्तच्या परिस्थितीला मान देऊन प्रत्यक्षात ते करायचं ठरलं, तीन बाजूंनी भिंत आणि एका बाजूने खुली जाळी असलेल्या एका गोडाऊनवजा जागेत. पाऊस धो धो. ते थेंबांचं शिंपण, त्याबरोबरचा वारा, मधूनच चावऱ्या झुळुका. सगळं रंगाचा भंग करायला हजर. त्यात तंबोरा लावतालावता जोडीपैकी एकाच्या दोन तारा तुटल्या. मग दुसरा आणायला माणूस रवाना झाला. वेळ दिली होती पाचची. श्रोते हजर होते. तत्काळ शोभाबाईंनी ठरवलं की एका तंबोऱ्यावर का होईना, गाणं सुरू करायचं. पेटीतबला होताच साथीला. आणि सव्वापाचला बाईंनी 'सखि सावन आयो मास' सुरू केलं.

शोभाबाईंचा आवाज कसा पावसाळी मेघासारखा आहे. भरीव, ठाशीव आणि ओतीव. त्या म्हणतात तेच बोल इतर कुणाच्या गळ्यातून ऐकले की नुसती अक्षरं समजतात. शोभाबाईंच्या गळ्यांत त्या अक्षरांचेच अर्थघन शब्द बनतात. त्या शब्दांतून पुकार येते. ती पुकार थेट ऐकणाऱ्याच्या हृदयात येऊन थांबते आणि ऐकणारा अंतर्बाह्य तृप्त होतो. त्या दिवशी तर बंद हॉल नव्हता. त्यामुळे आवाजाचं जे एक गुंजन होतं, जे श्रोत्यांच्या कानांना तर सुखवतंच पण गायिकेलाही जो नाद ऐकू येऊन, गाणं अधिकाधिक फुलत जातं, ते सगळं त्या संध्याकाळी गैरहजर होतं. पण त्याबद्दल, त्या वाऱ्याबद्दल, पावसाच्या थेंबांबद्दल, खाली एक कसलंसं वर्कशॉप होतं तिथल्या ठोकाठोकीबद्दल. येता जाता, उगाचच मेसूर कर्णे वाजवणाऱ्या मोटारींबद्दल, कश्शा कश्शाबद्दल शोभाबाईंनी भुवई न चढवता चक्क आपला तो ठेवणीतला सुरेल भरदार आवाज लावला आणि क्षणात त्या साध्या हॉलचा विजापूरचा गोलघुमट बनवून टाकला. त्यानंतर तीन तास शोभाबाईंनी आम्हाला खिळवून ठेवलं. त्यांच्या ठुमरींतून सावन मास येऊन भिजवून गेला. गजलमधून--

जल्ला गर हाये बेवफा न हुआ
सब हुआ दिल्का मुद्दआ न हुआ

ही हुरहुर सुखवून गेली. त्यांच्या भजनातून—

गली तो चारों बंद हुअीं
मैं हरीसे मिलुं कैसे जाय—

ही ईश्वरभेटीची रुखरुख व्यक्त झाली. आणखी एका गजलमधून त्यांनी सांगितलं—अरे माझ्या दोस्ता, नको ना निराळ्या गोष्टी करूस. निदान आता तरी नको. प्रियतमेच्या विरहाचं हे दुःखसुद्धा मला इतकं सुखवतंय की हा माझा विरहानंद तू नको हिरावून घेऊस—

वो ना बात कर मेरे हम्नवा
गम्-ए-इष्क में जो मजा न दे

आणि मग बिहारच्या खास बोली भाषेतल्या एका लोकगीतासारख्या लचकत्या, ठुमकत्या गीतांतून बाई सांगू लागल्या—

लाजकी मारी भइली
झुइमइके पतिया—

बाई, प्रियकराच्या त्या तसल्या नजरेने माझी गात्रं तर लाजाळूची पानंच झाली पण आज आठवणीने सुद्धा—

कटे नही काटे हमसे
पूनमके रतिया—

शेवटची बाबुल मोरा भैरवी म्हणताना तर आम्ही गहिंवरलोच पण शोभाबाईंनीही रुमालाने डोळे टिपलेले आणि नाकाचा शेंडा पुसल्याचं आम्ही पाहिलं.

अशी ही गुणी गायिका. त्या मैफलीतली प्रत्येक बंदिश दाद मिळवून गेली. पण सर्वांत कमाल झाली ती चैती म्हणताना. चैत्राच्या सोनेरी उन्हाला आपली चुनरि रंगवायला बाई सांगत होत्या. बाहेर ढगांचा गडगडाट आणि पावसाचा गदारोळ चालला होता; पण बाईंची-चैतर चुंदरि रंगाओ—ही सोनसळी चैती अशी काही रंगत गेली की बाईंना मनोमन सलाम करून आम्ही म्हटलं, काय किमया साधली आहे बाईला! खरोखर अशा वेळी

—अब का करि...

♣ ♣ ♣

८ ◇ 'कैसे सुकून पाऊं'

गझलगायकी महाराष्ट्राला तशी काही अनोळखी नाही. बेगम अख्तरी-साहिबाँ मुळातली जरी उत्तर हिंदुस्थानातली असली तरी महाराष्ट्रात, खास करून मुंबईत तिचा चाहता वर्ग फार मोठा. एखाद्या रागाची बैठक धरून शब्दांना सुरात बांधून, आवाजाचा लगाव साधीत, त्यातला भाव श्रोत्यांपर्यंत कधी आर्द्रतेने, कधी हुकमतीने, कधी लाजवाब तर कधी शोखीने पोहोचवणं या बाबतीत अख्तरीला तोड नव्हती. तिचा आवाज, त्यातला दर्द आणि त्याची पुकार याचा ऐकणाराला कैफ चढत असे आणि मग कधी अख्तरी पेश करायची—

तरक-ए-ताल्लुक काम न आया उनसे मुहब्बत आज भी है– प्रियेचा त्याग करून पाहिला पण काही उपयोग नाही. माझी प्रीती आजही तिच्यावर तशीच आहे. कधी तक्रारीच्या सुरात सांगायची–

क्या कीजिये शिकवा दूरीका
मिलना भी गजब हो जाता है–

करू तरी काय. तिची भेट नाही म्हणून मी घुमसतो. पण प्रत्यक्ष ती भेटली की मी इतका काही गांगरून जातो की संभाषणाची बातच राहून जाते.

गझल गायनाची खुबी अशी की त्यातले सगळे शेर दोन अर्थांचे असतात. जसा—

तेरी दूरी या हुजूरीसे है एक अजीब आलम्
अभी ज़िन्दगी हकीकत
अभी ज़िन्दगी फसाना ॥

ही जवळीक प्रियेबरोबर पण असू शकते आणि परमेश्वराबरोबरही.

शांतपणे एकएक सुरावर थांबून; त्याची सही ओळख करून देऊन, शोभतील तेथेच स्वरांच्या लडींतून हरकती-मुरक्यांचे तुरे बांधत, दोनदोन तीनतीन सुरांचा मधुर मींडकाम करीत, छोट्या छोट्या तानेचे घोस बांधत अखतरी गझलचा कसला ताजमहाल उभारीत असे.

परवा टी. व्ही. वर शाम-ए-गज़लमध्ये, हैद्राबादचा एक तरुण गायक ऐकला, तलत अजीज म्हणून सुरेख गायला गझल. मध्यंतरी पाकिस्तानाहून येऊन गेलेल्या मेहेदी हसन या गझलच्या बादशहाची आठवण करून दिली त्याने. शांतपणे, सुरांचा आनंद स्वतः घेत आणि श्रोत्यांना देत, योग्य लयीत शब्दांना बांधून, कुठेही तालाशी मारामारी न करता, द्राक्षातून रस ठिबकावा तसा गळ्यातून मधुर सूर लावीत मेहेदी हसन गजल गातात. एखादा मंत्र उच्चारल्यासारखे ते शेर म्हणतात आणि मंत्रचळ भरल्यासारखे आपण त्यांच्या गोल भरदार आवाजावर, शब्दब्रह्मावर जीव निछावर करून टाकतो.

गझलगायनाचे मुळातच दोन भाग पडतात. एक त्याचे शब्द आणि दुसरा त्याचे सूर. उर्दूचा फार गाढा अभ्यास नसलेल्या माझ्यासारख्या संगीतप्रेमी श्रोत्यांना त्यातले सूरच भूल घालतात. तलत अजीजचं गाणं परवा ऐकलं आणि पुन्हा एकदा मेहेदी हसनचं ते मोहमयी गाणं आठवलं. तसाच तो फूल आणि सुगंधासारखा एकरूप झालेला शब्द आणि सूर. तसाच तो रियाजाने कमावलेला मृदू आणि गोल आवाज. तसाच तो दमसासपूर्ण प्रत्येक सुरावरचा ठेहेराव आणि तसाच तो संपूर्ण गाणं सुरू असतानाचा, मध्यावरचा आणि संपल्यावरचाही, शांतीचा साक्षात्कार.

आखिर संगीताचा दरबार भरावयाचा तो या शांतिदेवीच्याच सन्मानार्थ. जगात बहुतेक सगळ्या गोष्टी पैशाने विकत घेता येतात; पण मनाची शांती ही एक अशी चीज आहे की जी नवकोटनारायणालाही मिळत नाही अंगारे-धुपारे, मंत्रतंत्र, मंदिर-मसजिद, योगसाधना इत्यादी जे नाना रस्ते चालायचे त्याऐवजी एका संगीताचं बोट धरलं की आलोच आपण योग्य रस्त्यावर. आपल्याकडे महाराष्ट्रात गजल या गायनप्रकाराची विशेष आवड नाही. त्यातल्या फारसीमिश्रित उर्दू भाषेचा अभ्यास नसल्यामुळे म्हणा आणि एकंदरच आपला बाज पारंपारिक व नाट्यसंगीताचा असल्यामुळे म्हणा. अलीकडे मात्र

शोभा गुर्टू या गायिकेने अखतरीच्या तोडीस तोड गजल म्हणून आपल्या श्रोत्यांनाही गजलची आवड लावली आहे आणि एकंदरच संगीताच्या दरबारात मराठी कलावंताची मान उंचावली आहे.

तलत अजीज भीमपलासच्या बाजाने एक गजल गात होता—

कैसे सुकून पाऊँ तुझे देखनेके बाद
मैं क्या गज़ल सुनाऊँ तुझे देखनेके बाद

प्रियतमे, तुझ्या दर्शनाने मला अखस्थ केलंय. आता मी कसला गजल गातोय. पार निकामी झालोय तुला पाहाताक्षणीच. सुरांचा मजा घेत चाललेलं ते गाणं खरं म्हणजे मनाला कसं शीतळाई देत होतं. असह्य उकाड्यानंतर एखादा टूक गुलाबपाणी शिंपडत जावा तसं तलत अजीजचं ते गाणं शांत, शीतल करीत होतं.

मेहेदी हसनना मी विचारलं होतं— खाँसाहेब, संगीताची सर्वांत मोठी शक्ती कोणती ? त्यावर त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता सांगितलं होतं- सुकून, शांती ! मी गातो तो शांतीसाठी गातो. गाण्यात पुष्कळ रस असतात. पण सबसे बडा रस शांतरस. शांती ऐकणाऱ्याला आणि गाणाऱ्याला अल्लाके पास नेते संगीत इन्सानला अंतर्मुख बनवतं आणि ईश्वराजवळ नेतं असं मी मानतो.

त्या दिवशी तलत अजीजचं गाणं ऐकताना मला या शांतिसुखाचा पुरेपूर अनुभव आला. गाण संपलं. सूर विरले. शांती मात्र एखादा मंद ज्योतीसारखी अंतःकरणात तेवतच राहिली. सुकून पैदा झाला आणि त्याने अल्लाशी संवाद साधून दिला.

♣ ♣ ♣

९ ◇ 'घुमत ध्वनि हा'

एखाद्या गोल घुमटाखाली बसलेलं असावं, पांढऱ्या शुभ्र बिछायतींवर ओळखीपाळखीचे उत्सुक चेहरे असावेत, फुलांच्या तोरणांनी आणि सुगंधी माळांनी वातावरण अनुकूल केलेलं असावं, संधिप्रकाशाची कातरवेळ असावी, घुमट प्रकाश-किरणांनी उजळला असावा आणि पंडित रविशंकरजींनी छेडलेल्या मारव्यात आपण हरवलेलं असावं. स्वप्नासारखं वाटलं ना. पण प्रत्यक्षात घडलं हे. अगदी हेच. अस्संच.

रविशंकराची सतार न आवडणारा माणूस मला अजून भेटायचाय. किंबहुना रामसीता, राधाकृष्ण यांच्यासारखाच रविशंकरसतार असा द्वंद्व समासच झालाय. परवाच कुणी एक भाबडा विचारीत होता की, रविशंकरचे आडनाव सितार का, म्हणून !

फार मोठा कलावंत. जगविख्यात. त्याच्या विद्येतला असामान्य पंडित, प्रगाढ विद्या आणि प्रसन्न व्यक्तिमत्व यांची बहुधा फारकत असते. पंडितजींच्या बाबतीत या दोन्हींचा मनोज्ञ संगम. संगीताची व्याख्याच मुळी—

गीतं वाद्यं तथा नृत्यं त्रयं संगीतमुच्यते !

रविशंकर या तिन्ही कलांतले मर्मज्ञ. काय काय पाहिलंय या माणसाने. केवढी सतार वाजवलीय. किती दुनिया हिंडलाय. कुठे कुठे वाजवलीय.

अमेरिकेतला मॅडिसन स्क्वेअर. वीस हजार माणसं बसलेली. बहुतेक सगळी विशीतली जत्रा. चुइंग्गम्, चॉकलेटस्, कोका कोला, ककीज्, काय काय चघळत बसलेली. पोरींचे सरळसोट सोनेरी केस पाठीवर सोडलेले. पोरांनी मुद्दाम कुरळे करून घेऊन डोक्यावर शितरं बाळगलेली. सोनेरी काडीचे चष्मे. अंगात झब्बे कुडते. गळ्यात तऱ्हेतऱ्हेच्या माळा आणि दुर्बिणी. वातावरणाइतकंच या कळ्या फुलांचं वागणंही मोकळं. बाहेर वीस हजार

मोटारींच्या रांगा, सगळंच विशाल अमेरिकन. पूर्वी मला वाटे, अमेरिकन लोक इंग्रजी लिहितात ते बुद्धा कॅपिटल लेटर्समध्ये. बिग स्केल. सगळं भव्य, अतिभव्य, प्रचंड.

तर असे वीस हजार श्वास कोंडलेले. प्रशस्त रंगमंचावर पर्शियन गालिचा. उदबत्त्या. ध्वनिक्षेपकांचं जाळं. जागोजाग टी. व्ही. स्प्रेन्स लटकावलेली. प्रेक्षकांच्याकडेही उदंड कॅसेटस्. टेपरेकॉर्डर्स. संचालकांची लगबग.

आणि एकदम सर्वत्र हश्श-श्श् संचालक ध्वनिक्षेपकावर घोषणा देतात की, आता रंगमंचकावर येत आहे—तुमचा आमचा सर्वं दुनियेचा लाडका कलावंत आणि त्याची जादूगार सिटार—पंडित रॉवीशाँखर!

टाळ्यांचा कडकडाट, झुकून अभिवादन करीत रविशंकर रंगमंचकावर येतात. सुधबानी सुधमुद्रा. अंगात जरीकाम केलेला गडद किरमिजी झब्बा आणि राखी रंगाची पँट. पायात जयपुरी चढाव. He came, he saw and he conquered अशी अवस्था प्रेक्षकांची. अशी एक मैफल सुरू होते. पंडितजी स्वतःच रागाचं नाव, तालाचं नाव सांगतात, वाजवतात आणि तो वीस हजाराचा प्रचंड जनसमुदाय इतका सुरेख ऐकतो की पंडितजींनी म्हणावं—

वाहवा, क्या सुना आप लोगोने! परवांची संध्याकाळही अशीच सुरेख उमलली. फुलत फुलतच गेली. ऐकायला मॅडिसन स्क्वेअरसारखा संख्येने वीस हजारांचा जनसमुदाय नव्हता. पण मोगूबाई कुर्डीकर, खुदिम हुसेन, किशोरी आमोणकर असे एकेक बिनीचे कलावंत, की ज्या एकेकाला दहा हजारांत मोजावं, असे उपस्थित होते. पंडितजींनीही मारव्याच्या स्वरधनुष्याला हात घातला, लीलया उचललं आणि श्रोत्यांवर रिषभ, धैवत, गंधार मध्यमाची स्वरवृष्टी करीत, षड्जाला साद घातली. मारव्यातला तो षड्ज. अमाप आराधना, मनस्वी मनधरणी, विपुल विनवण्या केल्यानंतर मगच एखाद्या मानिनीने तिच्या भ्रमरकळ्या नेत्रकटाक्षाने अनुकूल प्रतिसाद द्यावा तसा तो षड्जराज त्या संध्याकालीन मंत्रमुग्ध वातावरणात मुंबईच्या एका ऐतिहासिक वास्तूच्या डेरेदार घुमटात, लहानथोर कलावंतांच्या, प्राण कानात आणून ऐकणाऱ्या आमच्यासारख्या श्रोत्यांच्या समुदायात, फुलांच्या, चंद्राच्या आणि प्राणांच्या साक्षीने जसा रविशंकरांना पावला तसा तो तुम्हा आम्हा सर्वांना पावो. स्वरसमाधीप्रत नेवो. संगीतातला षड्ज हा साक्षात्कारी आहे. याचा अनुभव येवो. मनाच्या घुमटात अखंड घुमत राहो. ♣ ♣ ♣

१० ◇ स्वरलीन

सकाळची वेळ असते. मार्गशीर्षातली थंडी उठून बाहेरच्या विश्वात मिसळण्याऐवजी दुलईतच गुरफटून झोपायचा सल्ला देत असते. कावळ्यांनी केव्हाच कलकलाट सुरू केलेला असतो. बाजूच्या बिल्डिंगवर पडलेलं सोनं सूर्यानेच वाटायला घेतलं आहे याची जाणीव होत असते आणि अचानक दुरून कुठून तरी सनईचे सूर कानावर येतात. बिलावलची गोड सुरावट मैत्रीचा हात पुढे करते. साथीला चौघड्याचेही बोल ऐकू येतात. शहनाई वाजतेय म्हणजे कुणाच्या तरी अंगनमे आज शादी उभी राहिलीय म्हणायची. बिलावलचे सूर पुढचं सगळं लग्नाळू दृश्य डोळ्यांपुढे उभे करतात.

तर जसं समुद्र म्हटलं की किनारा, ओवी म्हटली की ज्ञानेश्वर, बाग म्हटली की फुलांचा सुगंध, रविशंकर म्हटलं की सतार, तसं आपलं लग्न म्हटलं की सनई असं एक प्रचंड समीकरणच बसून गेलं होतं मनात. म्हटलं लग्नाची ती सर्वंकष जादू फक्त सनईच्याच सुरांतून स्पर्श करू शकते आणि मखमलीची लव उमटवते. पण परवा या माझ्या इतके दिवस कुरवाळून जतन केलेल्या शहनाई और शादी या समीकरणाला एका ग्रँड बोईंगचा धक्का लागला.

असाच एक लग्नमंडप होता. लग्न सकाळीच लागलं होतं. हॉल होता तामिळ संघम्‌चा. आता संध्याकाळ झाली होती. ज्या रंगमंचावर सकाळी नवरानवरी बसले होते तिथे आता साधारण एक वादक आणि त्याचे चार साथीदार बसू शकतील असा एक लाकडी चौथरा बनवला होता. त्याला छतही बांधलं होतं चौकोनी. छान पिवळ्या-निळ्या साटणीच्या कपड्यांनी,

झालरींनी सजवला होता तो चौथरा. मध्ये पांढऱ्या शुभ्र चादरींची बिछायत आणि त्यावर बसून, आपल्या जादूच्या बोटांनी, सुरांचा मधुरस काढीत होते लालगुडी जयराम अय्यर दक्षिण भारताचा थोर कलावंत. वाद्य होतं व्हायोलिन. खरं म्हणजे चरचरीत, किरकिरीत, तिरतिरीत वाजणाऱ्या या वाद्याबद्दल माझ्या मनात लहानपणापासून घसकाच होता. हे वाद्य गोडही वाजू शकतं याची पहिली जाणीव झाली आमच्या डी. के. दातारांच्या वादनातून. पण परवा लालगुडींचं वादन ऐकलं आणि वाटलं हे वाद्य फक्त गोडच वाजू शकतं. काय त्यांचं ते मुलायम वादन, बोटांतून उभं केलेलं अप्रतिम स्वरबिंब, लग्नमंडपातल्या एवढ्या त्या विशाल गर्दीतली त्यांची एकाग्रता, सौम्य सुहास्य व्यक्तिमत्व–सगळंच प्रसन्न. कर्नाटक संगीताबद्दल आपण उत्तर भारतीय काय काय गैरसमज बाळगून असतो. त्यांचे रागच निराळे असतात, त्यांच्या श्रुतीच विचित्र असतात, त्यांचं गायन-वादन तालप्रधानच असतं. अलंकारापेक्षा व्याकरणावरच त्यांचा अधिक भर असतो. एकंदरीत काय तर अय्यय्यो, आपल्याला ते कर्नाटक संगीत नको रे बाप्पा ! पण त्या संध्याकाळच्या लालगुडींच्या वादनाने या सर्वांवर कडी केली, जगन मोहिनी सावेरी, कानडा, बेगडा सारमती, यमुनाकल्याणी अशा कर्नाटकी रागिण्यांतही आपल्या तोडी, जोगिया, आसावरी, बिहाग मल्हारचं नातं लागतं होतं. मोहनम् हिंडोलम् तर आपले भूप आणि मालकंसच. त्यांची तोडी ती आपली भैरवी.

मृदंगम्वरचा रामभद्र उत्तम साथ देत होता. तालमात्रांच्या दोनतीन, तीनचार अशा तोटक्या तुकड्यांत काय श्रुतिमधुर उपजा काढीत होते लालगुडी. वीसबावीस मिनिटं एकेक रागिणी वाजवून पुरे करीत होते. लगेच पुढची रागिणी सुरू. बरोबर साडेसहाला सुरू झालेलं वादन सव्वादहाला संपलं. मध्ये इंटर्व्हल वगैरे तर नाहीच; पण साधं पाणीसुद्धा नाही. बरं सभासुद्धा मांडी ठोकून ऐकायला बसलेली. सत्तर वर्षांच्या अम्मापासून ते बारा वर्षांपर्यंतच्या त्यांच्या त्या खास मद्रासी परकरांतल्या पोरीपर्यंत प्रत्येकीला गाण्याची उत्तम समज. हाताने ताल देणं हे आम सभेत चालू. म्हणजे चक्क सभेच्या तालावर लालगुडी वाजवत होते. आम्हा काही उत्तर भारतीयांसाठी त्यांनी एक पंधरा मिनिटांची ठुमरीसारखी धुनही वाजविली. तीही अतिगोड. त्यांची मधुवंती ऐकल्यानंतर समजलं, की आपण जसे हंसध्वनी, चारुकेशी, सिंहेंद्र-

मध्यम अशा कर्नाटक रागिणी आपल्यात घेतल्याहेत तसंच त्यांनीही काही रागिणींना फितुर केलंय.

सुरेख जमली होती मैफल. लग्नघरच ते. तशी लगबग चालूच होती. बाजूलाच जेवणासाठी मंडप होता. आणि रंगमंचावरच एका बाजूला केळीची पानं, उदबत्त्यांचे पुडे, फुलांचे हारतुरे, कॉफीची तयारी वगैरे सरंजाम होता. माणसं चढउतार करीत होती. श्रोतृसमेतही तसा लहान मुलांचा थोडा गोंधळ चाललेलाच होता. पण लालगुडींवर त्याचा काहीसुद्धा परिणाम नव्हता. एखाद्या बड्या षण्मुखानंद थिएटरमध्ये जितक्या एकाग्रतेनं त्यांनी एरवी वाजवलं असतं, तेवढ्याच प्रामाणिकपणाने ते इथे वाजवीत होते. आणि ऐकायला समोर जसे सभाजन होते तसे विवाहवेशात बसलेले नवरानवरीही होते. नवरी मुलगी म्हणजे लालगुडींची भाचीच होती. सगळेच चार तास वादनाचा आनंद घेत होते. कारण ते नुसतं वादन नव्हतं, सुरांची पूजा चालली होती. पुजारी तीर्थ वाटत होता. आणि श्रोते भक्तिभावाने ग्रहण करीत होते.

त्या वादकांची, त्या श्रोत्यांची, लग्नमंडपासारख्या त्या पवित्र वातावरणाची गूढमोहिनी मला अजून भारून बसली आहे. लालगुडी जयराम कर्नाटक संगीतातले आजचे अग्रगण्य व्हायोलिन-वादक. या देशात तर लोकप्रियतेच्या कळसावर ते आहेतच; पण परदेशातही त्यांची कीर्ती चौफेर पसरली आहे. बांगलादेशासाठी अमेरिकेत कार्यक्रम करून या कलावंताने अफाट पैसा उभा केला. पण दानाची जाहिरात केल्याने त्यातलं पुण्य कमी होतं या सूत्रानुसार त्यांची वागणूक असावी. दक्षिणेतला हा व्हायोलिनचा सम्राट कमालीचा साधा आहे. अय्यर असल्याने कपाळावर भस्माचे पट्टे, मधोमध कुंकुमतिलक, अंगात साधा सुती शर्ट आणि दाक्षिणात्याची सर्रास लुंगी. एरवी गाठ पडली तर ओळखतासुद्धा येणार नाही.

बाकी कलावंताचं असंच असावं. पुष्कळ वेळ संभाषण चालून ते संपवावं. तो माणूस निघून जावा आणि मग कुणीतरी येऊन सांगावं की, का हो, बराच वेळ बोलले तुमच्याबरोबर सत्यजित रे! नाहीतर बैठकीला बसल्यापासून पंखाच बंद करा, चहाच आणा, हा गरमच आहे, कोमटच आणा, माझा आवाजच आज बसलाय, मला तापच आलाय तरी मी गातो आहे. मला गडबड चालायची नाही, बाहेर कोण बोलतंय त्यांना शट अप सांगा. अब्रॉडस

असं नसतं. मी लॉस अंजेलिसमध्ये वाजवलं तेव्हा सभा कशी चित्रासारखी तटस्थ होती एक ना दोन. हजार तऱ्हांनी सिद्ध करायला बघायचं की आम्ही किती प्रसिद्ध कलावंत.

नाहीतर लालगुडी. हातात व्हायोलिन घेतल्यावरच कळणार की, अरे हा तर दक्षिणसम्राट लालगुडी जयराम अय्यर. त्याने तिथे व्हायोलिनची तार छेडली की, इथे कुठेतरी आमच्या अंतरात्म्यात सूर विसावणार. स्वरसंवाद होणार आणि पुढले चार तास आम्ही सुरलोकात विहरणार. स्वरलीन होणार.

♣ ♣ ♣

११ ◇ चमूचमू

कलावंत जेव्हा रंगमंचावर बसून आपली कला पेश करतो तेव्हा एक वेगळंच तेज त्याच्यावर चढतं. त्याचं संपूर्ण व्यक्तिमत्व बदलून जातं. आणि त्या बदललेल्या व्यक्तिमत्त्वानं आपण श्रोतेही भारून जातो. मग त्याचा आपल्याला न आवडणारा रंग, नाकाचा आकार, केसांची ठेवण, त्यानं घातलेले ढगळ कपडे, त्याचे हावभाव, या कश्शाकश्शाचा आपल्याला त्रास होत नाही. आपला संबंध असतो फक्त त्याच्या कलेशी. आपलं नातं जुळतं ते त्याच्या सुरांशी आणि ते अतूट असतं.

साध्या साध्या कलावंतांची ही स्थिती, तर मग राजबिंडं व्यक्तिमत्व लाभलेली, जरीची किनार असलेली आकाशी साडी नेसलेली, केसांच्या महिरपीने चंद्रासारख्या गोल चेहेऱ्याला विलक्षण शोभा आलेली, कानांत कुड्या, माथ्यावरून शालीन पदर आणि 'मान जाओ मोरी बात ओ मोरे सैंया' अशी वल्लभाची आळवणी करताना लकलक चमचमणारी नाकात चमकी घातलेली, एवढा सगळा साज लेवून एखादी गिरिजादेवी रंगमंचावर असली तर श्रोते मोहिनीमंत्रानं भारल्यासारखे हरवून बसतात. ओहो. काय बाईचं वैभवशाली व्यक्तिमत्व आहे! सुरश्री केसरबाईंनंतर इतक्या ठाशीव आणि रेखीव व्यक्तिमत्वाची दुसरी गायिका मी तरी पाहिली नाही.

पडदा उघडतो आणि पाठी दोन तंबोरे, डाव्या बाजूला सारंगी आणि उजव्या बाजूला तबला अशा साजिंद्यांच्या कोंदणात एखाद्या साम्राज्ञीसारख्या बसलेल्या गिरिजादेवी श्रोत्यांना छानसं हसून, एक नम्र नमस्कार करतात. त्यांच्या पातळाचा जरीकाठ खुलून दिसतो. एका हाताने माथ्यावरचा ढळू

लागलेला पदर सावरताना अंगठीतला खडा चमकतो आणि श्रोत्यांत पुढेच बसलेल्या कुणा तरी ओळखीच्या श्रोत्याला जरा अधिक झुकून नमस्कार करताना, नाकातल्या चमकीतून असा काही प्रकाशाचा तीर निघतो की थेट आपल्या अंतर्मनात येऊन रुतून बसतो. आवाज लावण्यापूर्वीच बाईंनी मैफल अर्धी जिंकलेली असते. त्यानंतर छेडल्या जाणाऱ्या तंबोऱ्यात, साथीच्या सारंगीत बाई जेव्हा आपला लखलखीत सूर मिळवतात तेव्हा संभ्रम पडतो की, सगळ्यात अधिक काय चमकदार? बाईंच्या साडीचा जरीकाठ, की त्यांची अंगठी, की त्यांच्या त्या धारदार नाकातली चमकी, की त्यांचा हा हिरकणी-सारखा दैदीप्यमान सूर?

बनारसची ही गायिका आज कित्येक वर्षं मैफली गाजवीत आली आहे. आज तरी बनारस ढंगाची ठुमरी अप्रतिम म्हणणारी गिरिजादेवी ही एकच गायिका. आधीच ठुमरी हा प्रकार त्यातल्या लाडिक शब्दांमुळे चटकन् भावणारा, त्यात बाईंचा धारदार आवाज. बाई त्या कन्हैयाच्या गर्विष्ठ मुरलीला विचारतात, का ग बाई, तू काय चांदीची, की सोन्याची, की जडवलेल्या रत्नांची? साधी मधुबनातली लाकडाची काटकी आणि तुला ग कसला एवढा अभिमान?

कौन गुमान करी मुरलिया
सोनेकी नाही रूपेकी नाही रतनजडी
तू तो मधुबनवाली लकडिया—

केवळ श्रीकृष्णाच्या अधराच्या सान्निध्यामुळे गर्विष्ठ बनलेल्या मुरलीला गिरिजादेवी जेव्हा हा सवाल त्यांच्या बोलमें बात पैदा करण्याच्या कसबातून आळवून आळवून, कधी रागावून, कधी आर्जवून, कधी रुसून, कधी फुगून, कधी अढ्यतेने, तर कधी नम्रतेने विचारायला लागतात, तेव्हा आपण रंगभवनच्या थिएटरमध्ये बसलेले नसून, मधुबनात बसलेलो असून, राधेच्या कृतककोपाचे साक्षीदार असल्याचा भास होतो.

मग बाई एखादी खास जानपदी ढंग असलेली चैती निवडतात.

बैरन रे कोयलिया तोरी बोली ना सुहावे

दुडक्या लयीतली आणि लाडक्या चालीतली ही बंदिश सगळ्या श्रोत्यांची झटकन् पकड घेते. आणि सगळी सभा या कोयलियाबरोबर ताल घ्यायला

लागते. पण गिरिजादेवींची हुकुमाचा एक्का असलेली एक बंदिश श्रोते त्यांना हरएक मैफलीत आग्रहाने म्हणायला लावतात.

'दीवाना किये श्याम, क्या जादू डारा' यात बाई 'क्या जादू डारा' हे कृष्णाला त्याच्या सोळा सहस्र नारींसारखंच सोळा सहस्र वेळा विचारतात. आणि प्रत्येक वेळी अशा काही लकबीत विचारतात की, ह्या नटखट कृष्ण-कन्हैय्याने राधिकेला पागल बनवलं की तो स्वतःच हरवून गेला या प्रश्नाचं उत्तर शोधीत आपण श्रोतेच देहभान हरपतो.

अस्सल बनारस बाजाची म्हणजे पूरब अंगाची ठुमरी आता आपल्याला मुंबईत फार कमी ऐकायला मिळते. पूर्वी सिद्धेश्वरीदेवी अशीच एक थोर ठुमरीची राणी होऊन गेली. आता गिरिजादेवी त्या सिंहासनावर अधिष्ठित आहेत. शब्द, अर्थ, सूर आणि लय हे चार अलंकार घालून जेव्हा बाई त्यांच्या गानकलेला नटवून आपल्यासमोर ठेवतात, त्यावेळी दसऱ्याला सोनं लुटतात तसं त्यांचं गाणं लुटावंसं वाटतं. ठुमरी काय, कजरी काय, पंचरंगी होरी काय, दादरे, चैती अमाप खजिना.

अगदी शेवटी लोकाग्रहास्तव बाई बाबुल मोरा नैहर छूटो हि जाय म्हणतात तेव्हा एवढ्या भावनावश होतात की इतका वेळ चमचमणाऱ्या त्यांच्या गाण्यात आणि त्यांच्या अलंकारांत आणखीही दोन अलंकार चमकतात. ते असतात त्यांच्या टपोऱ्या डोळ्यांतून गळलेले दोन चमकदार अश्रू. आपल्यालाही ते तसे नीटसे दिसतच नाहीत म्हणा, कारण आपलेही डोळे त्यावेळी ओलावलेलेच असतात.

♣ ♣ ♣

१२ ◇ अनुरागाचा रंग

गुलाबाचं प्रदर्शन मोठ्या हौसेने बघायला गेले. प्रदर्शन होतं मोठं देखणं. गुलाबसुद्धा दिसत होते खूप शोभिवंत राजबिंडे. बाकी फुलांत फूल गुलाबाचं फूल. तर असे असंख्य गुलाब मांडून ठेवले होते जागोजाग. काही कुंड्यांतून तर काही त्या गुलाबांसारख्याच मोहक फुलदाण्यांतून. जोपर्यंत गुलाबी रंगांच्याच छटा दिसत होत्या तोपर्यंत खूष होते; पण एका कोपऱ्यात अगदी हातावर हात, पायावर पाय गर्दी दिसली म्हणून कुतूहलाने डोकावून बघायला लागले तर काय....म्हणे काळा गुलाब. शॉक लागल्यासारखी पाठी झाले. काळा गुलाब ?

जाड चष्मा लावून हातातल्या कसल्यातरी गुलाबाच्याच पुस्तकांची पानं उलटसुलट फडफडवणाऱ्या एका गुलाबी विद्वानाला विचारलं, का हो, ही काळ्या गुलाबाची काय भानगड आहे ? एवढ्या कष्टाचं खतपाणी घालून हे जे काही फूल हाती लागतं ते गुलाबी रंगाचं नसतं तर ! त्यावर छद्मी हसून त्या गुलाबी विद्वानाने मानेला हलकासा हिसका देऊन मला विचारले, नसतोच मुळी. तो तसा नसावा म्हणून तर एवढी सगळी मशागत !

त्यावर पुन्हा म्या पामरे म्हटलेच की—अहो मग हे जर फूल गुलाबी रंगाच्या कुळीतलं नसतं मग तर त्याला काळा 'गुलाब' असं का म्हणायचं ? ज्याचा रंग गुलाबी तोच गुलाब. या काळ्या फुलाला दुसरं काही तरी नाव द्या ना. काळा गुलाब असं म्हणून शहाण्या माणसाला चक्रावून कशाला टाकता ?

यावर ही अगदीच होपलेस केस असा हताश भाव आणीत तो गुलाबी

विद्वान तेथून अदृश्य झाला. माझा आपला अजून विचार चालूच आहे. गुलाबाची पहिली उपज पार्शियात झाली म्हणे. ज्या कुणी पहिल्या माळ्याने हे फूल त्याच्या बादशहाला नेऊन दिल असेल त्याने त्याच्या रंगानेच त्याला हाक मारली गुलाऽब ! तेव्हापासून गुलाबी रंगाला अधिष्ठान प्राप्त झाले. संस्कृत कवींना लाल, निळ्या, पांढऱ्या कमळातच कपोलकथा गुंफाव्या लागल्या. उर्दू कवींचं मुकद्दर भलतंच शिकदर. त्यांनी गाल गुलाबी केलेच; पण ओठही गुलाबी रंगात आणि गुलाबाच्या पाकळ्यांच्या मखमली स्पर्शात भिजवले. त्यांनी चमन गुलाबी आणि दामनही गुलाबी रंगवला. जान गुलाबी, ईमान गुलाबी, आम तोरपर सगळा समाज गुलाबी. एकदा नजरच गुलाबी झाल्यावर दिलका आलम गुलाबी गुलाबी होणारच. पुढे कोणा करंट्याला कावीळ झाली आणि त्याला पिवळा गुलाब दिसला कुणास ठाऊक !

अशा या गुलाबी रंगात जो आयुष्यात एकदाही भिजला नाही त्याने लाल, पिवळ्या, काळ्या असल्या नकली गुलाबांशीच नातं जोडावं.

रागारागाने जर कुणी नतद्रष्ट म्हणालाच की, गुलाबी रंग उडूनही लवकर जातो. तर म्हणावं तो प्रेमाचा रंग आहे अनुरागाचा रंग आहे. आयुष्यावर जो प्रेम करतो, माणसाला मिळालेल्या या जीवनावर जो प्रेम करतो, त्याच्या गाठीचा गुलाबी रंग कधीच उडून जात नाही.

♣ ♣ ♣

१३ ◇ हिरवं मन

गुलाबी रंग जसा प्रेमाचा तसा हिरवा रंग निर्मितीचा. नुकत्याच फुटलेल्या ताज्या टवटवीत पालवीचा. गवताचा. झाडांचा. रंगारूपांचं आपलं एक नातं असतं. वर्षानुवर्षांचे संस्कार असतात लाल रंगाच्या माथी मीतीचा टिळा लागलेला असतो. खरं म्हणजे कपाळीचं कुंकूही लालच असतं. पण लाल रंगाबरोबर अग्नीची, धोक्याचीच जोड दिसते! आपल्या भारतीय मनाला केशरी रंगाबरोबर जोहार, प्राणत्यागच दिसतो; त्याला काय करणार? स्वतःला कितीही आधुनिक आणि मॉड् म्हणवलं तरी इतिहासाची मुळं नाही उपटून टाकता येत. आपल्या व्यक्तिगत अस्तित्वाहून ती फार फार खोल असतात. काळा रंग अंधाराचा आणि पर्यायाने कृष्णकृत्यांचा. पापाचा. अघोरीपणाचा. शुभ्र रंग पावित्र्याचा. शांतीचा. विद्येचा. असा मग निळा आभाळाचा. विस्ताराचा. मनाच्या मोठेपणाचा. रंगाच्या या गोफांतून आपण जीवन विणीत असतो. जीवनात रंग म्हणजे श्वासात प्राण.

आवडीचा रंग असावा प्रत्येकाला. रंगाची आवड त्या माणसाच्या जीवनाच्या आवडीचं प्रतीक असते. काही काही बायका, काही काही पुरुष छान रंगसंगती साधतात. छान पिरोजी रंगाची साडी, तिच्याच काठपदरातल्या एकाद्या रंगाचं पोलकं, मग जुळणारी कर्णफुलं, गळ्यातली माळ, हातातली पर्स, कपाळावरची टिकली. आभाळ समोर आल्यासारखं वाटतं. पुरुषही दिसतात कधीतरी रंगांच्या संगतीनं चालणारे. कुठे शर्टाबरोबर बूटमोजे शोभणारे घालतील; कुठे एखाद्या तपकिरी कुडत्याबरोबर छान त्याच रंगाच्या कोल्हापुरी चपला घालतील. पण एकंदरीत रंगांना मिरवण्याची आवड पुरुषांना कमीच. मिरवण्याचीच म्हणायला हवं. रंगांच्या अस्तित्वाची दखलच त्यांना

नसते म्हटलं तर बोरकर, पाडगावकर, महानोरांची सगळी रंगीत कविता मला माझ्या या विधानाचा जाब विचारायला फणा काढून उभी राहील.

ह्या झाडांचे रंग पेटले । गर्द पोपटी झाले
पावसांतले उन्ह शेंदरी । पानांतुन ओघळले
सांज सावळी धन आभाळी । रान सावनी ओले
डोंगरातले मोर उधळुनी । पिसाट उन्मन झाले

बाकी रंग दिलेच आपल्याला निसर्गाने. आकाशाची निळाई. मातीची विटकरी, सूर्याची लालडी, चंद्राची शुभ्र शीतळाई आणि झाडापानांची गर्भार हिरवळ.

पण नुसता हिरवा रंग माझ्या आवडीचा असं म्हणून नाही भागत. या हिरव्याच्या असंख्य छटा असतात. पाण्यावर खापरी मारली की, जशा वेलांट्या उमटत राहातात, तशा या हिरव्यांच्या असंख्य वाटा आणि लावण्याच्या छटा. वसंतातल्या पालवीची पोपटी नव्हाळी निराळी तर वठलेल्या आम्रवृक्षाची गडद हिरवी पुण्याई वेगळी. कडुलिंबाच्या कातरी पानांचं हिरवं जावळ निराळं आणि शिरीषाला फुटलेली आतुर हिरवीचार पानावळ निराळी. शेगटाच्या नक्षीदार हिरव्या फांद्या कशा झुल्यावर हिंदळल्यासारख्या; तर केळीच्या हिरव्या पात्या गर्भार झुकल्यासारख्या. पिंपळाच्या रंगदिवाण्या पालवीची तर कथाच निराळी. आधी ओठाला अळता तर मग गालांवर गुलाल अशी नवतारुण्याची झिंग ओसरल्यावर एखादी तृप्त पुरंधरी जशी आपलं स्वस्थ वैभव मिरवीत उभी असते, तशी ही पिंपळाची सळसळीत पालवी. आधी पोंवळयांच्या, मागाहून पांचूच्या पताका फडफडावीत उभी.

हिरवा रंग सृजनाचा. नवा जीव घडवण्याचा. म्हणून तर अंगभर फुलून आलेल्या सात महिन्यांवर हिरव्या साडीचं वेष्टन. राजसवाण्या हातांभोवती हिरव्या चुड्यांचं कोंदण. हिरव्या रंगाचं आपलं असं कंच नातं आहे बघा. हिरव्या रंगाचं मला आणखी एक कौतुक वाटत आलंय्. आमच्या मातीचाच रंग घेऊन आम्ही जन्मलो पण त्याच मातीतून फुटणारा गवताचा अंकुर तेवढा पोपटी. पालवीचा रंग तेजाळ हिरवा. पानांचा रंग वेल्हाळ हिरवा. हिरवा रंग कसा कुठंही शोभून दिसतो.

आकाशाच्या निळाईला गोंजारणारा माडाचा हिरवा शेंडा कसा गिरेंबाज

दिसतो. आकाशाच्या घुमटाला वटवृक्षाचा डेरेदार घुमट कसा गोलाई आणतो. निळ्याशार आकाशाच्या प्रतिबिंबाला न जुमानून आपल्याच मिजाशीत विसावलेलं गडद गार शेवाळ, तळ्याच्या पाण्याला काय कमी शोभा आणतं. कमळं नसतानाही नुसतीच पसरलेली कमळाची दळदार पानं तळ्याला कसं कुटुंबवत्सल बनवतात.

छे बुवा. हिरव्या रंगाशिवाय कशाला ओ. के. देताच येणार नाही. कागदावर, खूप डोकं खाजवून, विचार करकरून, चातुर्य राबराबवून उतरवलेल्या योजनेवर कुणा वरच्या साहेबांनी लाल रंगाची एवढीशी जरी खूण केली तरी पॅराशूटशिवाय विमानातून झोकून द्यावंसं वाटतं. तेच हिरव्या शाईत ओ. के. लिहिलेलं असलं की हनुमान होऊन सूर्यावर पकडउडी घ्यावी. हिरव्या बावटयाशिवाय गाडी हलत नाही की हिरव्या दिव्याशिवाय विमान उडत नाही. हे सगळं एक वेळ राहू द्या. पण हिरव्या पानांच्या गुढ्या-तोरणांशिवाय ऋतुराज वसंत येतच नाहीत. ऋतुचक्र घुमतच नाही. वसंताने एकदा का हिरवा बावटा दाखवला की पुढचं साम्राज्य वसंतमित्र पंचबाणाचं. मनकवड्या मदनाचं. अशरीर मन्मथाचं. म्हणून तर कालिदासाच्या कुमारसंभवात वसंतानं हिरवी भरती आणल्याबरोबर पाठोपाठ वसंतलक्ष्मी लाल फुलांचा कुंकुमतिलक लावते, काळ्याकुळकुळीत भुग्यांचं काजळ घालते, मृदुकोमल तांबडया पालवीचा ओष्ठरोग मढवते, कोकिळ आर्तमधुर सूर घालतो. मधुकरद्वय एकाच फुलातला मध चाखतात, काळवीट हरिणीशी शिंग घासतो, कमलकेसरांनी सुगंधित झालेले जळ सोंडेत धरून गजराज क्रीडा करायला लागतो. सगळ्या सृष्टीला, चराचराला असा हिरवा चळ भरतो. सृजनाचं चक्र गतिमान होतं. नवनिर्मितीत दुनिया कृतकृत्य होते. संसार जीवनमय होतो.

रंगात रंग हिरवा रंग. मला नेहमीच ठेवतो दंग. नव्या चैतन्यकल्पनांत. नव्या उन्मनी योजनांत तो कधी कुठे हरवू नये ना म्हणून मी त्याला आपला माझ्या मनातच ठेवलाय थेट. उदास वाटलं, एकाकी वाटलं, सगळं संपल्यासारखं वाटलं, की साद घालते. हिरवा रंग तत्परतेने प्रतिसाद देतो. नवी कल्पना रूणझुणत येते. तिच्या नादात मी पुन्हा उभारी घेते.

♣ ♣ ♣

१४ ◇ रंगी सारी गुलाबी चुनरिया

एखादा दिवस गुलाबी उगवावा, सबंध दिवस मनसोक्त काम केलेलं असावं. मेटायला येणारी सगळी माणसं वेळेबरहुकुम मेटून गेलेली असावीत. सांगितलेली पत्रं वेळच्यावेळी टाईप होऊन पुढ्यात आलेली असावीत. ऑर्डर नोंदवल्यानंतर पाच मिनिटांच्या आतच कँटीनच्या पोऱ्याने चहा साक्षात टेबलावर आणून दिलेला असावा. पंखे आवाज न करता गरगरलेले असावेत, टेलिफोन आज्ञाधारकपणे माणसं जोडून देत राहावेत. खणांत भरपूर सफेत कागद भरलेले असावेत. पाण्याचा ग्लास कुणीतरी हडप केलेला नसावा, टेबलासमोरच्या खुर्च्या शाबूत राहून, मेटायला आलेली माणसं निवांत बसून बोलत असावीत, दिवसाकाठचं रेकॉर्डिंग काही धुसफूस न होता निर्विघ्नपणे पार पडलेलं असावं असा सगळा आमच्या माफक अपेक्षा पुऱ्या केलेला दिवस, जेव्हा घरी जाताना पहिल्याच बसमध्ये चटकन बसायला जागा मिळवून देतो, तेव्हा तो माझ्या लेखी चक्क गुलाबी होतो. थंड शरबती गुलाबी. एखाद्या कोरीव लेण्याच्या गुहेतल्या गंधित प्रकाशासारखा गुलाबी. शोभ गुर्टुने गायलेल्या ठुमरीतल्या कन्हैयाच्या नुसत्या नजरेने रंगवलेल्या चुनरीसारखा गुलाबी.

असं या गुलाबी दिवसानं ऊन कलतं व्हावं आणि मग शरदातली गुलाबी संध्याकाळ मेटीला यावी. आकाशात गुलाबी रंगांची उधळमाधळ हा स्ट्रॉबेरी आइस्क्रीमच्या गुलाबी, हा खास गुलाबाने उसना दिलेला गुलाबी, हा पेरूच्या गऱ्याचा गुलाबी, हा खास चोळीच्या खणालाच शोभेल असा कुसुंबी गुलाबी, हा सतरा ते वीस एवढं चारच वर्षांचं आयुष्य असलेला नाजुक गुलाबी. अशी ह्या गुलाबी रंगाच्या गोबऱ्या छटांशी ओळख पटवीत

असतानाच चोहोबाजूला उधळलेले गुलबाशी, किरमिजी, कलिंगडी, जास्वंदी आणि त्यातच मिसळलेले केतरिया, मोतिया, राजवर्खी, अंजिरी असे अनंत रंग सळसळत असावेत. वाढलेल्या वयाच्या वर्षांचे रंगही भराभर पालटत वीस पंचवीस वर्षांपूर्वीच्या गुलाबी रंगाशी गुजगोष्टी करायला लागावेत.

गुलमोहराच्या झाडाखाली उभं राहून, कुणाची तरी पाहिलेली गुलाबी वाट आठवावी. कॉलेजच्या कॉरिडोअरमधून चालताना, आता कुणाचे तरी ते लबाड डोळे आपल्याला न्याहाळीत असतील या जाणिवेनेच गुलाबी झालेला आपला चेहरा आठवावा. हॉकी खेळताना, सुटलेल्या वेणीची गळून पडलेली आणि मागाहून कुणीतरी उचलून दिलेली गुलाबी रिबन आठवावी. लायब्ररीत आपल्या नेहमीच्या खुर्चीवर, पुस्तकांचा गट्ठा सावरीत बसायला यावं, टेबलावर पुस्तक मांडायला म्हणून हात पुढं करावा तर कुणीतरी तिथं आणून ठेवलेल्या एका टपोऱ्या गुलाबाच्या फुलाचा स्पर्श आठवावा. सबंध दिवसात विनाकारण फुटलेल्या हसूरुसूंच्या गुलाबी उकळ्या आठवाव्यात. कलत्या उन्हात पिकनिकहून परतताना वाळूचा समुद्र किनारा आणि क्षितिजाचा गुलाबी रंग आठवावा. पाण्याच्या ग्लासमध्ये घातलेल्या एखाद्याच पोटॅशियम परमँगनेटच्या कणानं गुलाबी झालेल्या पाण्यासारखी, विशीच्या अद्भुत स्पर्शानं संपूर्ण कायापालट झालेली ती गुलाबी दुनिया आठवावी.

गुलाबी रंग टिकाऊ नाही म्हणतात. गुलाबी रंगाचं कापड लवकर उरंगतं. भितीला गुलाबी रंग दिलात की वर्षभरातच पुन्हा रंग काढण्याचा खर्च येईल अशी धमकी रंगारी घालतात. गुलाबी नखरंगाची बाटली तर नुसती टेबलावर उघड्यावर ठेवलेली असली तरी तिची मूळ गुलाबी छटा ती गमवून बसते. गुलाबी पडदे उन्हाला बळी पडतात. गुलाबी चपला फार लवकर त्या रंगावरचा आपला हक्क सोडतात. गुलाबी पत्रकागदाचा उपयोग तर वर्ष दोन वर्षांचाच. गुलाबी रंग हा असा या दारानं येतो आणि तसा त्या दारानं सटकायला बघतो. इथंच तर आपली कसोटी.

या जाणाऱ्याला असं सहजासहजी जाऊ द्यायचं नसतं. गुलमोहराखाली उभं राहून पाहिलेली ती गुलाबी वाट आता संसारसुखानं बहरलेल्या पिंपळाच्या वृक्षाखालून जात असते. तिचं गुलाबीपण अधिक गहिरं झालेलं असतं. बाळाचं मऊ जावळ, शाळेतील प्रगतीपत्रक, खेळातलं प्रावीण्य, कलेतलं

नैपुण्य. ही त्या पिंपळाला फुटलेली गुलाबी पालवीच. वर्षागणिक समृद्ध होत चाललेलं आपलं भावजीवन, मनुष्यस्वभावाच्या अगणित छटांची आपली होत असलेली ओळख, साहित्यसंगीतकलेविषयीची आपली वाढती जाण, आपल्या छोट्याशा सांसारिक विश्वाबाहेरची होत असलेली या अवाढव्य वैश्विक पसाऱ्याची आणि आपली प्रगल्भ नेणीव, रोजच्या अडचणीतून मार्ग काढताना आपण बांधीत आणलेला आपला उत्साही आत्मविश्वास, वडीलधाऱ्यांचं छत्र आणि बालबच्यांच्या भराऱ्या, आपल्या महत्त्वाकांक्षा, आपल्या सहचराच्या अनेकविध क्षेत्रात झळकत राहिलेल्या कर्तबगारीच्या पताका, आपण केलेला प्रवास, त्यातून झालेली आपल्या या आईमातीची आणि त्या मातीतल्या आपल्या भावाबहिणींची ओळख, कुण्या एकेकाळी घट्ट कडवट असलेले आता अनेक वर्षाच्या वाटचालीनंतर विरघळून गेलेले धर्मीय, प्रांतीय आणि जातीय भेदाभेद, या सगळ्याचा रंग गुलाबी नाही तर दुसरा कोणता? दशकांतून घडत आलेल्या असंख्य घटनांवर मनाचं जे पेपरवेट ठेवायचं ना, ते गुलाबी रंगात बुडवून ठेवायचं की मग सगळा जीवनपट गुलाबीच दिसत राहतो. रंग फिकटतो तो मनाचा. पाकळ्या सुकतात त्या मनाच्या. हसू मावळतं ते मनाचं. कमळ मिटतं ते मनाचं.

या मनाच्या भांड्यातलंच पाणी वरचेवर बदलत राह्यला हवं. त्यात थोडा उत्साह, थोडी जिद्द, थोडा आत्मविश्वास, थोडी चिकाटी, थोडं समाधान आणि थोडी भविष्याबद्दलची ओढ असं मिश्रण घातलं ना की ते गुलाबी होतं आणि रोज उगवणाऱ्या दिवसाच्या, त्यामागून येणाऱ्या महिन्याच्या आणि त्याच्या पाठोपाठ येणाऱ्या वर्षाच्या धाग्यांनी विणलेल्या जीवनचुनरियाचा रंग सदैव गुलाबीच राहतो.

♣ ♣ ♣

१५ ◇ हसहसुनी गाली

परवा कुठंतरी वाचलं की डॉक्टरच्या औषधापेक्षा डॉक्टरचा हसरा चेहराच रोग्याला अर्धा बरा करतो. मला वाटलं डॉक्टरच का कुणाचाही हसरा चेहरा आपल्या अर्ध्या चिंता मिटवितो. साधं बसचं तिकीट काढताना कंडक्टरने खेकसून 'बोलो' न म्हणता जरासं माफक हसून विचारलं 'हां जी' तरी किती बरं वाटतं. मग अगदी उन्हाच्या अंगाची जागा मिळालेली असली तरी कसं क्षणभर चंद्रकिरणाचा शीतल स्पर्श होऊन गेल्यासारखं वाटतं. लायब्ररीमध्ये पुस्तकं देणाऱ्या माणसाने निदान डेल कार्नेजीचं 'मित्र कसे जोडावेत' हे पुस्तक देताना तरी बेताचं हसून द्यावं ही अपेक्षा काय भरमसाट आहे? नाटकाच्या दिग्दर्शकाने, गाण्याच्या गुरुने, नृत्याच्या शिक्षकाने, हसऱ्या चेहऱ्याने विद्यादान केलं तर त्या विद्येचा विद्यार्थ्यावर आणि प्रेक्षकांवर दामदुपटीने परिणाम होईल. बँकेतला कॅशियर, कॉलेजातले क्लार्क, रेल्वेचे तिकीट तपासनीस, म्युनिसिपालिटीचे इन्स्पेक्टर्स, साधा लिफ्टमन, टॅक्सीवाला, ट्रॅफिक पोलीस, हॉटेलातला वेटर यांनी हे 'हसूहसूचं' व्रत घेतलं ना तर आपल्यासारख्या या गरीबडया देशातल्या गरीबडया माणसांनासुद्धा उगाचच श्रीमंत झाल्यासारखं वाटेल.

चिंता कुणाला नाहीत. जन्म म्हटला की जसं मरण येणारच तसा संसार म्हटला की चिंता येणारच. आज काय तर नळाला पाणीच आलं नाही. पण म्हणून काय डोळ्यांना पाणी आणायचं. आज काय तर शाळेच्या वह्यांचाच तुटवडा; म्हणून आपल्या कपाळावर वहीतली पट्टी काढून चिकटवल्यासारखी चिंता चिकटवायची. आज काय तर साखरच गायब की झाला चेहरा क्विनाईनची गोळी घेतल्यासारखा कडवट. झाला असेल एखाद्या विषयात

बंड्या नापास; पण म्हणून लगेच बापाचा आभाळ कोसळल्यासारखा चेहरा. ठरवल असेल लेकीनं परधर्मीय प्रियकराशी लग्न, की लगेच मातोश्रींचं सुकलेल्या खजुराइतक्या आठ्या पडलेलं कपाळ.

हसायचीसुद्धा एक कला असते. खुषीत असताना हसायचं असतं हे काही शिकवावं लागत नाही. पण चिंताचक्रात गुरफटलेलं असतानाही कपाळावर आठी न घालता गालावरची खळी कशी कोमेजू द्यायची नाही हे साध्य करायला थोडा प्रयत्न करायला हवा. मनाचा जोर लावायला हवा. आपल्यापेक्षाही अधिक दुःख असलेली माणसं या जगात आहेत याची आठवण ठेवायला हवी. या मुंबई शहरात एवढे प्रशिक्षणाचे कोर्सेस आहेत, त्यात 'हसरं कसं रहायचं' हे शिकवायचाही एक कोर्स हवा.

दिवसभराच्या कामानंतर बसच्या क्यूमध्ये उभं राहिल्यावर, नुसतंच ही बस अजून कशी येत नाही, रोजचीच ही कटकट, काय वैताग, ही मुंबई म्हणजे अशीच. असे आंबट विचार आणि तेवढाच आंबट चेहरा करून दर दहा सेकंदानी घड्याळात बघण्याऐवजी, जरा समोरच्या फूटपाथवर फुललेला, पावसातही अजून लाल फुलोरा न गळलेला गुलमोहोर पहावा ना. घट्ट मिटून घेतलेल्या ओठाच्या पाकळ्या नक्की थोड्याशा विलग होऊन, चेहऱ्याला हसरी कळा येईल.

आपण नोंदविलेलं पुस्तक अजून लायब्ररीत परत न आल्याचं बघून, वेळेवर पुस्तक परत न करणाऱ्याच्या नावानं तळतळाट न करता आजपर्यंत न पाहिलेले असे सुंदर चित्र असलेले पक्षांचे, फुलांचे डोंगरांचे, ढगांचे असे व्हॉल्यूम्स् बघावेत ना एखाद्या वेळी हातच्या बोटावर मोजता येणाऱ्या पक्षांची नावं मोजता येणारे आपण आणि प्रत्येक पानावर निराळ्या रंगांची आणि आकारांची छापलेली ती आफ्रिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोप अशा अठरापगड देशांतल्या पक्ष्यांची चित्रं पाहून चिडकेपणाची जागा हसरेपणा नक्कीच घेईल.

साखर नाही. एकदा कळलं ना साखर नाही. ठीक आहे ती कसर गोड बोलण्याने भरून काढू या ना. साखरेचा चहा फक्त सणासुदीला, एरवी अखंड बारा महिने गुळाचाच चहा पिणारे आपले कितीतरी देशबांधव आहेत. ते काय कायम कपाळाला आठ्या घालून आयुष्य जगतात. आपणही थोडी

गुळाची चव चाखावी. नाहीतर उगाच कुणीतरी म्हणेल गा ० ० ० गुळाची चव काय.

घरातलं आजारपण कर्त्या माणसाच्या त्रासिक चेहऱ्यानं कमी न होता वाढीवच होणार. त्याच कर्त्या माणसानं एखादं गुलाबाचं फूल जरी आणलं ना तर आजारी माणसाला तर टवटवीत वाटेलच पण घरातले इतर मिट्टूही जरा थट्टामस्करीच्या मूडमध्ये येतील.

बिनभांडवलाचं हे हसू आपण इतकं जपून वापरण्याचं काहीच कारण नाही. जरा दुसऱ्या देशात गेलं ना की हा हसरा बगीचा सर्वत्र फुललेला दिसतो. विमानातली हवाईसुंदरी हसून स्वागत करते आणि निदान त्यावेळी तरी ते हसू ती इतकं उमदं करते की आपल्या डोळ्यादेखत एखादी कळी टचकन उमलून तिचं फूल व्हावं आणि ते हसऱ्या पाकळ्यांनी आपल्याकडे पहात रहावं. विमानात म्हणा, आगगाडीत म्हणा, बोटीत म्ह ा, बाजूला बसलेला मिट्टू लगेच हॅलो म्हणून त्याची बोलायची इच्छा दर्शवील. हॉटेलमधला वेटर पक्ष्यासारखी गोडशी शीळ घालीतच हसऱ्या चेहऱ्याने आपली ऑर्डर घेईल. दुकानातल्या विक्रेत्या पोरी तर हसत हसत अर्धं दुकान आपल्या गळ्यात घालतील. तीच गोष्ट थिएटरमध्ये आपली सीट दाखवणाऱ्या डोअरकीपरची. बँकेत, मोठ्या डिपार्टमेंट स्टोअर्समध्ये आपले ट्रॅव्हलर्स चेक्स कॅश करणाऱ्या खिडकीपाठच्या युवकाची, बसटूरवर शहरातली महत्त्वाची ठिकाणं समजावून सांगणाऱ्या टूरिस्ट गार्डची, हसरी छबी कशी गोड छाप मारते.

जाता जाता आठवलं. लॉस अँजेलिसमधलं हॉलिवूड जगप्रसिद्ध आहे. तिथे जे युनिव्हर्सल स्टुडिओज आहेत त्यांची एक टूर असते. एक सबंध टेकडीच्या टेकडी या युनिव्हर्सल स्टुडिओजच्या मालकीची आहे. एका छोट्याशा ट्रॅम कारमधून या स्टुडिओची एक फेरी घडवतात. त्यात मग तळ्यातून मगर अंगावर येते, ट्रॅमकार पाण्यात बुडता बुडता वाचते, पुलावरून कोसळता कोसळता सावरते, सारा वेळ ती जी मार्गदर्शन सुंदरी असते ती हसऱ्या चेहऱ्याने सारखी चिवचिवत असते. तर या कोसळलेल्या लाकडी पुलावरून जेव्हा आमची ट्रमकार सुखरूप बाहेर पडली आणि आम्ही सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला त्यावेळी ही सुंदरी म्हणते कशी की लोकहो घाबरलात ना ? आता तुम्ही विचाराल की हा पूल इतका कसा पोचुद म

बनवला होता तरी कोणत्या वुडचा ? त्यावर मी एवढंच सांगीन की तो बनवला होता हॉलीवुडचा !


आपण भारतके सत्पुरुष आणि सन्नारी शेकडो तऱ्हेचे उपास आणि व्रतं करतो. आठवड्यातून एकदा जरी हे हसण्याचं व्रत धरलं ना तरी आपल्या या लाडक्या भारत देशाची हसत हसत प्रगती होईल अगदी फोटोग्राफरलासुद्धा आपल्याला सांगायला लागावं ना. ' आता जरा हसा ' आणि मग क्लिक.

तसं फोटोतलं नको. खरंखुरं हसू हवं. श्वासोच्छ्वास जितका आपसूक तितकंच हे हसू आपसूक यायला हवं. वसंतात झाडाला नवी पालवी जितकी सहज फुटते तितकं सहज गालांना हसू फुटायला हवं. भरलेल्या ढगांतून धारा जितक्या उत्कटतेनं कोसळतात तसं फुललेल्या चेहऱ्यातून हसू बरसायला हवं. समुद्राच्या लाटा उसळून फुटायच्या जशा कधी थांबत नाहीत तसं. आपल्या चेहऱ्यावरचं हसू फुटायचं कधी थांबूच नये

या कोवळ्या हास्यानेच तर बाळाची माया लागते. या मुग्ध हास्यानेच तर परकरातल्या कळीचं फूल होतं. या आकर्षक हास्यानेच तर फुलाचा सुगंध कुण्या भ्रमराला मोह घालतो. वेदना जशी माणसाच्या जन्माबरोबरच उगवते तसंच हसूही त्या वेदनेच्या हातात हात घालून प्रवास करतं. फरक इतकाच की वेदना ही मनाच्या आतल्या गाभ्यात ठेवायची असते आणि हसू दाताच्या कुंदकळ्यांतून उमलवून ओठांच्या पाकळ्यांनी चौफेर उधळवायचं असतं. म्हणून तर कुणीतरी कुणाला तरी म्हणतं—

इसहसुनी गाली कितिकदा लावियले वेड तू..

♣ ♣ ♣


मराठी ग्रंथ संग्रहालय संघ
दा. क्र. 2284
23200
निबंध
१७।९८
शाखा

१६ ◇ "नाही नाही म्हणत तिने"

"अहो पण मग त्यांनी सरळ नाही सांगायचं होतं. इतके दिवस वाट कशाला पहायला लावली?"

"आता अगदी स्पष्ट सांगा. ओठात एक आणि पोटात एक नको."

"थकले रे बाबा मी अनंताला सांगून. तो मुळी काही बोलतच नाही. मी बोल बोलते. हा ढिम्म बोलत नाही. असं सांगून पहाते, तसं सांगून पहाते. पण हा एक अक्षर बोलेल तर शपथ."

"अरे पण विषय काढणारच कसा. काढली रे काढली गोष्ट की काढलाच याने तेथून पळ."

त्यापेक्षा सरळ नाही सांगावं....

....सरळ नाही सांगणं एक तर अवघड असतं. सरळ नाही ऐकणं त्याही-पेक्षा अवघड असतं. आपण सगळे जगत असतो. ते 'आशा' नामक एका संजीवक भावनेवर. आशा आपल्याला जगण्याचं बळ देते. आशा आपल्याला दुसऱ्या दिवसाची वाट पाहण्याची शक्ती देते. आशा आपल्याला भविष्याकडे पाहण्याचं सामर्थ्य देते. आशा आपल्या मनाला टवटवी देते, तजेला देते, दिलासा देते. आपण आशेने विचारलेल्या एखाद्या प्रश्नाला, समोरच्या माणसाने जर सरळ 'नाही' असं उत्तर दिलं तर आपल्या मनातल्या त्या आशा नामक जीवनशक्तीचा पार चक्काचूर होतो. जगायची आपली इच्छाच त्या क्षणापुरती कोसळून जाते. भोवतालचं सर्व जग दुष्ट, दुटप्पी, दुःस्वासी दिसायला लागतं. पण हेच जर त्या माणसाने सांगितलं–बघू....विचार करतो....एका आठवड्याने या....आता मी जरा कामात आहे....तर आपल्या मनाचं उघडलेलं पॅराशूट फटदिशी मिटून आपण जमिनीवर कोसळत नाही. काही दिवस का होईना

तसेच हवेत तरंगत राहातो. सुखात, आशेत.

म्हणून तर आपल्या पूर्वजांनी संस्कृतमध्ये एक छानदार सुभाषित रचून ठेवलं आहे...

मौनं कालविलम्बश्च प्रयाणं भूमिदर्शनम् ।
भृकुट्यन्यमुखी वार्ता नकारः षड्विधः स्मृतः ।

मौन—काही बोलायचंच नाही तोंडात गुळणीच धरायची.

कालविलम्ब—बघू. आठवड्याभराने बोलू. पंधरवडाभर मी गावाला जातोय...आल्यावर बोलू.

प्रयाणं— जरा आलोच हं. एक महत्वाचं काम आहे. तेवढं उरकून येतो म्हणून निघूनच जायचं.

भूमिदर्शनम्—बोलायचंच नाही. नुसतंच अंगठ्याने जमीन उकरत रहायचं.

भृकुटी— रागारागाने भुवया चढवून आवाज चढवायचा, म्हणजे विचारणारा बिचारा गांगरून गप्प राहतो.

अन्यमुखी वार्ता— म्हणजे आपण यांच्याशी बोलावं तर, यांनी तिसऱ्याशीच संभाषण सुरू करावं, आपल्याला डावलून.

असा सहा तऱ्हेने नकार देता येतो. सरळ नाहीच सांगायला पाहिजे असं नाही हा नकार ऐकणाऱ्याला काम करण्यापासून अडवून ठेवतो. फक्त एकाच बाबतीत नकार आला म्हणजेच काम फत्ते होणार असं समजावं. समोरचं माणूस जेव्हा नाही म्हणत असतं तेव्हा ते खरं हो हो असतं असं चतुर लोक पक्कं समजून असतात.

जसं शाकुंतलात दुष्यंत समजतो आणि प्रेमाच्या साम्राज्यात वल्लभ समजतो. रमणीचा नकार म्हणजे पुढल्या प्रीतिसाफल्याच्या होकाराची नांदीच. या साम्राज्यात नकाराने हतबल न होता, आगे कदम सरसावयाचा असतो. नाहीतर दुष्यंतासारखा एवढा रसिक राजा, पण मुग्ध शकुंतलेच्या वाचिक नकाराचा वाच्यार्थच खरा मानून नंतर हळहळत बसला की....

नाही नाही म्हणत तिने तोंड फिरविले ते सुंदर मुख....

पण जिज्ञासूंनी अधिक अभ्यासाकरता अण्णासाहेब किर्लोस्करांचं शाकुंतलच जरा उघडून पहावं ना.

♣ ♣ ♣

१७ ◇ लज्जा मोरी

सहासात जणींचा घोळका हसत खिदळत चालला होता. पाठूनही मोठा छान दिसत होता. कुणी सलवार-कमीजमध्ये होती, कुणी शर्टविजारीत; कुणी स्कर्टब्लाउझमध्ये, कुणी मिडीत. साडीचं नाव नव्हतं. अलीकडल्या कॉलेजमधल्या मुली असतात तशाच विविध भाषी आणि विविधवेषी होत्या त्या सगळ्या. केसांपासून पायापर्यंत काय काय बहुढंगी तऱ्हा केलेल्या. नेमकं काय बोलत होत्या ते नव्हतं ऐकू येत. पण मिनिटामिनिटाला हसू फुटत होतं. थट्टामस्करी होत होती. मधेच एखाद्या लोकप्रिय चित्रगीताच्या एकाद-दुसऱ्या ओळीची लकेर ऐकू येत होती. पाठीच होते ना मी. त्यांची गंमत बघत मीही गंमतीगंमतीनं चालत होते....आणि मधेच त्यातल्या एका गुलाबपरीची फॅन्सी, सहा इंच टाच असलेली चप्पलच तुटली. आता आली का पंचाईत. अय्या, उय्या, कशी ग तू वेंधळी बगैरे देवघेव होऊन, आता पुढे काय करायचं त्याचा खल सुरू झाला. शेवटी बऱ्याच विचारानंतर—आता चल तशीच हळूहळू—अशी मसलत होऊन घोळका पुन्हा चालायला लागला. तुटलेल्या चपलेची मालकीण पाय ओढत ओढत कशीबशी चालत होती घोळक्याबरोबर वरकरणी गप्पा चालल्या होत्या. पण कुणाचंच खरं चित्त नव्हतं गप्पात. आपल्याला कुणी बघत तर नाही. आपल्याला कुणी हसत तर नाही इथेच सगळे लक्ष. मधाचा त्यांचा तो स्वच्छंदी खळाळ साफ बंद पडला होता. मला राहवेना. मी त्या सात पऱ्यांना थांबवलं आणि माझ्या परीनं म्हटलं–"का ग ? तू सिंडरेला का नाही बनत ?" अचंब्याने घोळक्याने डोळे विस्फारले. मीच पुढे म्हटलं—

"आता तुटलीच आहे चप्पल, तर सरळ हातात काढून घे ना ती आणि

उंच टाचेमुळे लंगडी घालत चालल्यासारखं वाटलं तर दुसरीही काढून हातात घे. झाली सुट्टी. निदान चालायला तरी आराम. "

घोळक्याचे डोळे आणखीच विस्फारले—

" शीऽऽ. म्हणजे अनवाणी चालायचं ? मला बाई लाऽऽज वाटते. "

हीच हीच ती भारतकी सन्नारीकी आज शतकानुशतकं चालत आलेली लाज. साहित्यात ती छान शोभून दिसली. पण प्रत्यक्ष आयुष्यात मात्र या लाजेने नाही नाही ती संकटं आणली. डोळ्यांनी कमी दिसतं सांगायला बायको लाजली आणि कालांतराने दृष्टी गमावून बसली. कानांनी कमी ऐकू येतं सांगायला बहीण लाजली आणि जन्माची बहिरी होऊन बसली. मोठ्याने बोलायची आणि मोठ्याने हसायची लाज बाळगून, घरातल्या कोवळ्या परकऱ्या कळ्या, अकाली गंभीर झाल्या. पावसापाण्यात देखील लाजेपोटी ओल्या साड्यांचं जड ओझं दिवसभर बाळगीत, बायाबापड्या सर्दीतापाच्या धनिणी झाल्या. शाळेत मास्तर बेरीज करायला चुकले तरी त्यांना सांगायचं कसं ? मधली लाजेची भिंत ओलांडायची कशी ? मनात भरलेल्या मितवाऐवजी, मनात नसलेल्या बुवांशी आपलं लग्न लावून देत असलेल्या जन्मदात्याला अडवायचं कसं ? लाजेशी मुकाबला करायचा कसा ? मला हा रंग आवडतो, मला हा पदार्थ आवडतो, मला हे पुस्तक आवडतं, मला हे स्थळ आवडतं, सगळं सगळं सांगावसं वाटलं. म्हणून मान उंचावली, तर लाजेने ती पुन्हा लवली. डोळे वर केले तर लाजेने ते मिटले. तोंड उघडलं, तर लाजेने दातखीळच बसली.

लाजू नको सांगणं सुद्धा अवघड झालं. कारण आमच्या चित्रातली लाजवंती निहायत सुंदरच दिसत आली. ती कललेली मान, ते मुडपलेले ओठ, ते अर्धवट उघडलेले डोळे, ती आकसून घेतलेली कमनीय काया आणि ते एका हाताने ओढून धरलेलं पदराचं टोक ! माथ्यावर घट, चेहेऱ्यावर रुळणारी केसांची एकच बट आणि अंगाला घट्ट लपेटलेला तो पट अशा आमच्या शिल्पकन्यांनी आजवर कि येकदा आम्हाला भुरळ घातली आहे. स्त्रीचा सर्वात मोठा अलंकार म्हणजे तिचा विनय म्हणजेच तिची लज्जा असंच आमच्या साहित्याने आमचं चित्र रेखाटत आणलंय.

' घूंघटा ना खोलो पिया
लाज आवत मोरा जिया '

अशी लज्जायुक्त आळवणी करणाऱ्या आमच्या गायिकांनी आजवर आनंदाचे कित्येक क्षण त्यांच्या श्रोत्यांना दिले आहेत. वृंदावनवासी त्या कन्हैयाची गोपिकांची भरिगगरि तोडून, त्यांना भिजवून, त्यांची बंभेरी उडवून मग ही त्यांची विनंती.

" मोहे लाज आवत गिरीधारी "

ऐकून तृप्त होण्याची कथा, आम्ही आजही सुरांतून ऐकत असतो.

तिथे ते शोभलं. कमळाच्या पानावर पाण्याचा थेंब मोती होऊन शोभतो. पण तोच शाईच्या ओल्या अक्षरावर पडला तर त्याचा कुरूप, बेढब डाग बनतो. कृष्णाची मुरली ऐकून देहभान विसरलेल्या राधेचा गळून पडलेला पदर ठुमरीत खुलून दिसतो अ णि एखाद्या रोडरोमिओने मारलेल्या शिळेला, लाज बाजूला सारून दिलेलं सणसणीत प्रत्युतर हे आधुनिक मुलीला शोभून दिसतं. संस्कारांचा वारसा जरूर असावा. तेच त्यांचं ओझं झालं तर ते दूर केलेलंच अधिक उपयुक्त. पनियाभरनला चाललेल्या गोपिकेला, जेव्हा तो माखनचोर रस्त्यात आडवतो तेव्हाची तिची लज्जायुक्त मुद्रा नृत्यात खूप विलोभनीय दिसते. पण आपल्या आजारी माणसाकरिता एखाद्या पाण्याची टंचाई असलेल्या हॉस्पिटलमधून, पाणी मिळविण्याकरता, लाज बाजूला करूनच, पुढे सरावं लागतं. त्यावेळी ती आक्रमक मुद्राच अधिक सुंदर दिसते. भर दरबारात विटंबना होत असताना ' लज्जा मोरी रे राखो श्याम हरी ' असा केलेला धावा द्रौपदीला शोभला. पण आज कुणी छेड काढली तर, लाजकी ऐसी तैसी म्हणून त्या छेड काढणाऱ्याला अद्दल घडवली नाही तर ते आधुनिक सुकन्येला कसं शोभेल ?

प्रत्येक शब्दाची, भावनेची एक विशिष्ट जागा असते. त्याच जागी त्याची शोभा. आभाळात लखलख करणारी चांदणी तिथून निखळली की झालाच तिचा फत्तर. संसार जीवनमय करणारी नदी, पुराने फुगली की केलाच तिने सत्यानाश. हसू आण आंसू आपापल्याला जागीच शोभून दिसतात. अवेळी येणारं हसू वेडाची करुण जाणीव करून देतं. मिनिटामिनिटाला फुटणारे गहिंवर ते दुःख कृत्रिम असल्याचा भास निर्माण करतात. साधलेल्या रंगसंगतीत, एखाद्या

रंगाचा फाजिल वापर, त्या चित्राचा पोत बिघडवतो आणि त्या रागात नसलेल्या एखाद्या असुर सुराच्या वापराने, सुंदर उमललेलं नादविश्व भक्ककन मिटून जातं.

लाजेचं तसंच आहे. "आता पुन्हा केव्हा भेट ?" या प्रश्नाच्या उत्तरात तिची फिट्ट जागा आहे. पिचलेली बांगडी काढून टाकताना, नव्या नवरीच्या गालावर उमटण्याचा तिला हक्क आहे "सैया तोरे नैना जादू भरे" ऐकताना, ऐकणारीच्या डोळ्यांत गोळा व्हायचं तिला आमंत्रण आहे. लज्जेचं हे तलम रूप लोभस आहे राजस आहे. पण ते तिथंच शोभतं. दिवा रात्रीच लावायचा असतो. दिवसा त्याचं महत्वच नाही. भलत्याच ठिकाणी जी उपटते ती लाज नव्हे. ती भीती ते दडपण. ते भय. ते घात करतं. लाज सुंदर असते. भीती कुरूप असते. अन्याय ती घडवते. अत्याचार तिच्यामुळे होतात. आक्रंदन ती करायला लावते.

चप्पल तुटल्याने पाय फरफटत आणि बरोबर लाजेलाही फरफटत नेणाऱ्या त्या मुलीला मला हेच सांगायचं होतं, की अग, तुटकी चप्पल हातात उचलून घ्यायची तुला लाज नाही वाटत आहे.... भीती वाटतेय भीती. हो, आजूबाजूचे लोक काय म्हणतील ही भीती. आणि या भीतीपोटी चाललेली तुझी फरफट अगदी कुरूप दिसतेय. तीच चप्पल सरळ हातात घेऊन निर्भयपणे चालायला लागलीस ना, तर चांगल्या चालीची दिसशील. धीट दिसशील आणि म्हणूनच खरी सुंदर दिसशील.

♣ ♣ ♣

१८ ◇ सोस...

परवा माझ्या एका सुगरण मैत्रिणीनी जेवायला बोलावलं होतं. नवऱ्या-सकट. इतरही दोनतीन जोडपी होती. जेवणाच्या आधी तिने पन्हं दिलं. तिच्या पुढच्या सुगरणपणाची झलक या पन्ह्याने अचूक दिली. अगदी सगळं कसं जेवढ्यास तेवढं पडलं होतं. मीठ-साखरेचंप्रमाण अगदी पार्किंग लॉटमध्ये बऱ्याचशा मोटारी आणि दोनतीनच स्कूटर्स असाव्या तसं करेक्ट झालं होतं. नाहीतर काही ठिकाणी साखरेनं तोंड अगदी ट्रॅफिक जॅम झाल्यासारखं मिठ्ठू होतं. वेलची-जायफळसुद्धा कसे अगदी एखाद्या समंजस सासूने आपल्या अतिमॉडर्न सुनेलासुद्धा समजून घेऊन कुटुंबातला मनमोकळेपणा खेळता ठेवावा तसे पन्ह्याची रुची वाढवीत होते. आणि त्या मधूनच चमकणाऱ्या महागाईच्या केशराच्या काड्यादेखील आपल्या भारतीय दृष्टीला कपाळाला कुंकवाच्या टिकलीनेच खरी शोभा आल्यासारखं वाटावं तशा त्या पिवळ्याजर्द पन्ह्याला शोभेच्या टिकल्या लावीत होत्या. आम्ही सगळे अगदी चवीचवीनं आस्वाद घेत होतो त्या पन्ह्यांचा. विशेष करून आमचे सर्वांचे नवरे. असं स्वादिष्ट पन्हं घरात कधीच मिळालं नसल्याची साक्ष त्यांच्या त्या 'ब्रह्मानंदी लागली टाळी'च्या तोंडावरच्या भावावरून स्पष्ट दिसत होतं. त्यातल्या एका नवरोजीला शेवटी रहावलं नाही आणि त्याने अगदी खणखणीत रोख पावती देत म्हटलं—

"वाहवा. क्या बात है. पूर्णिमा, असं पन्हं मी जन्मात प्यालेलो नाही. जीओ बाई. सो बरस जीओ."

झालं. त्याच्या धर्मपत्नीतली स्वयंपाकपरायण आर्यपत्नी जागी झाली. लगेच तिने, तोंडावरचं मंदमधुर हसू, मोठ्या प्रयासाने जागच्या जागीच

ठेवत अगदी सहज विचारल्यासारखं विचारलं—

'ए पूर्णिमा, बाई फॉर्म्युला तरी सांग तुझा करून तरी घालीन यांना.'

इथे मला राहवलं नाही. पन्ह्याचा तो अमृततुल्य घोट घाईघाईने गिळत मी म्हटलं—

"अग, पण राहू दे ना तिची स्पेशालिटी तिच्याजवळ. पन्हं ही काही रोज प्यायची वस्तू नाही. वर्षातून कधीतरी एखाद् दुसऱ्यांदा त्याचं कौतुक, आणि तसं वाटलं प्यावंसं तुम्हाला की सरळ पूर्णिमाला सांगा की आम्ही ते तुझं खास, फक्त तुलाच जमणार आणि तू तुझ्या हातानं तुझ मायाळू मन घालून केलेलं पन्हं प्यायला येणार आहोत बघ कशी खुषीत करून घालील हे असंचा सोन्याचं सुगंधी पन्हं – असं म्हणत मी उरलेलं पन्हं संपवीत पूर्णिमाला मल आणखी पन्हं हवं अशी डिमांड दिली.

तर हा आम्हा बायकांचा सोस असतो ना हा अगदी अनाठायी असतो असं मला नेहमीच वाटतं. प्रत्येकाचं काहीतरी वैशिष्ट्य असतं. कुणाचा भरतकामाचा टाका असा खरा दिसतो की तसबिरीतल्या मोरावर खरीच पिसं डकवली आहेतसं वाटावं. कुणाला रंगसंगतीची अशी सूक्ष्म-दृष्टी असते की, दारातल्या पायपुसण्यापासून ते बाथरूममधल्या प्लास्टिकच्या रंगीत बालदीपर्यंत सगळी दुनिया रंगरंगीली. कुणाचा हात असा हिरवा की कुंडीत लावलेल्या प्रत्येक झाडावर वनदेवीनं जादूची कांडी फिरवल्यासारखी पानबहार फुलबहार आलेली. कुणी छोटयाशाच केसांची अशी काही कुंतलशोभा करते की वाटावं ही दररोज ब्यूटीपार्लरमध्ये जाऊन येते की काय कुणी साडी इतकी सुंदर नेसते की वाटावं हिने मॉडेलिंग करावं. कुणाच्या ब्रशमध्ये रेषेची ताकद असते तर कुणाच्या गळ्यात गंधार वस्तीला असतो. कुणाच्या लेखणीत लय असते तर कुणाच्या हालचालीत शिल्प असतं.

हौसेखातर आपण काय काय शिकत असतो समावानही पावत असतो की चला आपल्यालाही इकेबानाची आकाशपृथ्वी आणि पाताळ दाखवता येतं. आपल्यालाही मॅक्सी शिवता येते. आपल्यालाही शिंपल्यांची फुल आणि मण्यांची बॅग करता येते. पण खरं सागू का–बळ ज्याचे त्यास ते.

ती कला किंवा कुसर जी काय असते ती नुसती बोटात नसते. त्या टांच्या हाताला जोडलेलं जे मन असतं ना त्याच्यात असतो तो जीवनरस.

शिकावं सगळं पण मानावं ह्या शिकवणाऱ्यालाच. उत्तम सतार वाजवणाऱ्याला काय उत्तम नृत्य करता येणार नाही? पण त्यात शक्तीचा व्यय होतो. म्हणून तर मोठमठे कलावंत, लेखक, शास्त्रज्ञ झापडं लावल्यासारखा एकाच गोष्टीचा ध्यास घेतात आणि त्यातच टोकाची उंची गाठतात. कुठलीही गोष्ट उत्तम साधायला त्याचा बराच रियाज करावा लागतो. गुरू सांगतो खरा; पण पुढे त्यांच्यात नैपुण्य मिळवायला ती गोष्ट शिष्यालाच घडवायला लागते. मग ते नुसतं आभाराचं भाषण असो की एखाद्या नाटकातली नायकाची भूमिका असो. गच्चीवर फुलवायचा बगीचा असो की टापटिपीनं ठेवायचं घर असो. डौलानं नेसायचं नऊवारी नेसणं असो की जिभेवर ठेवल्याबरोबर अलगद विरघळणारी बिरियानी असो.

म्हणून मी आपलं ठरवलंय. सगळ्याचा सोस नाही करायचा. स्वयंपाकाचा तर मुळीच नाही. आपले काय चार पदार्थ येतात करायला तेच मन घालून चांगले-चुगले करायचे. कुर्ल्यांचं म्हणजे चिबोऱ्यांचं खडखडं भारी आवडतं माझ्या नवऱ्याला. त्याची बहीण फक्कड करते ते. पण मी शिकायचं म्हणजे त्याचा जेव्हा सातआठ वेळा रियाज करीन तेव्हाच होईल त्याच्या बहिणीसारखं. आहे का मला एवढा वेळ? म्हणून सांगून टाकलं त्याला की पतिदेवा, कुर्ल्यांचं ते जे काय खडखडं आहे ते खायची आपल्याला इच्छा झाली ना की मी करीन आपल्या बहिणीला फोन. आपण दोघंही जाऊ तिच्याकडे आणि पोटभर खाऊ. कारण मलाही ते तितकंच आवडतं. आणि ती तिची स्पेशालिटी तुम्हाला करून घालताना तिला जो आनंद होईल तो मी कशाला हिरावून घेऊ, घरी करायला लागून?

म्हणून म्हटलं होतं मी त्या माझ्या मैत्रिणीला की बाई ग नको सोस करूस घरी पन्हं करायचा. आणि "त्यात पुन्हा एक खास मख्खी अशी असते" मी पुढं म्हटलं होतं की "तू कितीही छान केलंस, केशराच्या चार काड्या जरी जास्त घातल्यास तरी ते प्याल्यावर तुझा नवरा म्हणणार—

"नाही. म्हणजे झालंय बरं पण ऽ पूर्णिमासारखं नाही!"

आहे की नाही अफसोस. मग कशाला करावा तो सोस?

♣ ♣ ♣

१९ ◇ रात्र ही सरेल कधी ?

हरवलेली वस्तू जेव्हा अचानक सापडते तेव्हा काय आनंद होतो ! मग ते एखादं पुस्तक असो, छत्री असो, चष्मा असो, पत्र असो, चपला असोत, छडी, साडी, गाडी काही असो. हे मन सुद्धा कधीकधी हरवतं. कधी कुणा भीमसेनच्या स्वरात, कधी कुणा बिरजू महाराजाच्या कटाक्षात, कधी कुणा शंकराचार्यांच्या वेदांतांत, कधी रंगांत तर कधी गंधात असे कुठेकुठे. पण काही काळाने येतं बापडं आपसूक परत आणि करायला लागतो आपण आपले रोजचे व्यवहार. पण आयुष्यात माझी एकच हरवलेली वस्तू अजून सापडत नाही. खरं म्हणजे कधी सापडणारसुद्धा नाही. दरवेळी ती हरवली म्हणजे मला मोठी हुरहुर लागायची. अशी कशी डोळ्यादेखत हरवली बाई ही ही वस्तू. मी तर चांगली जागी. माझ्याबरोबरचे इतर सगळे लोक जागे. सगळ्याला कशी एक सुरेखशी गती. आणि एवढ्या सगळ्या सजग वातावरणात चक्क माझी वस्तू हरवते म्हणजे आहे तरी काय ?

अलिकडच्या माझ्या अमेरिकेच्या प्रवासातली गोष्ट सांगतेय् हो. न्यूयॉर्कहून शिकागोला जाताना हरवली. खूप शोधाशोध करूनही नाही सापडली. पुन्हा शिकागोहून लॉस् अँजेलिसला जाताना तीच गत. सॅन् फ्रँसिस्कोहून खाली ह्यूस्टनला जाताना तर या हरवाहरवीवर फारच चिडले. नंतर मला सवय झाली. त्यामुळे ह्यूस्टनहून डेट्रॉइटला जाताना मी अगदी स्थितप्रज्ञासारखी बसले होते. म्हटलं ठाऊक आहे काय होणार आहे हे. नेहमीप्रमाणे माझी ती वस्तू हरवणार आहे आणि आकाशपाताळ एक केलं तरी ती मिळणार नाही. तेव्हा उगीच अरण्यरुदन कशाला करायचं ? अमेरिकेत ही गत मग तिथून तो ॲटलँटिक महासागर पार करून लंडनला येताना तर भयंकरच नुकसान

न भरून येणारं. तीच रड लंडनहून मुंबईला परतताना.

म्हणजे एका ठिकाणाहून सकाळी नऊला निघावं. जरा न्याहारी वगैरे घेऊन चार तासांचा प्रवास. पण मुक्कामी उतरावं तर तीन वाजलेले. अरेच्या म्हणजे मधले दोन तास कुठे हरवले. असंच भर दुपारी एक वाजता निघावं, प्रवास चार तासांचा विमानात सुग्रास जेवण उरकावं. जरा डुलकी लागते न लागते तोच उतरायचं ठिकाण. डोळे उघडून पाहावं तर चक्क अंधार. अरे. वाजले किती? तर संध्याकाळचे सात. आणि नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये तिथे साडेचार पाचलाच अंधार. हरवले दोन तास.

अशी ही माझी वेळ हरवायची. काळपुरुषाचा घास. विमानातून उतरताना आपापली घड्याळं त्या त्या स्थानिक वेळेशी मिळवायची. पाचावरचा काटा निमूटपणे सातावर करायाचा. रूखरूख वाटायची. फुकट वेळ गेला म्हणून.

बाकी वेळ जातो म्हणून रात्र सरते रात्र सरते म्हणून दिवस येतो. दिवस नाहीसे होतात म्हणून महिने न् वर्ष उलटतात. बचपना जाऊन जवानी येते. ती जाऊ नयेशी वाटत असूनसुद्धा काळपुरुष आपला घास घेतच असतो. न बोलवताही बुढापा येतो. वेळ सारखा हरवत असतो. पण वेळ हरवत असतानाच अनुभव जमत असतात. पट उलगडत असतो. दान पडत असतं. जोडीदार मिळत असतो. घरट्यात चिवचिव वाढत असते. गेलेला प्रत्येक दिवस नवी आशा पालवून जातो. नवी उमेद देऊन जातो, नवं स्वप्न उमलवून जातो. काळपुरुष आपल्या जागी संतुष्ट असेल. आपणही आपल्या जीवनशक्तीचे नवनवे अंकुर पालवीत असतो. गेलेली वेळ परत येत नाही हे खरं. पण येणारी वेळ केवढी आशादायक असते. संजीवक असते. म्हणून तर लढाया जिंकल्या जातात. बर्फाची शिखरं पादाक्रांत होतात. पेनिसिलिनचा शोध लागतो सामने निर्णयी ठरतात. माणूस म्हणतो आज हरलो तरी उद्या जिंकेन.

हरविलेली वेळ काळपुरुषाची. कमावलेला अनुभव माझा. गेलेले क्षण न परतणारे. येणारे क्षण जिवंत होणारे. सरलेल्याची खंत करीत बाळून रेघोट्या काढीत बसलोतर येणाऱ्याची जोमदार पावलं त्यांचा ठसा कोठे उमटवतील. बाकीबाब् बोरकरांचा मंत्र म्हणूनच मला चिरतरुण वाटतो—

रात्र ही सरेल कधी, खंत नको प्राणा
पावला नखागणिक, नेत्र चालतांना

♣ ♣ ♣

२० ◇ शुभलाभ

आपल्या लग्न–मुंजीच्या दर्शनी दरवाजावर अलिकडे छान लाल कमळा-सारखी कुंकवाची अक्षरं लिहिलेली असतात, 'शुभलाभ' म्हणून ती बघून मी बरेच वेळा चक्रावते. क्षणभर तिथेच थांबते. कारण काही काही गोष्टी आपल्याला कधी लाभतच नाही बघा. एखाद्या गोंडस फुलावर बसलेलं देखणं रंगीबेरंगी फुलपाखरू, जसं कितीही सावधगिरीने आपण पकडायला गेलो तरी नेमकं ते उडून जातं. तशाच असतात या काही गोष्टी. अगदी साध्या साध्या गोष्टी. आपल्या मैत्रिणींच्या मुलीचे कपडे छान सफाईदारपणे शिवणारा तिचा शिंपी ती, आपल्याच सांगण्यावरून आपल्याकडे पाठवते. आपण अगदी पिडलेल्या असतो. त्याआधी कुण्णी कुण्णी म्हणून चांगला शिंपीच मिळालेला नसतो. त्यामुळे अगोदरच्या अनेक शिंप्यांनी बिघडविलेल्या कपड्यांची रास, इथून तिथून हौसेने नवीन घेऊन ठेवलेल्या, बिनशिवलेल्या नुसत्याच कापडांचं बोचकं, याचा पाहून पाहून वीट आलेला असतो. स्वतः शिवायचं म्हणावं तर सगळ्याच कला काही सगळ्यांवरच प्रसन्न नसतात. त्यामुळे शिवायचा प्रयत्न केलेल्या काही कपड्यांची चक्क 'मोरूची बाही' झालेली असते. आणि अशा वेळी नेमका देवासारखा, आपली मैत्रीण आपल्याला तिचा दैवी हातचलाखी असलेला शिंपी पाठवते. आपण माऽऽरे भरपूर वेळ खर्चून त्याला सगळे शॉर्ट कटस इथून लेस, तिथून चुण्या, इथे फॅन्सी बटणं तर तिथे खिशावर मनीमाऊचे ॲप्लिक वगैरे वगैरे काटछाट समजावून देतो. तोही सूत्रधार मधेमधे स्वतःच्या अनुभवी साक्यादिंड्या घालून आवृत्ती सुधारून वाढवून घेत असतो. शेवटी एकदा आपल्या सहनशक्तीचा दोरा तुटतो. मग तो सुईदोरा त्याच्या त्या

टोपीत खोचतो आणि उठतो. त्याच्याबरोबरच आपलं कपड्यांचं गाठोडं आणि चांगलं दैवही उठतं. आणि दरवाज्याबाहेर पडतं. ते पार अंतर्धान पावत. पुन्हा कधी कधी म्हणून आपल्या नजरेला पडत नाही! एकदा दुसऱ्या कुणा स्नेह्याने आपल्याकडे पाठवलेला, त्यांच्या कुटुंबाचा परंपरागत धोबी आणखी कुणी, त्यांच्याकडे गेली दहा वर्षे कामाला असलेल्या बोईची अगदी खात्रीची, सुस्वभावी, काम्सू आणि विश्वासू बहीण, खास आपल्यासाठी घरकामासाठी बाई म्हणून पाठविलेली. ती बाई, तो धोबी आणि शिंपी असाच फुलवाला, फळवाला, भाजीवाला यापैकी कोणीच कधीच आपल्याला लाभत नाहीत. हा शोध अगदी आपला आपण करावा तेव्हाच तो लाभतो.

चांगलं पुस्तक, चांगलं प्रदर्शन, चांगलं नाटक आपल्यालाच पारखायला लागतं. लाभ इतका सोपा नसतो. त्यासाठी कष्ट करावे लागतात. स्वतःचा निर्णय स्वतःच घ्यावा लागतो. होतं काय की जसजसे आपण नवनवीन अनुभव घेतो, प्रवास करतो, पुस्तकं वाचतो, मनुष्य स्वभावाचे अगणित नमुने पहातो. राग, लोभ, मानापमान पचवतो. तसतसे आपण अधिकाधिक चोखंदळ बनत जातो. चांगलं–वाईट हे ठिसूळ विधान स्वतःच्या अनुभवावर घासून घ्यायला आवडतं. दुसऱ्याने उघडलेल्या बॅटरीच्या प्रकाशात वाट चालणं नाही पसंत पडत. आपण आपली स्वतःची ज्योत लावावी. त्या प्रकाशात दिसेल ती वाट आपली असं वाटायला लागतं. कधी तो फाटा लांबचा निघतो कधी अवघड निघतो. निघेना का त्या वाटेवरचे अनुभव तर आपले असतात ना. अगदी स्वतःचे या अनुभवातूनच तर आपण घडत रहातो. नवी आव्हानं स्वीकारायला तयार रहातो. श्रमाचं काही वाटेनासं होतं. कारण ही वाट आपण निवडलेली असते त्याच्या शेवटाला जाणं भागच असतं आणि ते जितक्या लवकर जाता येईल तितकं ते हवंच असतं. कारण तिथून पुढे आणखी नवी वाट धुंडाळायची असते.

हिमालयाचीं वाट तुडवताना हा फार चित्तथरारक अनुभव येतो. गिर्यारोहकांची तर गोष्टच निराळी. पण आपण साधं पायी केदारनाथाची यात्रा करायला निघालो ना तरी हे थ्रिल् मिळतं. माथ्यावर रणरणणारं ऊन घेऊन चढाईचं एकेक पाऊल टाकताना मणाचं ओझं उचलल्यासारखं वाटत असतं. आता एवढा समोरचा चढ पार केला की मग संपेलच हा डोंगर अशी

मनाची समजूत करीत आपण चढत असतो. आणि तो चढ संपला, त्या पर्वताच्या माथ्यावर आलो की समोरच आपल्याला जणू काही ठकवायला त्यापेक्षा उंच असा दुसरा पर्वतराज आपल्या सर्व निसर्गशोभेसकट सज्ज उभा ! क्षणभरच, एक क्षणभरच मन थकतं. परतायला पहातं. कोमेजून जातं. उदास होतं. पण दुसऱ्याच क्षणी पुन्हा तरारून उठतं. नवी शक्ती घेतं. उमलून येतं. प्रसन्न होत आणि पाऊल पुढे टाकायला आतून एक जोरदार उसळी मारतं. पुन्हा आपण ती नवी वाट जिद्दीनं तुडवायला लागतो. तो पहिला डोंगर संपवला म्हणून तर अधिक उंच असा हा मिळाला. आता हा संपल्यावर पुढे काय बरं असेल ? सोन्याचा लखलखणारा मुकूट घातलेला हिमालयाचा शुभ्र माथा पाहताना काय संजीवक अनुभव येतो तो ज्याचा त्यानेच घ्यायला हवा. त्यांच्यातून मिळालेली प्रेरणा नवीन अनुभवविश्वात उडी घ्यायला ज्याची त्यानेंच वापरायला हवी.

माझा फुलवाला, माझा शिंपी, म्हणूनच मला स्वतःलाच शोधायला आवडतो. हेच माझं आवडीचं पुस्तक कां हे मला स्वतः वाचल्यावरचं उमगतं. गर्दीचं नाटक तेच माझं नाटक कां हे ते नाटक पाहिल्यानंतरच मी ठरवते. माझे आवडते रंग, माझी आवडती माणसे, माझ्या आवडीच्या परंपरा, माझे आवडते सूर, सर्वांचा मला लाभ व्हावासा वाटतो. त्यासाठी मी सतत धडपडत रहाते. माझी आवड आणि माझीच निवड त्यासाठी होते ती सर्व माझीच परवड. पण ती करायला माझी तयारी असते. कारण शेवटी माझाच लाभ होणार असतो. आणि तो सतत मला लाभणार असतो. आयुष्याच्या लोभात ठेवणार असतो. दुसऱ्याने दिलेली वस्तू लाभली नाही म्हणून चुटपूट न लावता हा शुभलाभ माझा मी शोधून, पारखून, निवडून काढलेला म्हणून जीवनाच्या पुढल्या वाटेवरची पावलं अधिक आत्मविश्वासाने टाकायला मला शक्ती देणारा असतो. पृथ्वी नामक या सुंदर ग्रहाचा एकंदरच लोभ वाढवणारा असतो.

आता माझं समाधान होतं. इतका वेळ थबकलेली मी दरवाजावरच्या त्या गोंडस तांबड्या 'शुभलाभ' अक्षरांकडे तृप्त पहाते आणि उंबरठा ओलांडून, मोठ्या खुषीत हॉलमध्ये शिरते.

♣ ♣ ♣

२१ ◇ मी, मला, माझं !

" मी त्याला अगदी स्वच्छ सांगितलं की मला विचारल्याखेरीज माझं टेबल अजिबात आवरायचं नाही. "

" मला तिच्याबद्दल काही एक सांगू नका. अहो मीच नाही का नोकरी लावून दिली तिला माझं वजन खर्चून. "

" नाही. माझं घर वापरलं इतके दिवस. मला केवढी गैरसोय सोसावी लागली. पण सगळं मी सहन केलं. तरी माझ्यावर याची शिरजोरी. "

" छे फॅनचा वारा मला बाई अगदी नाही सोसत. मी म्हटलं यांना माझ्याकरता आणणारच असलात काही तर एकदा एअरकंडीशनर आणा. "

माझा शब्द; मी सांगितला म्हणून. मला नाही पटत, माझ्या करता कर एवढं. एवढासुद्धा विश्वास नाही माझ्यावर ? अहो मी सांगतोय ना ?

त्यावर तो म्हणाला...

मग मी म्हणालो....

मग तो....

मग मी....

तो....

मी...

केवढा हा मीपणाचा गॅसचा फुगा.

बागेत जा, चौपाटीवर चला, बसस्टॉपवर उभे राहा, लोकलमधून ये जा करा, नाटकाच्या मध्यंतरात चहा प्यायला कॅन्टीनजवळ जा, पुस्तकांच्या दुकानात जा, गाण्याच्या मैफलीला जा, क्रिकेटची मॅच बघायला जा – कुठे वाट्टेल तिकडे जा, ' मी ' सगळीकडे असतो आपल्या पाठीला पाठ लावू

असलेल्या बागेतल्या बाकावर एक मी, दुसऱ्या 'मी'शी बोलत असते,
"अहो तोंडाळपणाला तशी काही सीमा ?"

"परवा चक्क माझ्या सुनेला म्हणते कशी, पाच वर्षं झाली लग्नाला तरी अजून तुम्ही दोघंच ?"

"मग सून काय म्हणाली ?"

"ती त्यावेळी काही बोलली नाही हो पंतीणबाईंना. उगाच चामड्याच्या तोंडाला आणखी पट्टा फिरवायला कशाला संधी द्या ? पण मला सांगितलन् घरी येऊन. तशी मी भयंकर संतापले. म्हटलं सून माझी. ज्या घरातलं अन्न खातेय ते घर माझं. उद्या नातवंडं झाली म्हणजे वाढवणार मी. या पंतिणीला बत्तीशी बाजवायची गरजच काय मुळी ?"

"पण हे तुम्ही पंतीणबाईंना सांगितलंत का ?"

"अहो तिची माझी गाठच नाही ना पडली गेल्या पंधरा दिवसात. नाहीतर मी काय सोडतेय तिला अशी सुट्टी ? माझ तोंड ते वाजवीन तर टिपरीसारखं वाजवीत रहीन हो.... !"

म्हणजे शेवटी प्रत्यक्षात 'मी' पंतीणबाईंना बोललेल्याच नाहीत. अस्सच असतं बऱ्या नेहमी 'मी' 'मी' करणारे मीताक्षरी वेळ आली, म्हणजे नेमके बाजूच्या 'तो'ला हळूच सांगतात,

"अहो, त्यांना जरा सरकून घ्यायला सांगा ना पलिकडे. तिकीट काय त्यांनीच काढलं वाटतं."

"तुम्हीच सांगा ना मग."

"मी कसा सांगणार ? तुमच्या बाजूला बसले आहेत ना ते ? नाहीतर मी सोडलं नसतं. मला अगदी चीड आहे. अशा सिव्हिक सेन्स नसलेल्या माणसांची. मी अगदी सरळ खडसावला असता."

नाटकाच्या मध्यंतरात हा 'मी' गारंबीच्या बापूची हीच भूमिका आपल्या सोसायटीच्या नाटकात डॉ. घाणेकरपेक्षा कशी फक्कड केली होती ते तावा-तावाने सांगत असतो.

"पण काय करणार. माझ्या या ऑफिसमुळे घोळ झालाय ना. माझ्या-शिवाय डिपार्टमेंट एकदम लंगडं होतं. त्यामुळे बॉस मला रजा द्यायच्या बाबतीत नेमकी काचकूच करतो अरे नाहीतर, सांगतो तुला, मी जर

प्रोफेशनल थिएटरमध्ये कामं केली असती ना, तर माझ्यासमोर टिकू दिलं नसतं कुणाला," फर्रर्रर्र – चहाच्या उरलेल्या घोटाचा फक्कड भुरका.

गाण्याच्या मैफलींत तर हा 'मी' जीव नकोसा करतो. नेमका आपल्या मागेच बसलेला असतो. बुवांनी राग सुरू केला की मला हा राग माझ्या गुरुजींनी कसा शिकवला होता त्याबद्दल हा 'मी' बाजूच्या 'तो' ला गुणगुणून सप्रयोग दाखवून देतो. बुवांनी हरकत काढली की 'मी'ची हरकत. बुवांचे बोल-आलाप सुरू झाले की 'मी' बोल बोल बोलतो. बुवांच्या ताना की या 'मी' च्या किरट्या, चोरट्या आवाजात त्या तानांची भ्रष्ट नक्कल आणि वर परत विलंबत-द्रुत संपवून, पुढल्या बंदिशासाठी बुवा तंबोरे मिळवायला लागले की याचा जगप्रसिद्ध 'मी' राग सुरू.

" अरे दहा वर्षांपूर्वी काय गायचो मी. पण एकदां एका प्रोग्रॅममध्ये माझ्या-नंतर एका कच्च्या मडक्याचा प्रोग्रॅम ठेवला. त्या दिवसापासून सणकलो. म्हटलं गाणं बंद. यापुढे गायचं नाही. बस्स. आता 'आ 'सुद्धा करीत नाही आपण. प्रतिष्ठेला भयंकर मानतो बुवा मी. काय खरं की नाही ? "

काय काय हा 'मी' सांगत असतो. क्रिकेटच्या मॅचला, क्रिकेटच्या बॅट-सारख्याच एखाद्या सडसडीत सुंदरीवर इंप्रेशन मारायला हा 'मी' कुठल्यातरी गल्लीतल्या मॅचमध्ये काढलेल्या रन्सवर शून्य वाढवून संख्या सांगत असतो. दुकानात गेलं की ही 'मी' अशीच साडी परवा त्या दुसऱ्या दुकानात कशी साडेतीन रुपयांनी कमी किंमतीला घेतली हे बरोबरच्या 'ती'ला सांगत असते.

तर हा असा 'मी', मी मी म्हणणाऱ्यांना देखील सोडत नाही. पण म्हणूनच तर अद्भुत घडत असतं. नवे विक्रम प्रस्थापित होतात. नवे शोध लागून मनुष्यजातीचं कल्याण होतं. 'मी' हे शिखर चढणारच असा निर्धार जर तेनसिंगने केला नसता तर एव्हरेस्ट अनाथच राहिलं असतं की. मी ही शर्यत जिंकणारच असं ॲथलीट म्हणाला नाही, मी माझ्या प्राणांचं मोल देऊन हा शोध लावणारच असं शास्त्रज्ञ म्हणाला नाही, मी दिवसाकाठी सोळा तास रियाज करणारच असं गायक म्हणाला नाही तर मिल्खासिंग, क्यूरी दांपत्य, भीमसेन जोशी कसे निर्माण होतील.

'मी' हवाच पण नुसतीच हवा भरलेल्या फुग्यासारखा नको. स्वयंभू शिवलिंगासारखा अढळ हवा. 'मी' ला ज्ञानाची आस हवी. नवे प्रयोग करून

पाहाण्याची हिंमत हवी. नवी क्षितिजं धुंडाळायची ईर्षा हवी. 'मी'ला जिद्द हवी, झेप हवी. मनाची शक्ती हवी, बुद्धीची युक्ती हवी, सेवेची वृत्तीही हवी. हे मीच केलं पाहिजे असं बाबा आमटे म्हणाले नसते तर आज आनंदवन उभं राहिलंच नसतं अशा 'मी'च सामर्थ्य, अस्मिता, अस्तित्व याची जाणीव झाली तेव्हाच उपनिषदातल्या कुण्या एका ऋषीला तो सर्वव्यापी, अजर, अमर असा जो कुणी आहे त्यातच या 'मी'चा अंश सामावलेला आहे याचा साक्षात्कार झाला आणि तो म्हणाला " अहं ब्रह्मऽस्मि " !

तर अशी 'मी'ची गोष्ट. खरं म्हणजे माझीच गोष्ट. मला एवढं सगळं वाटलं नसतं, तर मी कशाला लिहिलं असतं एवढं. मी विचार केला, माझ्या मनात निरनिराळ्या भावना आल्या, मला लिहावसं वाटलं म्हणून तर मी... हो मीच नाहीतर कोण ?

♣ ♣ ♣

२२ ◇ भेटी लागे जीवा

"त्यापेक्षा तुम्ही असंच का नाही करीत? एकदा प्रत्यक्षच येऊन भेटून जा."

"आई ग, मग तू दुपारच्या सुट्टीत डबा घेऊन मला भेटायला येशील न? शप्पथ?"

"तुझं लग्न होऊन तू परदेशात गेलास त्याला फार वर्षे झाली. आता प्रत्यक्ष एकदा भेटावसं झालंय!"

"नाही पण प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय आता तुमची प्रकृती किती सुधारलीय ते कसं समजणार?"

"छे छे, नाही म्हणू नका. अहो, तुमच्यासारख्यांच्या आर्थिक सहकार्याशिवाय अशी सामाजिक कार्य कशी चालवायची? मी असं करतो प्रत्यक्षच येऊन भेटतो एकदा"

"आता अगदी सोसवत नाही. हिरवंचार गवत मला टोचतं. झाडावरती फुलांच्या जागी ठिणग्या दिसतात. आकाशातला चंद्र मला भाजतो. प्रियेऽऽ एकदाच फक्त एकदाच ये आणि मला भेट."

असे मग उसासे, विनवण्या, आश्वासने, विनंत्या चालत राहतात. नुसत्या शब्दांनी, रकानेच्या रकाने मजकुराने, दूरध्वनीवरून शेकडो रुपये खर्च करून केलेल्या संभाषणांनी जी कामं साधत नाहीत ती प्रत्यक्ष भेटीत चुटकीसरशी होतात.

अगदी राग राग आलेला असतो आपल्याला एखाद्या माणसाचा. कुणी तिसऱ्यानेच येऊन आपले कान फुंकलेले असतात की, अमुक इसम तुमच्याबद्दल असं असं गरळ ओकला. असं? कमाल आहे! मी इतकं केलं त्याच्यासाठी

पाहाण्याची हिंमत हवी. नवी क्षितिजं धुंडाळायची ईर्षा हवी. 'मी'ला जिद्द हवी, झेप हवी. मनाची शक्ती हवी, बुद्धीची युक्ती हवी, सेवेची वृत्तीही हवी. हे मीच केलं पाहिजे असं बाबा आमटे म्हणाले नसते तर आज आनंदवन उभं राहिलंच नसतं अशा 'मी'च सामर्थ्य, अस्मिता, अस्तित्व याची जाणीव झाली तेव्हाच उपनिषदातल्या कुण्या एका ऋषीला तो सर्वव्यापी, अजर, अमर असा जो कुणी आहे त्यातच या 'मी'चा अंश सामावलेला आहे याचा साक्षात्कार झाला आणि तो म्हणाला " अहं ब्रह्मऽस्मि " !

तर अशी 'मी'ची गोष्ट. खरं म्हणजे माझीच गोष्ट. मला एवढं सगळं वाटलं नसतं, तर मी कशाला लिहिलं असतं एवढं. मी विचार केला, माझ्या मनात निरनिराळ्या भावना आल्या, मला लिहावसं वाटलं म्हणून तर मी... हो मीच नाहीतर कोण ?

♣ ♣ ♣

२२ ◇ भेटी लागे जीवा

"त्यापेक्षा तुम्ही असंच का नाही करीत? एकदा प्रत्यक्षच येऊन भेटून जा."

"आई ग, मग तू दुपारच्या सुट्टीत डबा घेऊन मला भेटायला येशील न? शप्पथ?"

"तुझं लग्न होऊन तू परदेशात गेलास त्याला फार वर्षे झाली. आता प्रत्यक्ष एकदा भेटावसं झालंय!"

"नाही पण प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय आता तुमची प्रकृती किती सुधारलीय ते कसं समजणार?"

"छे छे, नाही म्हणू नका. अहो, तुमच्यासारख्यांच्या आर्थिक सहकार्याशिवाय अशी सामाजिक कार्य कशी चालवायची? मी असं करतो प्रत्यक्षच येऊन भेटतो एकदा"

"आता अगदी सोसवत नाही. हिरवंचार गवत मला टोचतं. झाडावरती फुलांच्या जागी ठिणग्या दिसतात. आकाशातला चंद्र मला भाजतो. प्रियेऽऽ एकदाच फक्त एकदाच ये आणि मला भेट."

असे मग उसासे, विनवण्या, आश्वासने, विनंत्या चालत राहतात. नुसत्या शब्दांनी, रकानेच्या रकाने मजकुराने, दूरध्वनीवरून शेकडो रुपये खर्च करून केलेल्या संभाषणांनी जी कामं साधत नाहीत ती प्रत्यक्ष भेटीत चुटकीसरशी होतात.

अगदी राग राग आलेला असतो आपल्याला एखाद्या माणसाचा. कुणी तिसऱ्यानेच येऊन आपले कान फुंकलेले असतात की, अमुक इसम तुमच्याबद्दल असं असं गरळ ओकला. असं? कमाल आहे! मी इतकं केलं त्याच्यासाठी

आजपर्यंत. नोकरीसुद्धा माझ्यामुळे लागली त्याला. तोच माणूस असा फिरला माझ्या विरुद्ध ? मेटू दे तर खरा समोरासमोर. प्रत्यक्षच जाब विचारते. समजतो काय स्वतःला वगैरे. आणि मग एके दिवशी बसमध्ये तो इसम प्रत्यक्षच भेटतो. स्वतःहून हसत आपली विचारपूस करतो. आपणही मनोमन विरघळून त्याला तितकाच प्रेमळ प्रतिसाद वगैरे देतो. आणि भेटीचा वेळ बराच असला, आपल्यापाशी हिंमत शिल्लक असली तरच मग जपून जपून त्या गरळाविषयी विचारतो. तो साफ नाकारतो. संभाषणाला इतकं निराळं वळण लागतं, की आपण दोघं मिळून त्या तिसऱ्या निरोप्याविषयीच वाईट-साईट बोलायला लागतो.

पण आयुष्यात एकमेकांना प्रत्यक्ष भेटणं यात फार मोठी शक्ती सामावलेली आहे हेच खरं माणूस माणसाला जेव्हा भेटतो, डोळ्याला डोळा भिडतो, आवाजाची ओळख होते, संभाषण सुरू होतं, विचारांची देवाणघेवाण होते, त्याक्षणी एक स्नेहाळ नातं सुरू होतं. एक जोडणारा बंध निर्माण होतो. दुरावा नाहीसा होऊन जवळीक वसतीला येते. ज्या एका चित्‌शक्तीची आपण सगळी रूपं आहोत तिची अंतस्थ जाणीव सुखवीत रहाते.

म्हणून तर मला गाण्याची फीत ऐकण्यापेक्षा प्रत्यक्ष त्या गायकाचं गाणं, समोर बसून ऐकायला आवडतं. साहित्य संमेलनात, एका व्यासपीठावर रसज्ञ, गुणवंत विद्वान अशा तपस्वी मानदंडांना एकत्र बघण्यात जो एक स्फूर्तिदायक अनुभव असतो तो नुसता वृत्तपत्रीय रिपोर्ट वाचण्यात नसतो. असंच नाट्य-संमेलनाचं, संगीत समारोहाचं, सभा-संमेलनाचं. स्वाक्षरी मागणाऱ्याशी स्वाक्षरी देणारा कलावंत जेव्हा चार शब्द बोलतो तेव्हाच माझ्या मते तो अनुभव खरा संपन्न होतो. 'अमक्याची स्वाक्षरी मला आणून द्या' असं सांगितल्यानं ती फक्त अक्षरं आपल्यापाशी राहतात. पण स्वतः स्वाक्षरी घेत असताना, आपल्याला आदर्श वाटणाऱ्या त्या व्यक्तीचं संपूर्ण व्यक्तिमत्व आपण साठवून घेत असतो. त्या बालवयातले हे फार महत्त्वाचे क्षण असतात. असेच क्षण पुढे घडणाऱ्या आयुष्याला, आकार घेत असलेल्या कोवळ्या मनाला संस्कारित करीत राहतात.

माणूस प्रत्यक्ष दिसणं, त्याच्याशी प्रत्यक्ष बोलणं याला मी फार महत्त्व देते. वर्षानुवर्षे कुरवाळून ठेवलेले आपले गैरसमज भेटीसरशी, शिशिरातल्या

पानगळीसारखे निमूट गळून पडतात. तोच माणूस आपल्याला सांगायला लागतो, "खरंच, मी काय काय विपरित ऐकून होतो तुमच्याबद्दल, तुमच्या अहंपणाबद्दल, शिष्टपणाबद्दल. पण आता प्रत्यक्ष तुमच्याशी बोलल्यावर निराळाच प्रसन्न अनुभव आला."

खरं म्हणजे आता प्रत्यक्ष भेटीऐवजी, चित्रपटातून–दूरदर्शनवरून पर्यायी, भेटी होतातच. तरीसुद्धा तो भेटीचा पर्यायच. म्हणून तर दूरदर्शनवरून मॅच बघता येत असूनसुद्धा स्टेडियम आपलं गर्दीनं ओसंडून वहात असतंच. प्रेक्षकांच्या त्या गर्दीचा आपणही जेव्हा एक भाग होतो तेव्हा तर भेटसागरातच डुंबत असतो. असंख्य उत्साहित माणसांचा तो समुदाय. त्यात आपणही एक. चैतन्यशक्तीच्या त्या आविष्काराचा एक अंगभूत भाग बनून रहाणं हा एक स्फूर्तिदायक असा अनुभव असतो. भेटीतून प्रेरणा मिळते. आनंद वाढतो. प्रेम उमलतं.

बारामासाचं हे निसर्गचक्र प्रेमानेच फिरत राहतं. कुणा भीमसेन जोशीला सुराचं प्रेम असतं. कुणा संयुक्ता पाणिग्रहीला शिल्पमुद्रांचं प्रेम असतं. कुणी सलीमअली पक्ष्यांवर प्रेम करतो. कुणी रॉयल सर्कसवाला आपल्या जनावरांवर प्रेम करतो. उन्हाच्या तापाने तापलेली माती धाराधाराच्या भेटीसाठी आसुसते; तर थंडीच्या कडाक्याने गारटलेली फाल्गुनी वसंताला हाक देते. भूमीच्या घट्ट भेटीशिवाय वृक्ष फोफावू शकत नाही. काळ्या ढगाच्या भेटीशिवाय मोराचा पिसारा उघडत नाही. लहानमोठ्या लाटांच्या भेटीखेरीज चंद्रबिंबाला पूर्णता येत नाही. प्रेक्षकांच्या भेटीशिवाय कलावंत संपूर्ण बनत नाही. कुंचल्याला रंगाची ओढ असते. लेखणीला शब्दांची ओढ असते.

भेटीत ही अशी ओढ असते. मग ती तुकोबाला विठोबाची लागलेली असो किंवा एका माणसाची दुसऱ्या माणसाला लागलेली असो. सूर्य रोज भेटावा. सुगंध रोज भेटावा. स्वर रोज भेटावा. भेट कधी अखेरची नसावी. वाढती असावी. स्फूर्तीसाठी, चैतन्यासाठी, प्रेमासाठी. मुख्य म्हणजे जगण्यासाठी.

♣ ♣ ♣

२३ ◇ हा नाद सोड सोड

परवा माझा चहाचा कप फुटला माझ्याच हातून. धांदलीने गाळणी काढायला गेले. ती सटकली हातातून. खालीच कप ठेवला होता धुण्याकरता म्हणून. नेमकी त्याच्यावरच ठाणदिशी कोसळली. चित्रपटातल्या नायिकेचा प्रेमभंग झाल्यानंतर ती जशी थोडी विषण्ण, अधिक उदास, अधिक भग्न, अधिक विद्ध, अधिक शून्य, अधिक.... नाही. शून्यानंतर अधिक काय असणार म्हणा. शून्यात काहीही अधिक केलं तरी शून्यच येणार, तर तशी मी शून्य नजरेने त्या कपभंगाकडे पहात बसले होते.

त्याचं काय आहे की सकाळचा चहा जो असतो ना तो मला काचेच्या कपातूनच घ्यायला आवडतो. आणि याचं एकमेव कारण म्हणजे चहाच्या कपबशांची खयंपाकघरातून जी किणकिण ऐकू येते त्या नादावर माझी सकाळ उजाडली की सबंध दिवस कसा छान नादिष्टपणात जातो. काचेच्या किटलीत चहा असावा. किती आहे तो बघायला किटलीचं झाकण काढून परत ठेवताना पुन्हा तो खास काचेचा असा किणकिणाट व्हावा, मग चहा कपात ओतावा. पिता पिता सकाळचा पेपर वाचताना कप दहा वेळा तरी बशीत ठेवावा लागतो. कारण पेपरात आलेली महत्त्वाची बातमी चहाच्या टेबलावर गोळा झालेल्या आपल्या सगळ्या कुटुंबियांना सांगावीशी वाटते. मग पुन्हा पुन्हा तो कपबशीचा किणकिण संवाद व्हावा. मला फार आवडतो तो नाद. तसा नाद प्लास्टिकच्या कपबशीतून नाही येत. आणि म्हणूनच माझा तो काचेचा कप फुटला तेव्हा माझा भयंकर भावनाभंग झाला. झालं होतं काय की दोन-तीन महिन्यापूर्वीच घरात प्लास्टिकच्या कपबशांचा एक नवीन सेट आणला होता मुलीच्या वडिलांनी. होता सुरेख. रंग आक-

र्षक, त्याच्यावरची फुलं अगदी सडा पडल्यासारखी गोंडस. कपाला जशी वर गडद रंगाची धार तसाच बशीवरही त्याच रंगाचा पट्टा वगैरे. शोभिवंतपणा खूपच होता. तरीसुद्धा मला काही त्या कपातून चहा प्यावासा वाटेना. घरातले इतर सगळे मेंबर्स कुणी नेसकॅफे तर कुणी दूध, माझे यजमान त्यांचा चहा. असे सगळे त्या प्लास्टिकच्या कपबशातून मनसोक्त पीत होते. सगळे त्या कपबशांतून पिताना बघायला मलाही आवडायचं. छान देखण्या दिसायच्या कपबशा. पण....मी आपला माझा जुनाच काचेचा कप घेत होते चहाला. इतर सगळे एकमेकाकडे बघत माझी टिंपल करायचे. आईचं नेहमीचं असतं काहीतरी जगावेगळं. अशा अर्थाच्या कटाक्षांची एकमेकात देवघेव करायचे. पण मी लक्षच द्यायची नाही. त्या प्लास्टिकच्या मुखस्तंभासारख्या अबोल कपापेक्षा हा माझा काचेचा कप किती बोलघेवडयासारख्या गोष्टी करायचा माझ्याशी. माझी सकाळ कशी बोलकी व्हायची. मायबोलीसारखी एक खास कपबोली निर्माण झाली होती आमच्यात. शेवटी आपल्याभोवती जे जग असतं ते रूपरसगंधनादस्पर्शांचंच असतं ना? सनई चौघडा नाही ऐकू आला तर एक कोमलांगी कुणा कसदार आणि भरदार आधाराशी आज एकरूप होणार आहे हे कसं कळायचं. झांजांच्या आवाजाशिवाय काकडआरती आपल्यापर्यंत पोहोचून, देवाच्या निकट सान्निध्यात आपण असल्याचा आनंद कसा मिळायचा. बैलाच्या गळ्यातले घुंगुर वाजल्याशिवाय कधी कळलंय का कुणाला की गाड्यांचा तांडा निघालाय म्हणून. गावात आवाजाची निराळी दुनिया. मोटेचा आवाज, जात्याचा आवाज, त्याच्यावरचा ओवीचा आवाज, कुणा गुराख्याच्या पावरीचा सूर, मेंढराची कलकल, पाखरांची साद, देवळातल्या घंटेचा नाद, शेतकऱ्यांनी एकमेकांना घातलेल्या हाळ्या, मधूनच मेनरोडवरून जाणाऱ्या मालटूकचा बेसुरा चिरचिरा हॉर्न, गोरजवेळी पाखरं, जनावरं, माणसं घराकडे परतण्याचे आवाज, एक न्यारीच दुनिया.

आम्ही शहरवासी. आम्हाला सकाळच्या आकाशवाणीची बांग. दुधाच्या गाडीतल्या बाटल्यांची खळखळ, दुमजली बसची रोंड रोंड, मोटारींची अखंड वाजणारी शिंगं, हातगाड्यांच्या लोखंडी चाकांची खडखड, कांदेबटाट्याच्या हाळ्या, नऊचा भोंगा, एकतारीवरच्या भिकाऱ्याचा आणि त्याच्या पोरीचा किनरा सूर, भरीला पुन्हा चिमण्या–कावळे–कबुतरं असतातच, त्यात आणि विमानाची घरघर, टेलिफोनच्या रिंगा, दारावरच्या घंटया असे दिवसभर एकात

एक मिसळलेले आवाज. पण प्रत्येक आवाज कसा स्वतःबरोबर एका विशिष्ट विश्वाचं नातं सांगून जातो. त्या विश्वाची आणि आपली जवळीक तो आवाज सांधून देतो. काही क्षण का होईना आपण सर्वस्वी त्या वातावरणात शिरतो. तंबोऱ्याच्या तारा छेडल्याचा नाद आला की रागसंगीताशी नातं जुळतं. सारंगी वाजली की आता ठुमरीशी संवाद जुळेल म्हणून तयारीत राहातो. हार्मोनियमवर कलाकुसरीचे सूर निघाले की गजलची वाट बघतो. पखवाजावर थाप पडली की बरेच दिवसांनी आता धृपद ऐकायला मिळणार अशा विश्वासात असतो. ऑर्गन नाट्यसंगीताला आमंत्रण देतो. पडद्याच्या आतून वाजणारे घुंगुर आता नृत्यातून काय शिल्प उभं राहाणार या अपेक्षेनं डोळ्यांना ताणून ठेवतं.

पण या सगळ्या नादांच्या निनादातून जर कधी आपण बाहेर पडू शकलो, निवांत बसू शकलो, एकट्यापणालाच सोबतीला बोलावून घेतलं; तर मात्र जो नाद ऐकू येतो तो या बाह्य विश्वाच्या सर्व नादाहून निराळा असतो. कारण तो बाहेरून उमटतच नाही मुळी. तो आत उमटतो. मनाच्या पार आतल्या गाभाऱ्यात उमटतो. सर्व शरीरभर त्याच्या लहरी उसळतात आणि या संपूर्ण विश्वावरसुद्धा जिचा अधिकार चालतो अशा चितशक्तीचा प्रत्यय हा नाद आणून देतो. अनेकामधलं एकत्व, अणुमधलं परमाणुत्व, आणि चैतन्यमय शाश्वतांतलं मानवी अशाश्वत्व हा नाद आपल्याला पटवतो आपल्या अस्तित्वाचे त्या क्षणी आपणच साक्षी असतो. या शांत नादात मी कधी हरवले तर मनुष्यजन्माबद्दल मला कृतज्ञताच वाटत राहाते.

बाकी इतका नादिष्टपणा बरा नाही कुणीतरी अखेरीस "हा नाद सोड सोड" सांगण्यापर्यंत ताणण्यात अर्थ नाही. पण हे नादविश्व मला आवडतं. पानांची सळसळ, वाऱ्याचं गुंजन, लाटांची लयकारी, गवताची हुळहुळ, झऱ्यांची खळखळ, फार काय साडीची सळसळ, बांगड्यांची किणकिण, उंच टापांच्या सँडल्सची टकटक, पर्सची उघडझाप करणाऱ्या बटणाची किटकिट घड्याळाची टिकटिक, टाइपराटेरची घंटी, अगदी डासांचं गाणंसुद्धा भावतं मला. नुसतं गाणंच हं, चावणं नाही.

तर अशी मी नादी आहे. एक काचेचा चहाचा कपसुद्धा जर मला इतकी छांदिष्ट बनवतो तर मग उत्तम गाणं, नाजुक वाजवणं आणि तालबद्ध नाचणं माझं काय करीत असतील बघा. माझ्या नादी कुणी लागू नये हेच खरं!

♣ ♣ ♣

२४ ◇ पाणी ग्रहण

फार पूर्वी आम्ही आसामात होतो. गोहाटीला. मधून ब्रह्मपुत्रा वाहायची. पलिकडे अमीनगाव. त्यावेळी – अमीनगावला जोडणारा पूलही नव्हता. सगळी वाहतूक लहानमोठ्या होड्यांतून. संध्याकाळी आम्ही बहुतेक नदीकाठी फिरायला म्हणून जायचो. नगरपालिकेने एक बगीचाही केला होता नदीच्या किनाऱ्यावर. नदीचं पात्र आणि बगीचा यांच्यामधून भांगासारखा दुपेडी डांबरी रस्ता जायचा. रस्त्याच्या या कडेला बगीच्यात फिरायला आलेल्या लोकांच्या रिक्षा, मोटारी, सायकली वगैरेंची गर्दी आणि त्या बाजूला एकाला एक लगटून उभ्या राहिलेल्या होड्यांची दाटी बगीचा थोडा उंचावर उभारला असल्याने बगीच्यातल्या एखाद्या शोभिवंत बाकावर बसून ब्रह्मपुत्रेचे पात्र बघताना मोठी मजा वाटायची. त्यांत मावळत्या सूर्याचे रंग वर आकाशात आणि खाली पाण्याच्या तरंगावर अशी काही होळी खेळायचे की आम्ही सूर्याला अगदी पाण्यात पाहायचो. आणि पावसाळ्यात तर ही ब्रह्मपुत्रा अशी फुगायची की तो दुपेडी रस्ताही तिच्या पाण्याखाली झाकून जायचा. तर असं पाणीचपाणी चहूकडे असूनही घरात नळाला पाणी ठराविकच वेळ. हे व्यस्त गणित आम्हाला कधी सुटलं नाही. बाकी आपल्या सगळ्यांच्याच बाबतीत अगदी आतापर्यंत ते कितीसं सुटलंय म्हणा. पावसाळ्यात उदंड पाणी, एरवी तोंडचं पाणी पळालेलं.

एकदा काय झालं की एका गोरासाहेब आला आमच्या घरी चहाफराळाला. बरीच वर्षे आपल्या देशात राहून बराच भारताळला होता. त्यामुळे फराळ झाल्यावर हात धुवायला उठला. बघतो तर नळाच्या तोटीला पाणी नाही. बाजुला ठेवली होती आम्ही बादली भरून. पण तो जो उसळला त्याच्या

भाषेत–म्हणजे इंग्रजीत म्हणाला, 'काय माणसं आहात तुम्ही. एवढं उदंड पाणी कोसळतं तुमच्या देशात आभाळातून. एवढ्या घळाघळा नद्या वाहतात सगळीकडनं. एवढी प्रचंड तळी तुंबतात जागोजागी. आमच्या अमेरिकेसारखी प्रचंड सरोवरं का नाही खोदून ठेवीत तुम्ही चारपाच. त्यातून मग कालवे काढून पुरवाल पाणी तुमच्या शेतीमातीला. कटकट मिटेल कायमची तुमच्या मागची.'

अंगात पाणी नसल्यासारखं खाली मान घालून ऐकून घेतलं आम्ही त्या गोऱ्या पाणीदार माणसाचं प्रवचन. तेव्हा पाझर तलावांची आजच्या इतकी चलतीही नव्हती. म्हणून गपचूप बसलो झालं. तो गेल्यानंतर मी आपली विचार करीत बसले. म्हटलं खरंच किंग लिअरची तिसरी मुलगी जर मी असते ना तर मी त्याच्या त्या यक्षप्रश्नाला मीठ असं उत्तर न देता 'पाणी' असं दिलं असतं. खरोखरच आपल्या भारतीय आयुष्यात पाण्याला केवढं महत्व आहे हो. आमच्या मंगळ असलेल्या मुलीचं लग्न जमत नसलं की बापाच्या तोंडचे पाणी पळतं. आपल्या उनाडा पोराला बापाने किती समजावून शहाणपणाच्या गोष्टी सांगितल्या तरी उपड्या घड्यावर पाणी पडतं. रोज थोडी कोथिंबीर घा, थोडं विरजणाला दही घा, जरा नारळाची कवड आहे का हो, पाहुणे आले आहेत अचानक; एक भांडंभर दूध घा असं सांगणाऱ्या लोचट शेजारणीला मुकाट सगळं पुरवीत राहावं लागतं. हो. पाण्यात राहून माशाशी वैर कसं करणार? लहानपणापासून एका वर्गात शिकून, पुढे कॉलेजमध्ये आपल्याला गोल्ड मेडल वगैरे मिळालेलं आणि आपल्या त्या बालमित्राने इंटरला तीन वेळा डच्चू खाऊन कॉलेज सोडलेलं. पण आज एक्स्पोर्ट–इंपोर्टच्या बिझिनेसमध्ये लक्ष्मी त्याच्या घरी पाणी भरते, सरस्वती आपल्या घरी, नुसती पुस्तकांची कपाटं. कॉलेजची वर्षं प्रेमाच्या आणाभाका देऊन ऐन लग्नाच्या वेळी मात्र बडिलांच्या आज्ञेबाहेर जाता येत नाही म्हणणाऱ्या बुळ्या प्रियकराच्या अंगातच पाणी नसल्याचं त्याच्या प्रियतमेला जेव्हा कळतं तेव्हा फार उशीर झालेला असतो. एरवी अबोल असलेली आपली मैत्रिण; अचानक वडील गेल्यावर, सबंध कुटुंबाचा भार समर्थपणे आपल्या खांद्यावर जेव्हा पेलून धरते, तेव्हाच लक्षात येतं की पाण्यात पडलं की माणसाला आपोआप पोहता येतं. नाटकाचा दौरा आटपून परतणाऱ्या आपल्याच कलावंतांचा अपघाती मृत्यू ऐकून आपल्या हृदयाचं पाणी पाणी होतं. आज कफल्लक बनलेल्या

गुणी कलावंताचा मागचा वैभवी काळ आणि त्यावेळी त्याने उधळलेला पाण्यासारखा पैसा आठवून मन अधिकच खंतावतं विषयाचा सखोल अभ्यास नसतानाही अर्धवट माहितीच्या जोरावर, व्यासपीठावर जेव्हा प्रमुख पाहुण्याचं वक्तव्य चालू असतं तेव्हा आपण मनात म्हणत असतो उथळ पाण्याला खळ-खळ फार. बाजूच्या बिऱ्हाडात तळलेल्या ताज्या बांगड्याचा वास आला की आपल्या तोंडाला पाणी सुटतं. तरुणपणी म्हणे माणसाच्या अंगात अशी धमक असावी की लाथ मारीन तिथं पाणी काढीन असा आत्मविश्वास त्याने दाखवावा.

तर अशी ही आम्हा भारतीयांची पाणी गोष्ट. पूर्वी म्हणे गावोगाव पायी वाटसरूंकरता कुण्या दयावंत दात्याने जागोजाग पाणपोया उभारलेल्या असायच्या. आमच्या संगीतात पनघट पे नंदलाल नेहमीचं कंकर मारून पाण्याने भरलेली मटुकियां फोडत असतो. आमच्या नृत्यात पाण्याला निघालेली सुंदरी अशी काही अलबेली दिसते की तिच्या डोईवरचा घट अधिक मनोहर की घाटदार शरिराच्या तिच्या लयबद्ध हालचाली अधिक मनोहर, यावर बघणाऱ्याच्या डोळ्यांतलं पाणी गोठतं.

आम्ही मराठी लोक नदीला बांधलेल्या घाटावर जाऊन पाणी भरतो म्हणून घाटी की घाटावर राहातो म्हणून घाटी याचा शोध मला अजून लागायचाय. आम्हाला नुसतं देवळात जाऊन भागत नाही. तिकडल्या कुंडात स्नान केल्याशिवाय डुबकी मारल्याशिवाय किंवा नदीत अंग भिजवल्याशिवाय आमची तीर्थयात्रा पुरीच होत नाही. आम्ही जन्माला येतो तेव्हाही नवजात बाळाला आधी पाण्याने धुतात आणि हा देह पंचत्वात मिसळत असतानासुद्धा अखेर तोंडात पाण्याचाच थेंब सोडतात.

परवा श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे 'मूकनायक' वाचीत होते. त्यात एके ठिकाणी नाटकाचा नायक विक्रांत याला त्याची प्रेयसी धमकावते की तुम्हाला आता येथून घालवल्याशिवाय मी अन्नग्रहण करणार नाही. त्यावर पाणीदार विक्रांत लगेच म्हणतो. "अन्नग्रहण नको करूस पण पाणीग्रहण तर करशील का नाही?"

माझे डोळे लगेच पाणावले. वाटलं, बघा बाई. त्याकाळी कोल्हाटकरांसारख्या प्रतिभावंत नाटककारालासुद्धा अन्नापेक्षा पाणी श्रेष्ठ हे पटलं होतं!

♣ ♣ ♣

२५ ◇ टपूटपू टपूटपू

टपटप टपटप थेंब गळत होते. पुसले तरी पुन्हा उमटत होते. पुन्हा पुन्हा पुसून रुमाल पिळता येईल इतका ओला झाला. नाहीतरी बायकांचे रुमाल हे फक्त खाली पडल्यावर कुणीतरी उचलून देण्याच्याच कामाचे असतात. तर पुन्हा थेंबांची झालर कपाळावर तयारच. हो, हो, थेंब. पावसाचे नव्हे, घामाचे. तूर्तच्या वैशाखी उन्हाळ्यात घामाचाच पाऊस पडतो. त्यात बसस्टॉपवर बहुतेक छपरं नसतात. वर सूर्याचा तिसरा डोळा उघडलेला. आपल्या तर डोळ्यांच्या पापण्यांवरही कधी कधी थेंब जमा होतात. वारा तसा असतो बऱ्यापैकी. पण म्हणून काय घाम जमायचा थांबतो. तशात टॅक्सीत बाहेरच्यापेक्षा दहा डिग्री अधिकच ताप. चोहोबाजूंनी तापलेला पत्रा आणि वर माथ्यावर तर चटका देणारं टॅक्सीचं टप. थेंब गळतच असतात. टपटप टपटप.

तर अशी पिडून परवा भर उन्हाची बसस्टॉपर उभी होते. माझ्यासारखेच घोळक्यातले—हो अलीकडे रांग ऊर्फ कतार लावण्याची जबाबदारी कुणावरच नसते—इतरही सर्व त्रासलेले. घाम गळून पुन्हा घामच पदरात ही काही मोठीशी कमाई नव्हे. इतक्यात एक सुंदीवर सुरांची एक मंद मधुर लकेर कानावर आली. पाठोपाठ टपटप टपटप अशा तालांत पडणाऱ्या खुरांची लय. मान पुरी बळवून आवाजाच्या दिशेकडे पाहायला लागले तर लग्नाचा वरघोडा. हात्तिच्या म्हणजे नेहमीचंच दृश्य ! एखादं मरतुकडं घोडं आणि त्याच्यावर स्वार होऊन बसण्याची उसनी ऐट आणलेला, मुंडावळ्या बांधलेला नवरदेव. काय पाहायचं त्यात. पण नाही पाहायचं म्हटलं तरी नजर बेटी वळतच होती वरातीच्या दिशेकडे. इकडे वरघोड्यामुळे ट्रॅफिक मंदावला होता. बसला त्यापुढे आणखीच उशीर होणार होता. आम्ही आणखीच

त्रासणार होतो. थेंब गळतच होते. टपटप टपटप.

घोडा जसजसा नजरेच्या टप्प्यांत यायला लागला, तसतसा टपटपचा ध्वनीही अधिक स्पष्ट ऐकू यायला लागला सुंद्रीच्या स्वरांपेक्षा या टपटपच्या लयीनं मला मोहवलं. मोठी बांधेसूद पडत होती पावलं. एका लयीत. एखाद्या उत्तम तबलजीनं एकदा लय बांधली की गायकवादकाने कितीही बोलताना किंवा तानांची बरसात केली तरी ती बांधलेली लय हलू नये, तसं खानदानी होतं हे टपटप. आधी आवाज मग दृश्य, या सिद्धांतासारखा त्या लयीच्या ध्वनीचा धनी आता दिसायला लागला. त्याचा पांढरा शुभ्र रंग समुद्राच्या लाटेच्या फेसासारखा शीतल वाटायला लागला. उत्तर रामचरित, शाकुंतल, नैषध अशा संस्कृत नाटका-काव्यातली घोड्यांची वर्णनं आठवायला लागली.

पूर्वीच्या वाङ्मयात सगळे राजे घोड्याचे उत्तम परीक्षक असत; किंबहुना राजा म्हटला की त्याला एकूण सौंदर्याचीच चांगली परीक्षा असायची. मग ती उद्यानांमधल्या लतावृक्षाची असो, खजिनाघरातल्या जवाहिराची असो, दरबारातल्या नवरत्नांची असो किंवा अश्वशाळेतल्या घोड्यांची असो. सुलक्षणी घोड्यांची लक्षणं पुष्कळ संस्कृत नाटका-काव्यांतून सांगितली आहेत.

शाकुंतलातल्या राजा दुष्यंताच्या रथाचे, लगाम सैल सोडलेले, कान ताठ झालेले, त्यांच्याच खुरांनी उधळलेल्या धूलिकणांनाही मागे टाकून, हरणाच्या वेगाने पुढे पळणाऱ्या घोड्यांचं वर्णन कालिदासाने इतकं अप्रतिम केलय की अलीकडच्या सत्तर एम. एम. च्या सिनेमास्कोप चित्रात जसं काही वेळा आपण प्रत्यक्षच तो अनुभव घेत आहोत असं वाटतं. तसंच कालिदासाचा हा —

'मुक्तेषु रश्मिषु निरायतपूर्वकायाः'

हा श्लोक वाचतांना वाटतं.

वरात हळूहळू पुढे सरकत होती. घोडयाचा आकारही स्पष्ट होत होता. आता मला त्याचा उमदा उभट चेहरा, छोटेसेच कान असं सगळं दिसायला लागलं. ही वरातवाली माणसं मोठी रसिक दिसताहेत. चकचकीत आरशांच्या झालरीने घोडयाचं तोंड न झाकता सुबकशी केशरी झेंडूच्या फुलांची झालर त्याच्या गळ्यात घातली होती आणि त्याचा एकच छोटासा

शेव त्याच्या कपाळाच्या मधोमध झुलत होता. या झेंडूच्या माळेतली कलाबतू उन्हात चमचम करीत होती आणि उभं गंध लावलेल्या राजराजेश्वराच्या थाटात, हा परीटघडी घोडा मोठ्या ऐटीत पुढे सरकत होता.

माझा उष्मा कुठल्याकुठे पळाला. घोडयावर नवरदेव होता. नवरदेवावर छत्री होती पण माझं लक्ष त्या घोडयावरच खिळून बसलं. आता तो अगदी माझ्यासमोर आला आणि मला त्याची रेशमासारखी आयाळ, लांबसडक मान, विशाल छाती, पाठल्या दोन्ही भरदार बाजू आणि अरुंद पाठ असं सगळं दिसायला लागलं. घोडा खरंच सुलक्षणी होता. मला एका श्लोकाची ओळ आठवली.

"निर्मासं मुखमण्डले परिमितं मध्ये लघुंकर्णयो"

तसे सगळे अवयव या घोडयाच्या ठिकाणी मला दिसत होते. माझ्या जागी उत्तम अश्वपरीक्षा असणारा नळराजा असता ना तर त्या नवरदेवाला जबरदस्तीने खाली उतरवून त्या अबलख घोडयावर स्वार होऊन तो केव्हाच दौडत निघून गेला असता.

काय गंमत आहे मुंबईसारख्या शहरात. आपल्या या डोळ्यांना उत्तम घोडा दिसल्याचंही कौतुक वाटतं. खरंच आहे ते. मोटारीचं सौंदर्य बघण्यापेक्षा त्याच्या वेगाची धास्तीच अधिक वाटते. पण हे जनावर कसं वेगानं मोटारीसारखंच पण दिसायला कसं देखणं, रुबाबदार. व्हिक्टोरियाचे घोडे पाहायची सवय आपल्याला. बाकी त्याही आता मुंबईत सर्रास दिसत नाहीत. आताचा हा घोडा कधीकाळी नैनितालसारख्या ठिकाणी दिसतो आणि घोडयाच्या शर्यतीत. दुसऱ्या करमणुकीचा काही मला षोक नाही त्यामुळे माझी या जाईजुई मोगरीच्या रंगासारख्या शुभ्र रंगाच्या घोडयाने पुरी नजरबंदी केली.

वरात आता माझ्या डोळ्यांपुढून सरकत होती. घोडयाची ती औरसचौरस शेपूटही मोठी विपुल आणि मनोरम होती. चालताना डाव्या-उजव्या अंगाला हलकेच फटकारे देणारी ती त्याची शेपूट आणि त्या शेपटीची शोभा खुलवणारा त्याचा तो पुष्ट पार्श्वभाग पाहून माझी खात्रीच पटली की हा काही साध्या गाडीचा घोडा नाही.

घोडयाच्या पाठीमागून येणाऱ्या वरातीतल्या तीन-चार मोटारीवर जेव्हा

मी स्टीलच्या घोड्यांचे लावलेले बिल्ले पाहिले तेव्हा मनोमन उमजले की, कुणा रेसबहाद्दर भिडूच्या घरातलं लग्न आहे आणि रेसचं जनावर आजच्या या शुभकार्याकरता खास काढलेलं आहे. त्याचा वेग नाही बघायला मिळाला पण रुबाब मात्र मनोमन ठसला.

डांबरी रस्त्यावरच्या त्याच्या पावलांचा टपटप टपटप आवाज नंतर कितीतरी वेळ ऐकू येत राहिला. घामाचे थेंब गळतच होते टपटप टपटप. पण आता मला त्याची फिकीर नव्हती.

♣ ♣ ♣

२६ ◇ मधुर किती कुसुम गंध !

कल्पवृक्षाची एक परमसुवासिक पुष्पमंजिरी, नंदनवनदेवीने पुंडरीकाला दिलेली आहे. ती कानावर माळून शिवशंकराच्या दर्शनाला पुंडरीक आलेला आहे. आज शिवमोदपर्वणी. त्यानिमित्त राजकन्या महाश्वेताही महेश्वराच्या दर्शनाला येते. सर्वत्र वसंताचं साम्राज्य पसरलेलं आहे आणि एवढ्यात महाश्वेतेला एक अलौकिक सुवास येतो. आणि ती हे पद म्हणते—

मधुर किती कुसुमगंध सुटला
त्या लोभे हे मधुकर पळती ॥
गुंजारव उठला ॥

गोविंद बल्लाळ देवलांचं शापसंभ्रम नाटक हे या सुवासावरच आधारलेलं आहे. महाश्वेता आणि पुंडरीकाची ही प्रणयकथा. विरहोन्माद आणि देहत्याग सर्व काही या एका सुरुवातीच्या गंधामुळे होतं. मनात आलं हा गंधच मुळात महाश्वेतेला आला नसता तर? रूपरसगंधस्पर्शाच्या या दुनियेतला हा गंध, महाश्वेतेलाच काय पण आपणा कुणालाच सोडून जाऊ नये.

अहो वास नसेल तर पानांच्या झुपक्याआड हिरवा चाफा कुठे फुललाय ते कसं समजणार? वास नसेल तर उन्हाळा सुसह्य करणारं वाळ्याचं सरबत नुसतं कचऱ्याच्या काड्या घातलेलं पाणी की हो होईल. वासाशिवाय पहिल्या पावसाचे थेंब मातीला साद कशी घालतील? छे, छे! वासाशिवाय सकाळच्या चहाची, फोडणीला टाकलेल्या पोह्यांची, तळायला घातलेल्या बांगड्याची, आधण आलेल्या भाताची नुसती परवड होईल परवड. फुलपाखराच्या पंखावरचे ठिपके जसे वेगळे काढता येत नाहीत, तसाच वास आणि स्वाद वेगळे करता

येत नाहीत. स्वयंपाकघरात शिजत असलेली उसळ वालाची आहे की मटकीची ते वासाशिवाय दुसरं कोण सांगणार ? तळलेल्या पुऱ्यांच्या वासाला कांद्या-बटाट्याच्या खमंग रश्शाच्या वासाची जोड नसेल तर रविवारच्या जेवणाची जुगलबंदी कशी रंगणार ? मेळेवर भुरभुरलेल्या कांद्याचा वास जर हाका मारीत नाही आला तर सुट्टीच्या दिवशी चौपाटीवर फिरायला जाण्यात हशीलच काय ?

कोऱ्या साडीची घडी उलगडताना, आधी तिचा वास, ती आणणाऱ्याचं प्रेम सांगतो. कोऱ्या पुस्तकाची पानं उलगडताना, अनुभवत आसणाऱ्या क्षणांचच पुढे वाचनसुख होतं दुकानांवरून जाताना हे बिस्किटाचं, हे चपलांचं, चिवडयांच, हे फुलांचं, हे भाजीचं, हे अत्तरांचं हे कळायला काय नेहमी पाट्या नाही वाचाव्या लागत. नुसत्या वासावरून कळतं. दुरून येणाऱ्या डांबरांच्या वासावरून रस्ता दुरुस्तीला काढल्याचं कळतं. तर तेला-धुराच्या वासावरून तान्ह्या बाळाची आंघोळ चालल्याना कळतं. वास काय फक्त पोलिसांच्या कुत्र्यांनाच येऊन त्यांनी गुन्हेगार शोधावेत असं नाही. जुईच्या गजऱ्याच्या गंधावरून आणि शर्टावर शिंपडलेल्या सेंटच्या वासावरून एखाद्या खडकाआड प्रियाराधन चालल्याचं आम्हीही ओळखू शकतो. हेमंताला निवळ चांदण्या रात्रीचं अंग असतं आणि भाजलेल्या हुरडयाचा गंध असतो. ग्रीष्माला राजवर्खी उन्हाचं अंग तर आंब्याफणसांचा सुवास असतो.

या फणसाच्या सुवासाची एक गोष्ट. आमच्या एका मेजर-मित्रांच्या मुलीच्या लग्नातली लग्नाची मोजक्याच जवळच्या माणसांना छोटीशी मेजवानी. मेजरसाहेबांनी थोडं मंद, थोडं कडक असं द्राक्षासवही पाहुण्यांकरिता ठेवलेलं. पाहुण्यांनीही भरपूर आनंद व्यक्त करण्यासाठी त्याचा भरपूर आस्वाद घेतलेला मेजरसाहेबांची ओळख देशीपरदेशी अशाच एका गौरांगीबरोबर मेजरसाहेब विशेष जिव्हाळ्याने बोलत असताना, विचारपूस करीत असताना, त्यांनी तिने लावलेल्या अंगगंधाची म्हणजे पर्फ्यूमची विशेष स्तुती केली. गौरांगनाही मोकळ्या स्वभावाची. तिने चटकन आपल्या पर्समधून ती सेंटची कुपी काढली आणि मेजरसाहेबांवर एक बारीकसा फवारा मारला. या 'होरी' ची गंमत आम्ही सर्वजण पाहात होतो. मेजरसाहेब विशेष खुषीत आमच्यापाशी येऊन असं सेंट, असा सुवास आपण पूर्वी कधीच घेतला नव्हता म्हणू लागले.

मेजरसाहेबांची धर्मपत्नी आमच्यातच बसली होती. तिने तो वास तर ओळखलाच, पण त्या सेंटचं नावही सांगितलं.

मेजवानी पुढे बराच वेळ चालली. सगळा समारंभ आटोपून आम्ही मेजर-साहेबांच्याच मोटारीतून घरी जायला निघालो. रात्र बरीच झाली होती. पण मंडळी तृप्त होती. मेजरसाहेब सर्व निर्विघ्न पार पडल्याच्या आनंदात होते. मेजवानीच्या आठवणी चुरचुरीतपणे सांगत होते. आणि अचानक...नाक-पुड्या फेंदारीत, नाक फुगवीत, काहीतरी हुंगल्यासारखं करीत मेजरसाहेब उद्‌गारले – 'या मोटारीत वास कसला येतोय, पिकलेल्या फणसासारखा काय ग ? तू काय पाठल्या डिकीत फणसबिणस घेतलाहेस की काय पिकलेला ?'

मेजरसाहेबांचं हे वक्तव्य ऐकल्याबरोबर, त्यांची धर्मपत्नी अशी काय उखडलीय त्यांच्यावर म्हणते कशी, — "काय हो, डोकंबिकं फिरलं की काय तुमचं ? अहो फणसाचा वास काय म्हणताय तुम्ही ? मघा पागल झाला होतात ज्या सेंटवर, तेच सेंट लावलंय मी ! वास नाही ओळखता येत तुम्हाला ?'

रामा शिवा गोविंदा ! या फजितीचा वास मात्र जगातल्या कुठल्याही सेंटला नसावा.

♣ ♣ ♣

२७ ◇ कवडसे...

लहानपणी तिसरी किंवा चौथीच्या पुस्तकात एक गोष्ट होती. आपली अडगुली, मडगुली, मातीचे मोर पोपट, कचकड्याचे वाघसिंह, कापडी भावल्या, लाकडी राजाराणी, पत्र्याचे शिपाईखार असा भातुकलीचा संसार घेऊन खेळता खेळता छोट्या बेबीला लागली झोप. खोलीच्या खिडकीतून एक कवडसा आत आला. आणि ओहो, काय गंमत. कवडसा जसजसा एकेका खेळण्यावर सरकायचा तसतसं ते खेळणं जिवंत व्हायचं. कधी बेबीशी बोलायचं. कधी आपणच आपल्या नादात राहायचं. असा कवडसा पोपटावर पडला. पोपट लगेच बेबीला "बे ऽ ऽ बी, ए बे ऽ ऽ बी, मला पेरूची फोड देऽना" असं ओरडून ओरडून सांगायला लागला. मग कवडसा सरकला लाकडी भावलीवर. ती उठून इकडे तिकडे बघत पुटपुटायला लागली, "अगबाई, अजून स्वयंपाक व्हायचाय सगळा. यांची कचेरीत जायची वेळ होईल. बेबी-बबनची शाळेची घाई होईल. मोलकरीण कपडे धुवायला येईल, काय बाई करावं आवरणार तरी कसं एवढं सगळं एवढ्या झटपट." इतक्यात कवडसा चूल-बोळक्यावर पडला. लगेच भावलीने चूल पेटवून स्वयंपाकाला सुरुवात केली. कवडसा सरकत सरकत राजाराणीजवळ गेला. राजाराणी छान छान गोष्टी करायला लागली. बेबीला मोठी मजा वाटत होती. हे सगळं पाहून होता होता कवडसा वाघावर पडला. क्षणात वाघ डरकाळ्या फोडायला लागला. शेपटी आपटत कुणी सावज मिळतंय का ते चकचकत्या डोळ्यांनी बघायला लागला. बेबीला खूपच भीती वाटली. आणि वाघोबाचं लक्ष पोपट, भावली-वरून थेट राणीकडे गेलं. सावज गवसलं. बेबीची पाचावर धारण बसली. राणी तिची किती आवडती होती. तिची ती परीच्या किनारीची लालचुटुक साडी,

कमरेचा सोनेरी वर्खाचा कमरपट्टा, डोक्यावरचा नक्षीदार मुकुट आणि तिचा तो गोडगोड हसरा चेहरा. बापरे ! आता हा वाघोबा माझ्ता राणीला खाऊन टाकणार की काय? वाघ आता किरण साधून उडी घेण्याच्या पावित्र्यात होता. बेबीला पुढचं बघवेना. तिनं डोळे गच्च मिटून घेतले. आता वाघ राणीवर उडी मारणार, राणी जिवाच्या आकांताने किंचाळणार, रक्ताच्या चिळकांड्या उडवणार. आई ग SS....इतक्यात काय आश्चर्य ! कवडसा त्याच क्षणी बंदूक घेतलेल्या शिपायावर पडला आणि राणीची किंचाळी ऐकू येण्याऐवजी बेबीला ऐकू आला बंदुकीचा एक मोठ्ठा बार ठ्ठो SS ! शिपायाने अचूक नेम धरून वाघोबाचा खातमा करून टाकलेला होता. राजा खूष होऊन आपल्या गळ्यातला रत्नाचा हार काढून शिपायाला बक्षीस देत होता. सगळी खेळणी फेर धरून नाचायला लागलेली होती. आणि कवडसा झोपलेल्या बेबीवरच येऊन पडला. बेबीने डोळे उघडले. बघते तर सगळी खेळणी चुपचाप आपापल्या जागी. जशी मघाशी बेबीने मांडलेली असतात तशीच. स्वप्नभंगाचा बेबीला आनंदच झाला असावा. कारण कवडसा जर शिपायावर पडला नसता तर तिची लाडकी राणी जिवानिशी नाहीशी झाली असती ना ! पण तिखटगोड क्षणांनी विणलेल्या मनाच्या शतरंगी जाजमावर असे आठवणींचे कवडसे पडून जेव्हा जेव्हा ते क्षण पुन्हा एकदा जिवंत होतात, तेव्हा तेव्हा काळाचं चाक उलटं फिरून काही क्षण थांबतं. इतिहासाचा वर्तमान होतो. निसटलेलं काहीतरी पुन्हा गवसतं. काळ्या ढगाच्या सोनेरी धारेसारखं, ते मनाचा गाभा उजळून टाकतं. आठवणींचा कवडसा जुन्या वठून गेलेल्या एखाद्या फांदीला नवा धुमारा फुटवतो आणि ती कोवळीक आयुष्याच्या चालू वाटचालीला एक नवा उत्साह देते. कवडसा असा तिथेच पायबंद व्हावासं वाटतं. तिथेच मुक्कामाला राहावासा वाटतो. पण तसं होत नाही. इतिहास वर्तमान झाला तरी वर्तमानाला भविष्याकडे वळावंच लागतं. चाकाला गती असावीच लागते. गवसलेलं पुन्हा हरवावंच लागतं. आणि कवडशाला सरकावंच लागतं.

कवडसा कशाकशावर पडतो. यात शाळेत बाईंच्या नकळत डेस्काच्या खणात लपवून अधेमधे तोंडात टाकण्याकरिता आणलेली खारवलेली बोरं असतात. फळ्यावर लिहायला बाई वळल्या की ती दोनतीनदा सुखाने तोंडात

उडवलेलीही असतात. पण बाईंना नुसतेच डोळे नसून नाकही असतं हे त्या वेळच्या बालबुद्धीला ठाऊक नसतं. बोराच्या त्या वासावरून नेमका माग काढीत येऊन, बाईनी जेव्हा सर्व मुलींच्यादेखत एका हाताने कान पकडून दुसऱ्या हाताने पाठीत धपाटा घातलेला असतो, त्या वेळी नाकडोळ्यांपेक्षाही, बाईंचे हातगुण आपण बेरजेत धरलेच नसल्याचं लक्षात येतं.

कवडसा आई दिवाळीला करीत असलेल्या जाळीदार घीवरांवर जसा पडतो तसाच "आता फ्रॉक नको घालूस, साडी नेस" असं सांगितलेल्या क्षणावर पडतो. सगळं जग दूरच आणि आरसा तेवढा सर्वात जवळचा असा साक्षात्कार झाल्याच्या, सगळी दुनिया गुलाबी झाल्याच्या, सगळे उद्योगधंदे सोडून सर्व जग आपण चालतो कशा, आपण बघतो कशा आणि आपण हसतो कशा हेच तेवढं निरखून बघत असल्याच्या, आपण पुढच्या बेंचवरून प्रोफेसरांच्या शिकवण्याकडे लक्ष लावण्याचा विफल प्रयत्न करीत असतानाच पाठीला डोळे फुटून, शेवटच्या बाकावरचा तरतरीत नाकाचा आणि उमद्या बांध्याचा, कधीमधीच तासाला येणारा, कॉलेजच्या क्रिकेट टीमचा हँडसम कॅप्टन, आपल्याच लांब वेणीकडे पाहात बसल्याच्या, अशा असंख्य क्षणांवर कवडसा पडत असतो. ओठ मुडपून हसायला लावीत असतो. गालातल्या गालात लाजायला लावीत असतो.

कवडसा कधी प्रवासात भेटलेल्या काही तासांच्याच ओळखीनेसुद्धा डहाणूला नारळ, चिकू, सुरतेला घारी, बर्फी, मथुरेला रबडी असं सगळं मनापासून आग्रह करीत खायला घालणाऱ्या एखाद्या स्नेहाळ म्हाताऱ्यावर पडतो. आश्विनातली एखादी संध्याकाळ, कवडसा पालवतो. तांबुस गुलाबी आकाशरेषेची शोभा, ढगांच्या बहुरूपी आकारामुळे आज मला इतकी जादूची भासतेय की याच्या निकट सान्निध्यात खडकावर बसून बोटांत बोटं गुंतवून मी आकाशाकडे पाहतेय म्हणून ते तसं सुंदर दिसतंय अशा संभ्रमाच्या सुनहरी क्षणांना कवडसा कधी उजळतो.

कवडसा आपल्या आयुष्यावर संस्कार करणाऱ्या कवितांवर पडतो. धृवताऱ्यासारख्या अढळ अशा षड्जानं सुरांचं सौंदर्य खुलवलेल्या एखाद्या मैफलीवर पडतो; कोणार्कच्या मंदिरातलं शिल्प सजीव होऊन जीवनसंजीवक

असे डौलदार विभ्रम करणाऱ्या एखाद्या नृत्यावर पडतो, नाट्यागोऱ्यांवर पडतो, नोकरीधंद्यावर पडतो, चैत्रात फुललेल्या लाल पांगाऱ्यावर बसलेल्या एखाद्या काळ्या कावळ्यावर पडतो; तर हिरव्या पानांनी लदबदलेल्या एखाद्या झाडातून बागेश्रीतून पंचम दिसावा, तशी फक्त तांबडी चुटूक चोच दिसणाऱ्या एखाद्या राघूवर स्थिरावतो; कवडसा कधी फसलेल्या एखाद्या योजनेचं झाकोळ पुन्हा दाखवून उदास करतो; कधी या जगातून कायमच्या निघून गेलेल्या आपल्या आवडीच्या माणसानं सांगितलेल्या विनोदी किश्शावर पडून हसवतो

कवडसा मला आवडतो. रणरणत्या वैशाखी उन्हात अचानक सामोऱ्या आलेल्या आंब्यांच्या राईतून चालताना अंगावर होणारी कवडशांची उधळण ते ऊन जाणवू देत नाही. आठवणींचे कवडसे असेच माझ्या मनाला सोनसळी बनवतात. त्यातून झरणारा जीवनरस माझे सुंदर क्षण जिवंत करीत राहातो. ते माझ्या मनाला मंत्र देऊन जातात. अजुन तरुण मी, अजुन तरुण मी, अजन उगवे अरुण मनात. कवडशांची मी वाट बघत असते.

♣ ♣ ♣

२८ ◇ टांगता आरसा

मोटार चालवताना पाळायच्या अनेक तंत्रांपैकी, समोरच्या टांगत्या छोट्या आरशामधून पाठच्या ट्रॅफिकवर लक्ष ठेवणं हे एक खास तंत्र आहे. पुढची गाडी अचानक वेग कमी करते. तिला वळायचं असतं किंवा थांबायचं असतं किंवा आणखी काही मनात असतं तिच्या. अशा वेळी आपल्याला गाडी पुढे काढायची असते. गाडी पुढं काढताना बघायचं मात्र पाठी असतं. पाठी काय परिस्थिती आहे हे त्या छोट्या आरशात बघून ठरवायचं आणि मगच गाडी पुढे काढायची. असं बघतांना खूप काही गंमती दिसतात.

कुणी ड्रायव्हर बाजूच्या इसमाशी तावातावाने भांडत असतो. कुणी आपण कसे रुबाबदार दिसतो हे आरशात निरखीत असतो. कुणी आपण गाडी लवकर पुढे काढीत नाही म्हणून आपल्यावर डाफरत असतो. कुणी बाजूला बसलेल्या सुंदरीला खूष करण्यासाठी गाडी चालवायचं स्टिअरिंगचं चाक तिच्या हातात देत असतो. कुणी तेवढ्यात सिगरेट पेटवायला घेतलेली असते. कुणी चक्क खिशातून चणेदाणे काढून बकाणा भरत असतो. अशा खूप गंमती.

असंच कधी मागे पाहून गाडी पुढे काढताना एखादा ओळखीचा चेहरा गाडी चालवतांना दिसतो. आता ही बाई लवकर काढेल गाडी पुढे तर बरं अशा त्रासिक मुद्रेनं तो इसम बसला असतानाच आपलं लक्ष त्याच्याकडं जातं. जरा बारीक पाहिल्यावर आठवतं की, अरे हा तर आपला दोस्त, अमुक अमुक. वीसएक वर्षांनी दिसतोय. केस जरा कमी झालेत पण बाकी आहे तस्साच आहे. आणि मग गाडी थांबवून त्याला हाक मारली की मग काय पुढे अर्ध्यापाऊण तासाची बेगमी. गाडीतला तो छोटा आरसा जसं पाठचं दाखवतो तसं आपल्या मनाचा आरसा वीस वर्षांपूर्वीचं सगळं दाखवायला लागतो.

' अहो, मुसावळहून आले आहेत पाहुणे. पण मंत्रालयातल्या त्या-- ची काही गाठ पडत नाही. सरळ इसम आहे. कुणीतरी याची जमीन बळकावून बसलाय म्हणून तक्रार करायचीय. बघा ना जरा कुठे ओळख लागते का ?"

की हे तयारच.

"थांबा हं. प्रयत्न करून पाहू या आमचा तो हा जळगावचाच तर आहे, त्याला विचारून सांगतो. "

की त्या दुसऱ्या इसमाने यांचाच पाठलाग करायला सुरू. असे अनेक प्रसंग. यांना कुणी काही करता का म्हणून विनंती केली की हे लगेच स्वतःची सगळी कामं बाजूला ठेवून झालेच तयार मदतीला. मग ते रेल्वेचं रिझर्व्हेशन असो, सिनेमा-नाटकांची तिकिटं असो, लग्नाची स्थळं असो, नवीन आलेल्या छऱ्या असो, अमेरिकेहून मागवायची एखादी इम्पोर्टेड वस्तू असो. स्वतःच्या खिशाला खार लावून हे जगन्मित्र ते काम करून देणार, आणि नाही झालं फत्ते तर पुन्हा त्या सांगणाऱ्या इसमाच्या शिव्या खाणार.

परवा असाच एक आमचा मित्र बदलीवरून परत आला आणि कपाळावर हात मारून बसला.

" का रे बाबा काय झालं ? "

" अरे काय सांगू कर्मकथा. बालमित्र रे माझा. माझी बदली झाली तेव्हा गयावया करीत माझी जागा सहा महिन्यासाठी मागायला लागला. बायकोला कॅन्सरची शंका आहे. ट्रीटमेंटसाठी मुंबईत राहावं लागेल. मुलीला स्थळं शोधतोय. मुलगा पार्टनरशिपमध्ये धंदा काढतोय. दोनचार महिन्यात सोय होईलच माझी. तोपर्यंत जागा दे. "

" मग ? नाही म्हणणं तुला जमलं नसेलच दिलीस ना सगळी जागा ? "

" अरे नाही. मो ी अक्कलहुषारी दाखवून दोनच खोल्या दिल्या. पण मग दोन महिन्यांनी पुन्हा रडत पत्र लिहिलं की मोठी मुलगी बाळंतीण आलीय माहेरी. सगळा ब्लॉक एक महिन्याकरिता दे. "

" आणि तू दिलास ? अरबाचा उंट आत घुसला आणि तुला बाहेर काढलं ! "

" म्हणजे ? तुला कसं कळलं ? "

"बाघाचे पंजे. ठाऊक नाही तुला गोष्ट ? अरे वाळवंटातील कडाक्याची थंडी. रात्रीची वेळ. त्यात वादळ-वारा. म्हणून तंबूत झोपलेल्या अरबाला त्याच्या बाहेर बांधलेल्या उंटाने विचारलं—माझं नाक अगदी गारंगार पडलंय. तेवढं जरा घेऊ का आत तंबूत ? तेवढीच ऊब ! अरबाने दया येऊन दिली संमती. थोडया वेळाने उंटाने हळूच मान सरकावली आत. मग एक पाय. मग दुसरा. करता करता सबंधच शिरला तंबूत आणि अरबालाच दरडावून सांगतो, काय की, "हो बाहेर. तंबू माझाच आहे ! तशी झाली तुझी स्थिती."

म्हणून म्हणते मंडळी, ही नाही म्हणायची कला यायलाच हवी आपल्याला. खरं म्हणजे इतके कोचिंग क्लासेस चालतात या मुंबईत; एक नकारघंटा क्लास का नाही चालवीत कुणी. शिक्षकांची चणचणही नाही भासायची कधी. सरकारी नोकरी करून रिटायर्ड झालेली बरीचशी मंडळी आदर्श शिक्षक म्हणून काम करू शकतील तिथे. अरबाच्या त्याच उंटावर बसून छान शेळ्या हाकतील.

♣ ♣ ♣

३० ◇ काय तुझ्या मनात....

ऑफिसच्या, नेहमीच्या ठराविक वातावरणाला चुकवावं म्हणून दोन दिवसांची रजा काढून घरी निवांत बसावं. सकाळी पाय मोकळे करून यावं. स्वयंपाकघरात शिरून, कौटुंबिक आवडीचा एखादादुसरा पदार्थ बनवून ठेवावा. बरेच दिवसांपासून वाचायचं राहिलेलं एखादं पुस्तक जरा लवंडून वाचावसं ठरवून, आडवं पडावं. नाही म्हणायला जरा कुठे सुरेखसा डोळ्याला डोळा लागावा आणि टिररर टिरटिररर अशी फोनची बेल वाजावी.

आपण झोपेतच 'हॅलो ऽ' असं हंबरावं. तर पलिकडल्या बाजूने, मधात घोळलेल्या पण कानशीने तासूनसुद्धा टोकदार राहिलेल्या एखाद्या आवाजाने चिरकावं– 'हॅलो ऽ, बाई आहेत?' आणि असंच बरंचसं की मी अमुक अमुक बोलतेय आणि मला तुमच्या त्या तमुक तमुक कार्यक्रमात भाग घ्यायचय तर मी केव्हा येऊ तुम्हाला भेटायला वगैरे.

अशा वेळी आपण तोंडाने, भजी जशी चटणीत बुडवून खावी तशी जी वाक्यंच्या वाक्यं सौजन्यात बुडवून त्या बाईला चघळायला देत असतो. त्या वेळी आपण आपल्या मनात काही दुसरीच वाक्यं बोलत असतो. की जी प्रत्यक्षात, सुकवलेले वाटाणे, खास लाल मिरच्याच्या तिखटात घोळवून फोडणीला टाकल्यासारखी जळजळीत असतात. तेलाच्या नुसत्या स्पर्शाबरोबर ती टाण्टाण् उडतात. त्यांच्या नुसत्या वासानेसुद्धा ठसका लागतो. प्रत्यक्ष चव घ्यायचा जर विचार केला, तर बसल्या जागीच उंच उडी मारावी लागेल, अशी ती मनातली जळजळीत वाक्यं, फायरप्रूफ कागदावर लिहावी लागतील अशी; त्या बाईने न ऐकलेलीच बरी !

अशी ही मनातली वाक्यं. कधी जहाल तर कधी मृदुमधुर. कधी सुखकर तर कधी दुःखदायक, कधी हसरी तर कधी वोचरी, कधी बोलणारा बोलला की ऐकणाऱ्याला वाटावं, सुन्दर, मुलायम, रंगीबेरंगी फुलपाखरंच आपल्या अंगाखांद्यावर बागडताहेत. अशी वाक्य बाकी खास असतात. बोलून, मनीचं सगळं गूज आपल्या आवडल्या मणासाला सांगावंसं वाटत असतानाच ही खासं वाक्यं बुरख्यातल्या सुन्दरीसारखी, मनातल्या संकोचाच्या बुरख्याआड दडूनच बसतात. सांगावसं वाटतं असतं की, तू बघितलंस की चंद्रासव प्याल्यासारखं वाटतं. तुझा स्पर्श झाला की उसाचा तुरा अंगावरनं फिरतो. तुझा शब्द ऐकतांना शंभर सतारींच्या तरफा एकदम वाजतात. तुझ्या श्वासाला पारिजात, बकुळ, जाईजुई यांचा संमिश्र गंध येतो. तुझ्या मनचा तळ शोधायला.... अशी सगळी वाक्यच्या वाक्यं मनात साठतात. मनात राहतात आणि मनातच विरतात. त्यांचे शब्द काही बनत नाहीत.

कधी कुणी हिमालयाचा अवघड बर्फाळ माथा चढला, की आपण मनातल्या मनातच शाबाश् पठे ! म्हणून वाहवा देतो. कधी कुणी डॉक्टर बर्नोर्ड, भाताची रोपं एका जागेहून उपटून दुसऱ्या जागी रोवावी तसं हृदयाचं रोपण करतो, त्यालाही आपण मनोमन क्या बात म्हणतो. कधी कुणाचा सूर लागतो म्हणून, कधी कुणाचा कुंचला अमर रेषा उमटवतो म्हणून; कुणी खेळाचं मैदान गाजवितो म्हणून तर कुणी लढाईत शौर्य दाखवितो म्हणून. असंख्य वेळा आपण मनात वाक्य जुळवतो. मनातच उच्चार करतो, आणि मनातच खूष होतो.

बाकी आपल्या मनातलं, नाही ऐकू येत दुसऱ्याला तेच बरं. नाही तर बढती मिळालेल्या आपल्या सहकाऱ्याला त्याच्या नावानं बोललेली कडू वाक्यं; आपण आपल्या मुलीसासाठी पाहिलेल्या मुलाने बाकनिसांच्या मुलीला पसंत केली म्हणून बाकनिसांचं तोंडावर अभिनंदन करीत असताना, आपल्या मनात आलेली कुरूप वाक्यं – – ऐकायला आली तर प्रलय होईल प्रलय.

नको रे देवा. मनाची वाक्यं मनातच राहू देत बाबा. देवाच्या मूर्तीला देव्हाऱ्यानेच शोभा. स्वातीच्या थेंबाला शिंपल्याचीच शोभा. शारदीय चंद्रकलेला नितळ आकाशाचीच शोभा. उगवत्या सूर्यबिंबाला पूर्ण दिवसानेच शोभा. (आता कदाचित् तुमच्या मनात असेल की, या उपमा चोरलेल्य

दिसताहेत, तर आधुनिक उपमा देते) की, जशी टांगलेल्या साडीला दुकानाच्या शो-केसचीच शोभा, बसमध्ये पाऊल ठेवणाऱ्या उतारूला त्याच्यापाठी ताटकळत उभ्या असलेल्या लांबच लांब रांगेचीच शोभा, नाट्यसंगीतातल्या फिरकीच्या तानेला प्रेक्षकांच्या टाळीचीच शोभा (आता तरी पटलंना, की या अगदी ओरिजिनल उपमा आहेत म्हणून) तशी मनच्या वाक्याला मौनाचीच शोभा.

♣ ♣ ♣

३१ ◇ आग्रह

" नाही पण मी सांगते तुला. तू ही गुलाबीच साडी घे. तोच रंग तुला खुलेल."

आपण दुग्ध्यांत. एकदा ती पिस्ता रंगाची उचलतो, एकदा गुलाबी.

'अग, एवढं कसं समजत नाही तुला. तुझा स्किनकलर बघ. त्याच्यावर पिस्ता रंग म्हणजे अगदी डल् दिसेल बघ. गुलाबी कसा अगदी आइस्क्रीम-सारखा पसरेल ! "

खरं म्हणजे या उन्हाळ्याच्या दिवसात नुसत्या आइस्क्रीमच्या उल्लेखानंही थंड वाटतं. तशा आम्ही मघा अर्ध्या तासापासून हेच चर्विचर्वण करीत उभ्या आहोत. पिस्ता की गुलाबी ! दुकानातला पंखा स्वत:पुरताच असल्यासारखा गरगरतोय. इकडे घामाच्या धारा गळताहेत. तरी पण आपलं पिस्ता की गुलाबी.

" तुला नाहीच पटायचं माझं. मघापासून सांगतेय, ती स्ट्रॉबेरी गुलाबी साडी घे. बघ नेसल्यावर कसं शीतळशार वाटेल. छानसं गुलाबाचं फूल घाल एखादं, गुलाबी रंगाची टिकली कपाळावर आणि कानात तुझी ती बटणं नाहीत का हॉंगकॉंगहून तुझ्या नणंदेने पाठवलेली, ती घाल. अगदी गुलाबपरी दिसशील. घा हो तुम्ही ही गुलाबी साडी बांधून ! "

मैत्रीण सरळ विक्रेत्याच्या हातातच देते ती गुलाबी साडीची घडी. तोही बाप्या मघापासून पिडलेलाच असतो आमच्या पिस्ता की गुलाबीच्या वादात. साडी हातात पडल्याबरोबर अबाऊट टर्न करून तो ती कॅशियरकडे घेऊन जातो. आपण अजूनही ती पिस्ता साडी कुरवाळीत, मैत्रिणीच्या

आग्रहाला बळी पडून घेतलेल्या गुलाबी साडीकडे पराजित नजरेने बघत असतो.

आग्रहाचं हे अस्सं असतं. हा हा म्हणता आपण बळी पडतो त्याला आणि मग बऱ्याच वेळाने लक्षात येतं की आपला यज्ञाचाxxxझाला. कोण कसला आग्रह करतं, कोण कसला आग्रह करतं. हॉटेलात जा मैत्रिणीबरोबर. आपल्याला मनापासून खायची असते शेवपुरी. पण मेळेचा इतका आग्रह होतो मैत्रिणीचा की आपण बळी. नाटकाचं तसंच. सिनेमाचं तसंच. साधं लायब्ररीतून पुस्तक आणतानाही आपल्याला लाख वाचायचं असू दे कवितांचं पुस्तक. पण मैत्रिणीचा शैलजा राजेच्या कादंबरीचा इतका आग्रह होतो की शेवटी नेहमीप्रमाणे आपला बळी.

तरी आता जेवताना जीवघेणा आग्रह करायची प्रथा तरी निदान मोडलीय. पण अजून जिल्हागावी चला. नको नको म्हणत हात जर पानावर धरले तर त्या हातावर वाढतात. घरातल्या घरात तरी किती आग्रह चालतात सुट्टीच्या दिवशी आपण मटणभाताचा बेत ठरवला की हे नेमके म्हणणार, "आज चटणी भरून पापलेट कर ग!" झालं बोकडाऐवजी आपला बळी.

संध्याकाळी बाहेर जाताना बरेच दिवसात मेटलो नाही तर आज माझ्या भावाकडे जाऊ या म्हटलं की मुलं नेमकी म्हणणार, "मामाकडे आमच्या-बरोबर खेळायला कोणी नाही. आत्याकडे जाऊ या. अतुल-अनिलबरोबर गच्चीवर पकडापकडी खेळायला जाम मजा येते!" खरं म्हणजे मामाने जशी पाचगणीत संजीवनी विद्यालयात ठेवलीय् मुलं शिकायला तशीच आपणही सुषमा-शेखरला ठेवू या म्हणून मी आग्रह धरला होता. पण तू फारच बुवा हट्टी. मुलं आपल्यापासून लांब ठेवायची म्हणजे काय घरचे संस्कार कसे होणार त्यांच्यावर? अशी माझ्या आग्रहाची वासलात लावली होती वर पुन्हा माझा आग्रह म्हणजे हट्ट आणि यांचा आग्रह म्हणजे चौफेर विचार करून केलेली सूचना!

मग मीही ठरवलं. ते काही नाही. आपण यापुढे आग्रहाला बळी जाणारा बोकड न होता आपल्यापुढे दुसऱ्याला नमतं घ्यायला लावणारी आग्रही व्यक्ती बनायचं विचार करायला लागलं की मला खिडकीबाहेर पाहायची संवय आहे. तशी मी आपले लागले खिडकीबाहेर पाहायला चैत्री ऊन चरचरीत पडलं

होतं. पण बघता बघता दोन-चार ढग आले आणि चक्क त्यांनी सूर्याचा तोरा झाकून टाकला. मी धास्तावले वाटलं, अस्संच होतं माझंही नेहमी. पण सूर्य कसला आग्रही. पाच मिनिटातच लावलं त्याने त्या ढगांना पळवून आणि आपला आग ओकायचा आग्रह चालूच ठेवला. वाहवा ! अस्सं सूर्यासारखं झालं पाहिजे आपण.

एवढ्यात एक कावळा येऊन खिडकीवर बसला. लागला कोकलायला. किती हाकलले तरी वाकडा डोळा करून नुसता बघायचा. पण हलायचा नाही सूतभर. शेवटी एक हँगर आणून उगारला त्याच्यावर. मग उडाला. पण चाणाक्षच तो. हँगर त्याच्यापर्यंत पोहोचून काही इजा करणार नाही हे क्षणार्धात ओळखलं त्याने. आला लगेच परत. बसला खिडकीवर आणि लागला पुन्हा कर्कश्श कोकलायला. म्हटलं बघा. अस्सा आग्रही स्वभाव पाहिजे.

तेवढ्यात एका वैष्णव सासऱ्याची आणि शैव सुनेची गोष्ट आठवली. वैष्णवांच्या सर्व क्रिया उभट आणि शैवांच्या आडव्या किंवा लांबट. तसं सकाळच्या देवपूजेनंतर सासऱ्याने कपाळावर चांऽऽगलं उभं गंध रेखलं. अंगणात सून सारवण करीत होती तिथे आले सासरेबुवा. बघतात तो सून आडवं सारवतेय. लगेच तिला दम भरून म्हणतात कसे, "काय गे पुत्रवधू, आम्हा वैष्णवांच्या दारात असे आडव्याने संमार्जन ? उभ्याने कर, उभ्याने कर." सून होती चांगली चतुर आणि धीट. मामंजीचा योग्य मान ठेवून पदर अदबशीर डोक्यावरून ओढून हळूच म्हणते कशी, "मामंजी, खरेच चुकले हो. पण दात कसे घासावेत वैष्णवी पद्धतीने तेवढे सासबाईंना शिकवण्यास सांगावे !"

वाहवा रे पठ्ठे. असं धैर्य पाहिजे. आपणही आता असं आग्रही बनायचं. दरवेळी आपला यज्ञाचा बोकड म्हणजे काय ? त्यामुळे सकाळी उठल्यापासून मी माझी आग्रहाची तालिम सुरू केली.

मी आज सर्वांत प्रथम आंघोळ करणार. सर्वांची झाल्यानंतर नाही !

कुण्णी काडही बोललं नाही. मला जरा आश्चर्यच वाटलं. कॅलेंडरकडे बघते तर आज बँक हॉलिडे. फक्त मला तेवढं टी. व्ही.वर कामाला जायचं होतं. पण काम दुपारपर्यंतच होतं. म्हटलं दुपारनंतर आग्रह सुरू करू. त्या आधी म्हटलं टी. व्ही.वर बघू काही जमतं का ते.

म्हणून गेल्याबरोबर सेट्-डिझाइनरला आग्रहाने सांगितलं. "आजच्या या सेटवर मला कुंड्या आणि वेली हव्यातच." त्यावर तो हसत हसत म्हणतो कसा– "बाई तेच सगळं सामान बाहेरून बागेतून आणायला गेली आहेत माणसं." गेला माझा आग्रह फुकट.

मग लाइटिंग इंजिनियरला जोराचा आग्रह केला की ते काही नाही मला तो पाठीमागून जादूचं वातावरण देणारा हॅलो लाईट हवाच. लाइटिंग इंजिनियर, न हसता, पण आस्थेने म्हणाला, त्याचीच सोय करतोय मी. मग मी माझा होरा गायक-कलावंताकडे वळवला. म्हटलं तुम्ही बागेश्री नका म्हणू, केदार म्हणा. बरेच दिवसात कुणी म्हटला नाही तो. मी एवढं म्हटलं मात्र, पूर्णचंद्रासारखा प्रसन्न चेहरा करीत तो म्हणतो, "वाहवा! काय नाव घेतलंत. माझ्याही मनात केदारच म्हणायचं होतं. तुम्हाला कसं सांगावं याच विचारात होतो!"

तरी मी धीर न सोडता घरी आले. आणि आल्याबरोबर अनाउन्स केलं. "आज मी कुणाच्या कुठल्याही आग्रहाला बळी पडणार नाही. आज तुम्ही सर्वांनी माझ्या आग्रहाला मान द्यायचा. आज आपण माझ्या मावशीला भेटायला जायचं संध्याकाळी. एक वर्षं झालं आपण गेलो नाही. बिचारी नेहमी फोन करून आठवण...." माझं वाक्य पुरं व्हायच्या आतच सुषमा ओरडली, "अग आई, मावशीआजीचाच फोन आला होता तू गेल्यावर. त्यांनी आज संध्याकाळी आपल्याला सगळ्यांना जेवायलाच बोलावलंय. आम्हाला प्रत्येकाला विचारून, आमच्या आवडीचा मेनूदेखील ठरवलाय. मी ब्राऊन कस्टर्ड...."

पुढचं ऐकायचा मी आग्रहच धरला नाही.

♣ ♣ ♣

२८५
२३२००
निबंध
१७।१८

३२ ◇ कानगोष्ट

मला अलिकडे वाटायला लागलंय की गोष्ट सांगायची कला आपण विसरत चाललो आहोत. साध्या, सोप्या, छान शब्दात खुलवून खुलवून गोष्ट सांगायची पूर्वीची आपल्या आजीची, आजोबांची, आत्याची, काकीची, फार काय आईचीसुद्धा खुबी आता दिसत नाही. खरं म्हणजे आमच्या पूर्वीच्या आजीआजोबापेक्षा आज आम्ही आया जास्त शिकलेलो. अधिक जग पाहिलेलं. थोडया आयुष्यात पुष्कळ अनुभवलेलं. पण एखादी गोष्ट सांगायला सांगा, आकाशवाणीवर भाषण द्यायला बोलवा, टी. व्ही.च्या चर्चेत भाग घ्यायला जा, व्यासपीठावरून पाचशे लोकांच्या समेत बोलायला सांगा की, जो काय बट्ट्याबोळ होतो तो अत्यंत केविलवाणा वगैरे असतो. आजोबांचा कोट घातलेला नातू जसा विचित्र दिसतो तसे न पेलणाऱ्या शब्दांची ठिगळं जोडून बनवलेलं भाषण दिसतं. नेहरूचाचाची गोष्ट कुणीतरी आजचा काका, आपल्या चौकस पुतणीला सांगतो तो अशी–पंडित जवाहरलाल मोतीलाल नेहरू म्हणजे या भारत देशाचा मानदंड. नेहरूचाचा प्रातःसमयी उठत. मुखमार्जनादि विधी उरकून विद्याभ्यासासाठी बसत त्यांचे पिताजीही महान वकील होते. अमाप संपत्तीचे धनी होते. स्वातंत्र्यलढ्याप्रीत्यर्थ नेहरूचाचानी असीम श्रम केले. म्हणूनच स्वतंत्र भारताचा आद्य पंतप्रधान होण्याचा मान त्यांना मिळाला हे योग्यच झालं. देशासाठी त्यांनी अविश्रांत श्रम केले आणि शेवटी त्याच स्थानावर त्यांचे प्राण पंचतत्त्वात विलीन झाले.

पुतणी मुकाट ऐकून घेते. एवढे विद्वान, बी. ए. झालेले काका, त्यांच्या या नेत्रदीपक शब्दभांडारातली अमूल्य शब्दरत्नं पुतणीसाठी उधळताहेत आणि त्या

लहानग्या जीवाला शाब्दिक स्नान घालताहेत, अंतर्बाह्य पुनीत करताहेत. त्या बालजीवाने—

"काका पण विद्याभ्यास म्हणजे काय ? प्रीत्यर्थ म्हणजे काय ? आद्य म्हणजे काय ? असीम, अविश्रांत, मानदंड म्हणजे काय ? आणि प्राण पंचतत्त्वात विलीन होणं म्हणजे तरी काय ?"

—असे विद्वज्जड काकांच्या ज्ञानप्रदर्शनावर पाणी घालणारे अज्ञानी प्रश्न विचारायचे तरी कसे ?

खरोखर लहान मुलांशी त्यांच्याच भाषेत बोलणं ही एक विसरत चाललेली कला झाली आहे. पूर्वी आमचे वडील आम्हाला बिरबलाच्या गोष्टी सांगायचे. इसापनीतीतल्या गोष्टी सांगायचे. अरबी सुरस कथा सांगायचे. पंचतंत्र होतं, हितोपदेश होता, राजाराणीच्या आणि पऱ्यांच्या गोष्टी तर शेकड्यांनी होत्या. रोज रात्री जेवण झालं की, वडिलांची पाठ धरायची. 'बाबा, गोष्ट सांगा ना.' आणि सर्वांत मजा अशी की बाबा गोष्ट इतकी रसाळपणे, खुलवून खुलवून गंमती गंमतीनं सांगायचे की, तीच गोष्ट परत परत ऐकायला आम्हाला आवडायची. मग आम्हीच सांगायचो—

'बाबा, ती चोराची, मडक्याला नाकडोळे रंगवून, काठीला लावून हळूच झोपडीच्या आत सरकवल्याची गोष्ट सांगा ना.'

'बाबा, ती बिरबलाची वाळूत मोठ्या रेघेशेजारी लहान रेघ काढल्याची गोष्ट सांगा ना,'

'बाबा ती तीन बैलांच्या एकीची आणि सिंहासाठी कोल्ह्याने लावलेल्या कलागतीची गोष्ट सांगा ना.'

'बाबा सिंदबादची, दरीत पडून मांसाच्या तुकड्याला बांधून घेऊन पिशवीत पुष्कळशी रत्नं घेऊन, त्या राक्षस पक्ष्याच्या पायाला स्वतःला बांधून घेऊन दरीतून सुटका करून घेतल्याची गोष्ट सांगा ना.' म्हणजे गोष्टी सगळ्या अगोदरच ठाऊक असायच्या. पण गोष्ट सांगण्याच्या बाबांच्या त्या अप्रतिम हातोटीमुळे तीच गोष्ट शंभर वेळा ऐकावीशी वाटायची. असेच काका, असेच मामा, अशीच आत्या आणि अशीच मावशी.

ही एकमेकांशी सोप्या शब्दात बोलण्याची कला आपण का विसरत चाललो कुणास ठाऊक. मला वाटतं मोठमोठे, जडजंबाल शब्द वापरले की,

विद्वत्तेची साक्ष पटते असा काहीसा समज चौफेर फैलावला आहे. त्यामुळे साध्या हाताचा हस्त होतो आणि डोळ्याचा लोचन होतो. आता आपल्या आवडत्या माणसाचा आपण हात धरतो की, हस्त पकडतो ? सुरेखशी बाई बघितल्यावर आपोआप मिटतो तो डोळा की लोचन ?

ते एक जाऊ द्या. पण ही सहजपणे बोलण्याची कला आपण विसरता कामा नये. आपण बोलायला लागलं की, समोरच्या माणसाला कसं घरगुती वाटलं पाहिजे. प्रसन्न वाटलं पाहिजे. आणि ही कला अंगी बाणवण्यासाठी आपण सर्वांनी लहान मुलांशी अधिक बोलायला हवं. ती जर आपल्याशी मोकळेपणी हसू-खेळू लागली, परकेपणा विसरून घरगुती वागू लागली; तरच आपण जिंकली. आज मुलं, उद्या मोठी माणसं, परवा विद्वज्जनसभा आणि पुढे जगही. ही आपली एक कानगोष्ट.

♣ ♣ ♣

३३ ◇ मूड

" अग पण तू सकाळी कबूल केलं होतंस ना मला. मग का नाहीस फुलं लावलीस फुलदाणीत ? आणि कपाटातले कपडे ? तेही अस्ताव्यस्त झाले आहेत. ते टापटीप करणार होतीस त्याचं काय ? काय हे टेबल. ही पुस्तकं. मासिकं. कसं पडलंय् सगळं वाकडं-तिकडं. "

मुलगी गप्पच.

मी आणखी चिडून विचारलं—सांग ना. एवढी कसल्या कामात होतीस ?

" काम नव्हतं; पण मूडच नव्हता. "

यावर मला रागावता येईना. असतो. हा एक प्रकार असतो खरा. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात असतो. शरदातल्या संध्याकालीन मेघाला सोनेरी किनार लागून ती कधी अचानक खुलेल हे जसं सांगता येत नाही, तसंच फांदीवरच्या कावळ्यासारखा मूड अचानक कधी उडून जाईल हेही सांगता येत नाही.

" आज गाणं जमलं नाही बघा. पंडितजींचा मूडच नव्हता. "

" अरे डाऊन द लाईनपैकी एकही शॉट लागला नाही. सगळे आऊट-साइड. विजयचा मूडच नव्हता. "

" अरे नेहमी किती छान कथाकथन करतात ब. पु; पण काल फ्लॅट रे. मूडच नव्हता वाटतं. "

" सक्काळपासून लाइनीत उभं राहून तिकिटं काढली आणि डॉक्टरचा मूडच नाही लागला. कामात जानच नव्हती. "

" ए आई, आज तुझी डाळिंब्यांची उसळ जमली नाही बघ. काय मूडबिड नव्हता वाटतं. "

मूड अस्सा फसवा असतो बघा. तो एवढ्यातेवढ्याने जातो. सकाळी उत्साहाने चहाचा पहिला कप घ्यायला जावं, तर वर तरंगणाऱ्या साखरेतल्या मुंग्या मूड घालवतात. पेपर वाचायला जावं तर आधीच झडप घालून तो दुसऱ्या फॅमिली मेंबरने पळवलेला. गेला मूड. भाजीवाला, धोबी, फळवाला, शेजारीण यांच्या ओळखीच्या घंट्या वाजून गेलेल्या असताना आता ही कोणाची नवी घंटी म्हणून बघायला जावं तर बडिलांचे कुणीतरी वृद्ध स्नेही सहज आलो म्हणत एक तास बसून मूड घालवतात. आंघोळीला जावं तर नळ गेलेला. बाहेर यावं तर साडीला धोब्यानं शर्विलकासारखं देखणं भोक पाडलेलं. चपला, स्वतःच्या तुटल्या म्हणून मुलीनं पळवलेल्या. करमणूक म्हणून आकाशवाणी उघडावी तर त्यावरची मनुष्यवाणी—

कमी करा गंम्मत बघा मग खालती येईल किंमत—

अशा अर्थाचं काहीतरी घोषवाक्य घुमवून आपल्याला घुसमटवायला सज्ज. बसमध्ये जागा नाही. ऑफिसमध्ये फोन चालत नाहीत. कोणीतरी काहीतरी तिरकं बोलून आपल्या बुद्धिबळातल्या उंटाचा तिरका मूड अधिकच घालवणार; आधीच जात राहिलेला मूड कार्यक्रमाच्या टेन्शनने अधिकच जाणार. त्यात नाकावर बसणाऱ्या माशीमुळे कलावंत त्रस्त. मग निर्माता आता काय माशा मारत बसणार असं सांगत आपण आपल्या मूडचा पुरा खातमा करणार.

घरी आनंदीआनंद. धुण्याभांड्याची बाई तिचा मूड नसल्यामुळे न आल्याने आपला मूड भांडी घासता घासता लख्ख करून घ्यायला आपल्याला एक लास्ट चान्स मिळणार. मूड अगदी जात जात सूर्य अस्ताला जाताना कसा आधी सफरचंद, मग उपडा घडा, मग अर्धं नारिंग, नंतर पपयाची काप, मग केशरी काचबांगडीचा तुकडा आणि शेवटी क्षितिजाबाईंच्या भाळीची आडवी चिरी बनतो. मग ती चिरीही दिसेनाशी होते. आणि बुडून जातो. तस्सा तस्सा आता हा मूड बुडणार. स्वतःबरोबर मलाही चिमणीचं चिंचोळं तोंड देऊन जाणार. मग मी हवा निघालेल्या फुग्यासारखी आकसणार. कोपऱ्यात बसणार. घरातल्या सर्वांचा मूड घालवणार.

आणि अचानक....

क्षितिजाबाईंची कपाळीची चिरी गडप होते आणि ओहो....दहा सेकंदातच आकाशफुल उमलतं. घाणेरीच्या, बोगनवेलीच्या, देवकेळीच्या फुलांचे

३३ ◇ मूड

" अग पण तू सकाळी कबूल केलं होतंस ना मला. मग का नाहीस फुलं लावलीस फुलदाणीत ? आणि कपाटातले कपडे ? तेही अस्ताव्यस्त झाले आहेत. ते टापटीप करणार होतीस त्याचं काय ? काय हे टेबल. ही पुस्तकं. मासिकं. कसं पडलंय् सगळं वाकडं-तिकडं. "

मुलगी गप्पच.

मी आणखी चिडून विचारलं—सांग ना. एवढी कसल्या कामात होतीस ?

" काम नव्हतं; पण मूडच नव्हता. "

यावर मला रागावता येईना. असतो. हा एक प्रकार असतो खरा. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात असतो. शरदातल्या संध्याकालीन मेघाला सोनेरी किनार लागून ती कधी अचानक खुलेल हे जसं सांगता येत नाही, तसंच फांदीवरच्या कावळ्यासारखा मूड अचानक कधी उडून जाईल हेही सांगता येत नाही.

" आज गाणं जमलं नाही बघा. पंडितजींचा मूडच नव्हता. "

" अरे डाऊन द लाईनपैकी एकही शॉट लागला नाही. सगळे आऊट-साइड. विजयचा मूडच नव्हता. "

" अरे नेहमी किती छान कथाकथन करतात ब. पु; पण काल फ्लॅट रे. मूडच नव्हता वाटतं. "

" सक्काळपासून लाइनीत उभं राहून तिकिटं काढली आणि डॉक्टरचा मूडच नाही लागला. कामात जानच नव्हती. "

" ए आई, आज तुझी डाळिंब्यांची उसळ जमली नाही बघ. काय मुडबिड नव्हता वाटतं. "

मूड अस्सा फसवा असतो बघा. तो एवढ्यातेवढ्याने जातो. सकाळी उत्साहाने चहाचा पहिला कप घ्यायला जावं, तर वर तरंगणाऱ्या साखरेतल्या मुंग्या मूड घालवतात. पेपर वाचायला जावं तर आधीच झडप घालून तो दुसऱ्या फॅमिली मेंबरने पळवलेला. गेला मूड. भाजीवाला, धोबी, फळवाला, शेजारीण यांच्या ओळखीच्या घंट्या वाजून गेलेल्या असताना आता ही कोणाची नवी घंटी म्हणून बघायला जावं तर वडिलांचे कुणीतरी वृद्ध स्नेही सहज आलो म्हणत एक तास बसून मूड घालवतात. आंघोळीला जावं तर नळ गेलेला. बाहेर यावं तर साडीला धोब्यानं शर्विलकासारखं देखणं भोक पाडलेलं. चपला, स्वतःच्या तुटल्या म्हणून मुलीनं पळवलेल्या. करमणूक म्हणून आकाशवाणी उघडावी तर त्यावरची मनुष्यवाणी—

कमी करा गंम्मत बघा मग खालती येईल किंमत—

अशा अर्थाचं काहीतरी घोषवाक्य घुमवून आपल्याला घुसमटवायला सज्ज. बसमध्ये जागा नाही. ऑफिसमध्ये फोन चालत नाहीत. कोणीतरी काहीतरी तिरकं बोलून आपल्या बुद्धिबळातल्या उंटाचा तिरका मूड अधिकच घालवणार; आधीच जात राहिलेला मूड कार्यक्रमाच्या टेन्शनने अधिकच जाणार. त्यात नाकावर बसणाऱ्या माशीमुळे कलावंत त्रस्त. मग निर्माता आता काय माशा मारत बसणार असं सांगत आपण आपल्या मूडचा पुरा खातमा करणार.

घरी आनंदीआनंद. घुण्याभांड्याची बाई तिचा मूड नसल्यामुळे न आल्याने आपला मूड भांडी घासता घासता लख्ख करून घ्यायला आपल्याला एक लास्ट चान्स मिळणार. मूड अगदी जात जात सूर्य अस्ताला जाताना कसा आधी सफरचंद, मग उपडा घडा, मग अर्धं नारिंग, नंतर पपयाची काप, मग केशरी काचबांगडीचा तुकडा आणि शेवटी क्षितिजाबाईंच्या भाळीची आडवी चिरी बनतो. मग ती चिरीही दिसेनाशी होते. आणि बुडून जातो. तस्सा तस्सा आता हा मूड बुडणार. स्व तःबरोबर मलाही चिमणीचं चिंचोळं तोंड देऊन जाणार. मग मी हवा निघालेल्या फुग्यासारखी आकसणार. कोपऱ्यात बसणार. घरातल्या सर्वांचा मूड घालवणार.

आणि अचानक....

क्षितिजाबाईंची कपाळीची चिरी गडप होते आणि ओहो....दहा सेकंदातच आकाशफूल उमलतं. घाणेरीच्या, बोगनवेलीच्या, देवकेळीच्या फुलांचे

बगीचेच्या बगीचे फुलवलेली ती शरदातली संध्याकाळ माझाही मूड अनपेक्षितपणे घोसदार फुलवते. खरं म्हणजे दिवस तसा काही वाईट न गेल्याचं एकदम पटतं.

चहाच्या कपात दोन-तीन मुंग्या असतील खरं, पण वास कसा लाजबाब आला होता वाफेला. पेपर नव्हता जागेवर म्हणून तर काल राहून गेलेल्या टेबलक्लॉथला इस्त्री तरी मारून झाली. वडिलांचे ते जुने स्नेही पूर्वी किती मजेदार कहाण्या सांगून आपल्याशी पोरात पोर होऊन खेळायचे ते आठवलं. नळ नसला म्हणून काय झालं; पाणी तर होतं ना भरलेलं बादल्यात. उगाच भसाभसा वापरण्याऐवजी कसा निगराणीनं वापर झाला त्यामुळे पाण्याचा. नाही तरी किती वर्षं वापरायची ती साडी बरं झालं धोब्याने बिघडवली ती. थोडी शिवून कुणा साडी नसणारीला देऊन तरी टाकता येईल. बसमध्ये नंतर जागा मिळाली म्हणून तर आज कितेक वर्षांनी कॉलेजमधल्या नाडकर्णीची गाठ पडली. आसाममध्ये गोहाटीला असतो म्हणे. वीस-बावीस वर्षांचा आढावा घ्यायला पुरेसा वेळही मिळाला नाही. खरं म्हणजे तो फोन चालत नव्हता ऑफिसचा म्हणून किती बरं झालं. शांतपणे बसून पुढलं प्लॅनिंग तरी करता आलं.

छे ! उगाच मूड घालवत राहिलो आपण. दिवस वाया घालवला. मूड कसा लांब पातीच्या कांद्यासारखा असावा. खराब झालेली शेपट कापली तरी उरलेली पात कशी तरतरीत दिसते. काय घडलं असेल बरंवाईट तेवढा तुकडा वेगळा करून टाकावा की उरलेला मूड पुन्हा आपला टवटवीत.

पंडितजींचा मूड कुठेच नव्हता गेला. गाणं जमलं नव्हतं ते आपल्याला ऐकायला जमलं नव्हतं. मूड आपला लागला नव्हता. विजय अमृतराज कशाला मारील शॉटस आऊट मुद्दाम. पण त्याचे शॉटस् लागत नाहीत म्हणून मूड आपला गेला होता. असा मूड घालवून भागत नाही बघा. घोड्यावरच्या पक्क्या मांडीसारखा मूडवर पक्का ताबा ठेवायला हवा. गिरक्या खातो म्हणजे काय. दोर तर आपल्या हातात आहे ना. मिटून जातो म्हणजे काय चैतन्याची फुंकर घालायची शक्ती तर आपल्यापाशी आहे ना. कुटुंबातल्या एका माणसाचा मूड जाऊन कसं चालेल. भुपातला गंधार बेसुरा झाला की, त्या राजाचा सगळा दरबारच हिरमुसला होणार. माणूस हा एकटा असतो हे

समजायला सुद्धा आजूबाजूची माणसं एकदा मोजावी लागतात. या एकट्या माणसावर त्याचं छोटसं घरकुल, पसरलेली नातीगोती, सामाजिक बांधिलकी, देशबांधवांना जोडणारी शक्ती अवलंबून असते. सगळे नेते, कलावंत, खेळाडू, साहित्यिक, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ एकटेच असतात. पण ते एकटेपण अदृश्य भावतंतूंनी सर्व समाजाला जोडलेलं असतं. त्यांनी लावलेले शोध, त्यांनी दिलेले आनंदाचे क्षण, त्यांनी फडकवलेले विक्रम, त्यांनी केलेली निर्मिती आपल्याला मूड देत असते.

साऊंड ऑफ म्युझिक चित्रपटातलं उदासी दूर करण्याचं ज्युली ॲण्ड्रूजचं ते गाणं मला आठवलं—Raindrops on roses and whiskers on Kittens.

गुलाब पाकळ्यांवरचे दंवबिंदू, कापसाच्या गोळ्यासारखी मनीमाऊची पिल्लं आणि त्यांच्या त्या गंमतीदार मिशा, गुबगुबीत हातमोजे, आंत काय बक्षीस आहे याची उत्सुकता निर्माण करणाऱ्या कागदाच्या शोभिवंत पिशव्या असं छान छान आठवावं; मग गेलेला मूड परत येतो.

माझाही तसा आला आणि मुलींनी अर्धवट टाकलेली सगळी कामं मी मूडमध्ये येऊन आटपायला सुरुवात केली.

♣ ♣ ♣

३४ ◇ भूतदया

नको नको म्हणत असताना एके दिवशी माझी मुलगी एक इवलंसं कुत्र्याचं पिल्लू घरी घेऊन आली.

आज वाटतं, बरं झालं त्यावेळी तिनं ऐकलं नाही आमचं ते. नाहीतर आज मऊ मऊ मखमालीवरून ऊठसूठ हात नसता मिळाला फिरवायला. बाहेरून आल्यावर पायाला थंड थंड नाक नसतं लागलं आणि ओल्या ओल्या जिभेने पाय नसते कुणी चाटले. रेशमा खूप समजूतदार कुत्री आहे. ती देखणीही असावी बहुतेक. तिचं नाक छान टोकदार आहे. नाकापासून डोळ्यांचं अंतर, दोन डोळ्यामधलं अंतर, भित्र्यांच्या वरचा कपाळाच्या बरोबर मधोमधचा पांढरा ठिपका, लोलकांसारखे दोन बाजूंना डुलणारे आणि झुलणारे कान, हनुवटीपासून गळ्यापर्यंतचा पांढरा शुभ्र पट्टा, सर्वांगावरचे तपकिरी मऊ केस, आणि तुटुकली शेपूट. रेशमाचे डोळे तर विलक्षण बोलके. मला फिरायला घेऊन चला, जेवण द्या, माझ्याशी खेळा वगैरे स्वतःबद्दल ती सांगतेच. पण आमच्यापैकी जर कुणाचा आवाज चढला असेल तर ह्या फॅमिली मेंबरकडे ती अशा काही मिनतवारीने पाहते, की आमचं भांडण लगेच मिटतं.

बाकी कसल्या तरी पारंपारिक रूढी, धार्मिक बंधनं, बुरसटलेले आचार-विचार पाळण्यापेक्षा आपण पक्षीप्राणी यापैकी काहीतरी का नाही पाळत? मला तर वाटतं 'भूतदया करा', 'मुक्या जनावरांवर दया करा' वगैरे जाहीरनामे लावण्याऐवजी, दोन मुलांनंतर प्रत्येक कुटुंबाने एक तरी पक्षी, प्राणी, मासा, कीड, मुंगी पाळलीच पाहिजे, असा सरकारी फतवाच काढावा. बरं, यांत गरीब-श्रीमंतीचा काही प्रश्न येतोसं मला नाही वाटत. रेशमाला परळच्या ह्या दवाखान्यात नेलं की दिसतात ना असे कलंदर. कोंबडे, खारी,

होले, ससे, बदकं, मोर तऱ्हेतऱ्हेचे प्राणी आणि त्यांचे पालक. कुणी गाडीवाले, कुणी दाढीवाले सगळे सचित. कुणी खास डॉगफूड देत असतील. कुणी आपल्यातलीच मिसळपाव भरवीत असेल. पण आपल्यातलाच घास प्रत्येकजण देत असतो. आपण फेकलेला चेंडू पळत पळत जाऊन आणणारा आपला कुत्रा बघायला जितकी मजा वाटते तितकंच त्याचं तोंड बांधून, हातपाय आवळून त्याला इंजेक्शन देताना बघताना मन घट्ट करावं लागतं.

एकदा ही आमची कुत्री खूप आजारी पडली. तिला हॉस्पिटलमध्ये नेली तर डॉक्टर लोकांनी तिथेच ठेवली. रेशमासारखे तिचे लांब सुंदर केस त्यांनी भादरून काढले. पूर्वीच्या विधवेसारखं तिचं विद्रूप केलं. माझी मुलगी तर सकाळ-संध्याकाळ हॉस्पिटलमध्ये जायची आणि घरी असायची तेव्हाही टिपं गाळीत बसायची. आम्ही सगळे उदास झालो होतो. केस काढलेला, इंजेक्शन-औषधांनी हैराण होऊन तिच्या त्या पाणीदार डोळ्यांनी मिटीमिटी बघणारा रेशमाचा चेहरा सारखा समोर दिसायचा. आमचंही कामातलं लक्ष वारंवार उडायचं. तशांत कुणीतरी म्हणालं, 'काय बाई, या देशात माणसांना खायला मिळत नाही आणि तुम्ही एका कुत्रीसाठी कासावीस होता. त्याक्षणी वाटलं बरं झालं, या माणसासारखा अविचार या देशातले तमाम लोक करीत नाहीत ते. नाहीतर या देशातली इंच न् इंच जमीन फक्त धान्य उगवायला वापरली गेली असती. गुलशनमध्ये कधी फुलं फुललीच नसती. पोटं तरी भरली असती की नाही कुणास ठाऊक पण मनं मात्र रितीच राहिली असती.

किती झालं तरी आम्ही माणसं. आम्हाला बरं वाटावं, आमचे ताण कमी व्हावे, आम्हाला हलकं वाटावं म्हणून आम्ही या पाळीव प्राण्यांवर स्वार्थी प्रेम करीत असतो. पण हे मुके प्राणी मात्र आमच्यावर जे करतात ते उन्हापावसा-इतकंच निरपेक्ष, निःस्वार्थी प्रेम असतं. मोबदला न मागणारं.

♣ ♣ ♣

३५ ◇ पळा पळा कोण पुढे पळे तो !

नाकावरच्या चष्म्याच्या काचेतून रोखून बघत जेव्हा का ही कविता बाईंनी कधीकाळी शिकवली, तेव्हापासून आपण सगळे पळायला लागलो आहोत. कच्च्या वर्गातून पुढल्या वर्गात, मग कॉलेजात, मग तऱ्हेतऱ्हेच्या स्पर्धांत, निरनिराळ्या क्षेत्रात. त्यातल्या मोठमोठ्या चढाओढीत विद्या, कला क्रीडा, साहित्य, राजकारण. पळापळीची अशी सवय एकदा अंगात बाणवून घेतल्यावर मग " जीवन हीच एक मोठी शर्यत आहे " वगैरे थोरांचे विचार आहेतच त्यावर शिक्कामोर्तब करायला.

सारखं पुढं सरका. बसच्या रांगेत उभं राहावं. समोर एखादी गंमतशीर दुकानाची पाटी वाचत राहावं की डाफरलाच पाठचा माणूस,'अहो पुढं सरका की.' प्रत्यक्ष बस आल्यानंतर आत पळायचं कसब तर रोजच्या सरावातनंच अंगवळणी पाडावं लागतं. वाचनालयात जावं तर नवीन आलेल्या पुस्तकांसाठी आपल्या आधीच पळत येऊन कुणी कुणी रांग धरलेली. पळालो नाही तर आगगाडीच्या तिकिटांचं रिझर्वेशन करता येणार नाही. नाटक-चित्रपटांची द्राक्षं तर नुसत्या वर्तमानपत्रांतल्या परीक्षणांवरूनच आंबट मानून घरी बसावं लागेल. पळापळ करून दुकानांत पोहोचलो नाही तर आपल्या आधी पळून पोहोचलेल्या इतर सर्व गिऱ्हाईकांनी सेलमधला पंधरा टक्के सुटीचा माल पार खरेदी करून टाकलेला. आपल्या वल्लमेपाशी दुसरा कोणी पळाडू पोहोचण्या-आधी आपण पोहोचलेलं परिणामी अधिक बरं.

हे आणखी एक तंत्र सांभाळावं लागतं पळताना कुणी आपल्या अगदी जवळपास तर नाही ना येऊन पोहोचलेला. आपला वेग कमी न करता दुसऱ्या कुणाचा वेग जास्त तर नाही ना झालेला याची खात्री करून घ्यावी

लागते. आपण सर्वांत पुढे असणं हा तर शर्यतीचा मानबिंदू. लोळणाऱ्याने उभं राहावं, उभं राहिलं की चालायला लागावं आणि चालता चालता पळायला लागावं आणि पळणाऱ्याने सर्वांत पुढे पळावं असा तो हितोपदेश आहे.

मुळातली कविता थोडकीशी आठवतेय ती अशी—

खेळूं नका केवळ गंजिफा ते
ते खेळ गादीवर बैसण्याचे
त्या सोंगट्या भांडण लाविताती
होई न तत्संगति सौख्यदाती ॥

यास्तव—

पळा पळा कोण पुढे पळे तो
पाहूं बरे कोण थकूनि जातो

कवितेत पुढे लंगडी, आट्या-पाट्या, खोखो हे मैदानी खेळ खेळणाऱ्याला कसे बलवान, चपळ आणि खिलाडू बनवतात ते सांगितलंय् म्हणजे घरात बसू नका. मोकळ्या हवेत बाहेर पडा आणि पळा, खेळा, करा शक्ती गोळा. ते खरं हो. पण गेले ते असं सांगणाऱ्या कवीचे दिवस. आजच्या शहरी संदर्भात कसं खरं करायचं हे ! आधी मोकळी मैदानं आहेत कुठे लंगडी घालायला ! ! आता प्रॅक्टीस सुटू नये म्हणून मग घालतात बापडी मंडळी राजकीय पुढाऱ्यांपुढे लंगडी. देतात एक दुसऱ्याला राजकीय खो. खेळतात पक्षोपपक्ष आट्यापाट्या. आज खेळायला मुलंही पळत नाहीत. शनिवार-रविवारी जरा जात असत मैदानावर तेही आता टी. व्ही. वरल्या सिनेमाने बंद करून टाकलंय. पूर्वीचा कवी शर्यतीत पळा पळा म्हणून सांगत होता ती शारीरिक शक्ती, मानसिक बळ आणि वृत्तीतला खिलाडूपणा वाढावा म्हणून. आज शक्ती म्हणजे द्रव्यशक्ती असं फसवं समीकरण सुसंस्कृत आणि सुशिक्षित माणसाने सुद्धा जमवलंय आज माणूस पळतो तो या अर्थशक्तीपाठी. स्पर्धेत उतरतो तो सत्तेसाठी. शर्यत करतो तो समाजातल्या दुर्बल घटकांना पाठी लाथाडून स्वतः पुढे पळण्याची अंतिम सुखासाठी ही सगळी पळापळ करावीच लागते अशी स्वतःची समजूत घालत. स्वतःच्या सावलीपाठी पळण्यासारखं.

तर मग काय पळूच नये ? छेः छे ! पळावं ना. पण नुसत्या शरिराने नव्हे. मनाने पळावं. सुंदरता पकडायला. उगवत्या सूर्याचे सोनेरी किरण, समुद्राच्या लाटांचा जुईचा फेस, भर दुपारी डोक्यावर उंच घुमणाऱ्या घारीचं आवर्त असं सगळ पकडायला पळावं. हुसेनच्या कुंचल्यातला वेग, ज्ञानोरांच्या कवितेतला आवेग पकडायला पळावं. शरदांतली चांदणरात पकडावी, पारिजातकाचा केसरगंध पकडावा, पाखरांची भिरभिरती शीळ पकडायला पळावं, सुंदर गालावरचा तीळ पकडायला पळावं, भाबड्या वारकऱ्याच्या अभंगातला भाव हळूच पकडावा आणि सुगरिणीच्या स्वयंपाकातला गंध धावून साठवावा. आणि हो. मनच ते. आपलं आपल्याकडे राहील याची खबरदारी घ्यायची हो. नाही तर तेच दुसऱ्या कुणाकडे तरी पळून जाऊन बसायचं. म्हणजे मग जगातल्या सुंदरतेकरिता पळायचं कुणी ?

♣ ♣ ♣

३६ ◇ भित्यापाठी

"तिथे नको जाऊ हं, तिचे मेव्हणा बुवा बसलाय दाढीवाला. तुला पोतडीत भरून ठेवील."

"नको बाई त्यांच्या तोंडाला कोण लागेल? उगाच चारचौघा देखत काहीबाही बोलतील."

"अरे काहीसुद्धा काम करीत नाही पण रुबाब केवढा. एकाला चार शब्द उलट बोलतो. बॉससुद्धा टरकून असतो त्याला."

"जाऊ द्या झालं. आपल्याला आहे ना ठाऊक त्यांचा स्वभाव. आपण आपलं मुकाट ऐकून घ्यावं. त्यांच्याशी वाद घालायचा म्हणजे सात पिढ्यांचं उद्धार."

असे घाबरून, दबून, नमून, लवून, टरकून लहानपणापासून जीवन जगायची शिकवण मिळते आपल्याला. त्यामुळे सागरगोटे आपले असूनही दादागिरी तिसऱ्याच कुणा कमळीची. आपला वाढदिवस म्हणून आपण जरीच्या काठाचं परकर-पोलकं घालून, केसांच्या दोन वेण्यावर फुलांचा गजरा माळून खुषीत शाळेत जावं; तर तिसऱ्या कुणा बनीटनीच्या घोळक्याने "एहेरे, एवढी माठी घोडी झाली आणि वाढदिवसासाठी नटून येतेय." अशी सर्वांदेखत टर उडवावी आणि आपण गप्प राहावं. हेच गप्प राहाणं पुढेसुद्धा कायम पाळीत राहातो आपण. कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये आपला गाण्याचा कार्यक्रम म्हणून आपण चारी धाम धुंडून आणलेले तबलजी, पेटीवाले सरळ फिल्मी सॉंग म्हणणाऱ्या दुसऱ्या कुणी बेरक्या मिडूने फुकटात वाजवून घेतलेले. कॉलेज मॅगझिनसाठी आपण एखाद्या नवीन ताज्या विषयावर ललित लेख लिहून मॅगझिनच्या चिटणिसांकडे दिलेला. थोडे दिवसांनी लेख परत! का? तर

म्हणे याच विषयावर त्या सीनिअरच्या अमकीने लेख लिहिलाय. तिचं हे शेवटचंच वर्ष. तेव्हा तुम्ही पुढल्या वर्षी लिहा. सरळ चोराचारी. तरी आपण आपले गप्प. शिकवण ना लहानपणापासूनची. कशाला उगाच भांडायचं. द्यावं सोडून. असंच आपण ड्रामा सेक्रेटरीच्या खास मैत्रिणीसाठी नाटकांतलं काम सोडलेलं असतं. असंच पुढे ऑफिसमध्ये नोकरी करायला लागल्यावर, आपल्याशी कुचकेपणाने वागली तरी काय झालं, बिचारीचे वडील कॅन्सरने आजारी आहेत तर तिलाच मिळू दे, म्हणून प्रमोशन सोडलेलं असतं. अशीच बसच्या क्यूमध्ये जागा सोडलेली असते. उगीच रेटारेटी नको म्हणून उन्हाळ्याच्या सुट्टीत रेल्वेच्या रिझर्व्हेशनसाठी तास न् तास रांगेत खोळंबून-देखील घुसखोर माणसांशी कशाला उगाच हुज्जत म्हणून पाठी सरकून आणखी एक तास घालवलेला असतो. हैदराबादहून आणलेल्या खास खड्यांच्या बांगड्या मनात नसूनसुद्धा उगाच गावभर "एवढ्या एका दिवसासाठी नाटकात घालायला मागितल्या तरी दिल्या नाहीत" अशी बदनामी करीत हिंडेल म्हणून ऑफिसमधल्या अगदी खडूस बाईला दिलेल्या असतात. अशी आपली पुस्तकं जातात, पेनं जातात, एकाददुसरी हौसेनं घेतलेली साडी जाते, शेजारी पाठवलेली भांडी जातात, काय काय जात राहातं. बरं गप्प बसून तरी काही फायदा? तोही नाही. आपलीच वस्तू घेऊन, परत न करून, वर आणि "काय बाई दहा वेळा मागतात, यांच्याकडे होती म्हणून मागितली ना. आमच्याकडे असती तर कशाला लागलं असतं यांच्याकडे तोंड वेंगाडायला. तरी बरं देवानं एवढं भरभरून दिलंय," हा आणि वर आहेर

शेवटी एके दिवशी मी खूप गंभीरपणे या समस्येचा विचार करायला लागले. अरेबियन नाइटसमधल्या त्या गोष्टीची आठवण झाली. जहाज फुटून सिंदबाद कुठल्या तरी निर्जन बेटावर येतो. बेट हिरव्यागार झाडाझुडपांनी समृद्ध असतं. रंगीबेरंगी फुलांनी वेली आणि गोमट्या रसाळ फळांनी वृक्ष लदबदलेले असतात. त्याच झाडांची थोडी फळं खाऊन झऱ्याचं निर्मळ, शीतळ पाणी पिऊन सिंदबादला थोडा दिलासा मिळतो. एवढ्यात केसाच्या चंदेरी जटा झालेला एक जरूख म्हातारा करुण नजरेनं पाहत पाहत, जमिनी-वरून खुरडत येताना सिंदबादला दिसतो. म्हाताऱ्याची दया येऊन सिंदबाद विचारतो, "आजोबा, बरेच दिवसांचे उपाशी दिसता, थोडी फळं देऊ का

काढून झाडावरून ?" त्यावर आजोबा क्षीण हसून त्याहूनही क्षीण आवाजात सिंदबादला सांगतो की, "बेटा, मी कुणाचे असे आयते उपकार घेत नसतो. तू जरा मला तुझ्या खांद्यावर बसू दे म्हणजे मीच तोडीन झाडावरची फळे" सिंदबाद बिचारा सज्जन माणूस. स्वतः कपट न करणाऱ्या माणसाला दुसऱ्याच्या मनातलं कपट कसं कळणार ? तो घेतो त्याला खांद्यावर. पुष्कळशी फळं खाऊन झाल्यावर म्हाताऱ्याला सिंदबाद म्हणतो, "आजोबा, आता उतरता ना खाली. पण म्हातारा खमक्या ! सिंदबादच्या गळ्याभोवतालची, त्याच्या काटकुळ्या पायांची मगरमिठी जरासुद्धा ढिली न करता तो खुनशी म्हातारा खदाखदा हसत म्हणतो, "आता बरा उतरेन ? आता हा अस्सा कायम तुझ्या खांद्यावर बसून राहणार. तू झोपलास, उठलास, पळालास काही केलंस तरी मी हा अस्सा बसून राहणार !"

मला वाटलं तस्सा तो भीतीचा ब्रह्मराक्षस लहानपणापासून आपल्या मानगुटीला धरून बसलेला असतो. सिंदबादने पुढे युक्ती लढवून त्या म्हाताऱ्याला मोहाच्या फुलांची दारू पाजून त्याची पकड ढिली झाल्याबरोबर त्याला फेकून देऊन पळ काढलेला असतो. मी म्हटलं आपल्यालाही अशीच काहीतरी युक्ती लढवायला पाहिजे. सशाच्या काळजाची जागा वाघाच्या काळजाने घेतली पाहिजे. उन्हाने पडद्याच्या या बाजूचा रंग फिका झाला तरी त्या बाजूचा कसा ताजा टवटवीत असतो, तशी मीही माझी आतापर्यंतची 'कशाला उगीच'ची सोडून द्यायची मुळमुळीत बाजू आत घेऊन 'हे असंच व्हायला हवं'ची तरतरीत हुकमी दमदार बाजू बाहेरच्या बाजूला घेऊन जाम शिवण मारून टाकली.

आणि काय आश्चर्य. आतापर्यंत मला टरकवणारी माणसं आता मलाच टरकायला लागली. त्यांचे चार शब्द तर आपले आठ असं गणित मांडल्याबरोबर त्या खांद्यावरच्या ब्रह्मराक्षसाचे पाय लटपटायला लागले. त्यांचा स्वभाव भांडखोर आहे ना, मग आपण तरी का चूप राहायचं. स्वभावात नसेल आमच्या भांडखोरपणा. पण तापलेलं दूध, आतल्या आत किती दिवस खदखदत ठेवायचं ? जाऊ दे की उतू कधीतरी. असा चढाईचा पवित्रा घेतल्याबरोबर लक्षात आलं की आतापर्यंत आपण ज्यांना 'जाऊ द्या हो कशाला उगीच' असं सौजन्य दाखवीत होतो, ते नुसतेच बोलके ढलपे आहेत.

आपण आवाज लावला की, यांची तारच तुटते अंधारात दिसणाऱ्या वाकड्या काटकीलाच साप समजून आपली गाळण उडते धीर करून चार पावलं पुढे आलं की त्याच काटकीला उचलून तिचे चार तुकडे करून चार दिशांना फेकून देता येतात. रात्री रानात साधी झाडंझुडपंसुद्धा अक्राळ-विक्राळ पशुपक्ष्यांचे आकार घेऊन आपल्याला मेडसावतात. दिवसाढवळ्या पाहिलं तर बिचारे निरुपद्रवी जांभळीचं झाड, नाहीतर करवंदीची जाळी. भीती मनात असते. मनातली ही भीतीची रात्र काढून टाकून हिमतीचा दिवस त्या जागी ठेवला की सगळे भस्मासूर नाहीसे. या भीतीपोटी आपण डोळे असून आंधळे झालेले असतो.

परवा जागतिक कीर्तीच्या हेलन केलरबाईंच्या स्मृतीप्रीत्यर्थ एक कार्यक्रम केला. त्यात भाग घेतलेल्या नेत्रहीन बंधुभगिनींचा जीवनाविषयीचा अपार उत्साह, चैतन्याची सारखी सळसळ, भविष्याबद्दलचे महत्त्वाकांक्षी बेत ऐकले आणि मनावरचं हे खोट्या भीतीचं पटल साफ दूर झालं. नेत्रहीन असून त्यांना भीती नव्हती. चिंता नव्हती. काळजी नव्हती. उलट होता तो उदंड आत्मविश्वास, जिद्द, हिंमत.

आयुष्याच त्यांनी पेलून धरलेलं ते शिवधनुष्य पाहिलं आणि त्याला बाण लावून भीतीचा ब्रह्मराक्षस मी मानगुटीवरून समूळ उपटून काढला. आत्म-विश्वास ज्ञान, अनुभव, धडाडी, चिकाटी आणि मुख्य म्हणजे मोठ्या सुदैवाने लाभलेल्या या नरजन्माचं सार्थक करून दाखवणारा सोड्याच्या बाटलीसारखा फसफसणारा दुर्दम्य उत्साह असला ना की भीतीला जागाच कोठे उरली आणि मग तो 'कशाला उगीच बाईचा' ब्रह्मराक्षस तरी कुठला असायला ? तो तर मित्र्यापाठीच असतो ना.

♣ ♣ ♣

३७ ◇ चाळा

सबंध नाटकभर माझं लक्ष तेवढ्या एकाच गोष्टीवर खिळून बसलं होतं. त्यातलं ते भव्य, सुंदर रंगसंगती साधलेलं नेपथ्य; जरतारी मखमाली, किनखापी सजावट; आकर्षक आणि देखणी नायिका; तिची ती आम्रपाली-सारखी, एखाद्या अजठा शिल्पावरून घेतलेली रेखीव वेशभूषा; डोक्याच्या आकाराहूनही मोठी पण तिच्या चेहऱ्याला शोभून दिसणारी केशभूषा; नुसते डोळे फिरवून आणि गाल फुगवून हंशा घेणारा कुशल विदूषक; सगळं कसं सफाईदार चाललं होतं. संवाद चटपटीत होते; प्रेक्षकही छान प्रतिसाद देत होते. छायाप्रकाशाची योजना कल्पकतेने केलेली होती. अधे-धे कानावर येणारे कधी गळ्यातले तर कधी वाद्यातले असे सुरही या सर्वांची खुलावट वाढवीत होते. आणि तरीसुद्धा माझं लक्ष तो नायक रंगमंचावर आला रे आला की ना त्याच्या भाषणाकडे, ना त्याच्या दृष्टिक्षेपांकडे, न त्याच्या देखण्या व्यक्तिमत्वाकडे. पण....फक्त एकाच गोष्टीकडे जात होतं. त्याचा भरजरी शेला. अंगावरून एखाद्या उपाध्यायासारखा पांघरलेला नव्हे. राजाच्या भूमिकेत जरीचे काठ लावलेल्या, डाव्या खांद्यावरून जाऊन, उजव्या हातावर सहज पडणारा तो रेशमी शेला. त्याची ती सहजसुंदर घडी. तीच....तीच ती शेल्याची घडी आणि ती सावरताना होत असलेली त्या देखण्या नायकाची तारांबळ. अमात्याच्या एखाद्या कारस्थानी सूचनेवर, डावीकडे चटकन मान वळवून एक सणसणीत नजर टाकण्याची ॲक्शन आणि नेमकी त्याच वेळी ती शेल्याची घडी डाव्या खांद्यावरून निसटून डाव्या हाताच्या कोपरापर्यंत घसरायची की अमात्याच्या त्या वाक्याच्या निषेधार्थ गुडघ्यापर्यंत झटकलेला तो डावा हात, शेल्याची ती निसटलेली घडी

सावरायला पुन्हा वर यायचा आणि नाटकाची घडी पुरी विस्कटायची. सगळं तेजच निघून जायचं त्या ॲक्शनमधलं. प्रेक्षकात तर चुळबुळ व्हायचीच; पण मी तर त्या शेल्यातच गुरफटायची.

"सेनापती, शत्रुसैन्याच्या घोडदळाची धूळ, आमच्या फौजेच्या नगर-सीमेच्या बाहेरच्या टेकड्यावर बसवलेल्या निरीक्षक सैनिकांना दिसली असं सांगण्याऐवजी, आमची फौज शत्रुपक्षाला धूळ कशी आणि किती सहज चारू शकेल याचा उपाय जर तुम्ही सुचविला असतात तर आम्ही आपल्या-विषयी बाळगलेल्या आजवरच्या विश्वासाला खचितच अधिक मजबुती आली असती," असं जोरदार वाक्य. आणि या वाक्याच्या शेवटी दिग्दर्शकानं ॲक्शन दिलेली की उजव्या हातावरची शेल्याची ती घडी सर्रदिशी उजव्या खांद्याखालून ओढून एका झटक्यात डाव्या खांद्यावर फेकायची. ते वाक्य सुरू झालं मात्र, या देखण्या नायकाचं अर्ध लक्ष त्या शेल्याकडं लागलं. ॲक्शन तर वाक्याच्या शेवटी होती. आणि वाक्य तर हे ऽ लांबलचक होतं. तर वाक्याच्या अधे-मधे दोनतीनदा त्या उजव्या हाताची चाळवाचाळव झालीच. पण अखेर जेव्हा तो क्षण आला तेव्हा मी अगदी मघापासून श्वास रोखून बघत बसले होते तेच झालं. उजव्या हाताने तो शेला झटक्यात डाव्या खांद्यावर उडवताना, दिलेल्या मानेच्या हेलकाव्यात, शेल्याचा जर नेमका डाव्या कानातल्या त्या एका मोत्याच्या बाळीत अडकला! झालं. वाक्याला टाळी मिळण्याऐवजी शेल्याला बाळी मात्र मिळाली.

आणि मग मला तो चाळाच लागला. याचं वाक्य येतं कधी आणि हा शेल्याचा घोळ घालतो कधी. त्या दिग्दर्शकाची बुद्धा धन्य. त्याने देखील अगदी प्रत्येक महत्त्वाच्या वाक्याला शब्दांबरोबर शेल्याचीही फेक ठेवली होती. या फेकाफेकीत शब्दांना शेला, शेल्याला कडं, कड्याला कमरपट्टा, कमरपट्ट्याला शेल्याचं दुसरं टोक अशी जी काही शेलेशायरी व्हायची ती पाहताना मी आपलं 'अरसिक किती हा शेला' असं मनातल्या मनात गुणगुणून मन रमवायची.

हे असं नेहमी होतं बघा. चंद्रावरच्या डागावर लक्ष जावं तसं आपलं मन एखाद्या माशीसारखं नेमकं व्रणावर जाऊन बसतं. बसमध्ये बसलेलं असावं आणि बाजूचीच म्हातारी डुलक्या घेणारी. साऽरखी मनाची पाल चुकचुकत

असते, आता टेकणार हिचं डोकं आपल्या खांद्यावर. मुक्कामावर उतरेपर्यंत डोक्याला हाच ताप. बस आधी थांब्यावर की म्हातारीचं डोकं खांद्यावर.

सिनेमाला जावं. नेमका आपल्याच समोरच्या खुर्चीत उंच पगडी बांधलेला उंचापुरा सरदारबांधव. एकदा डावीकडे झुकतो तर परत उजवीकडे कलतो. छान सस्पेन्स मूव्ही असावा. धूसर वातावरणात, दूरवरच्या टेकडीवर एकच दिवा मिणमिणत असावा. कॅमेरा जसजसा दृश्य जवळ जवळ आणतो, तसतसे झाडाझुडपांचे वाकुडतिकुड आकार स्पष्ट दिसायला लागतात. त्यांच्या त्या वेड्यावाकड्या सावल्या वाकुल्या दाखवतात. दूरवरच्या ढोलींतल्या घुबडाचे डोळे चमकतात. दिवा जेथून मिणमिणत असतो ते भयाण घर दिसते. कॅमेरा आणखी जवळ येतो. घराचे लाकडी वासेही दिसतात. दार करकरतं, आपल्या अंगावर काटा येतो. गळ्यात काहीतरी अडकल्यासारखं वाटतं. प्राण डोळ्यात येतात. आता काय होणार? दारामागून काय बाहेर येणार? काय अघटित घडणार? आणि इतक्यात एक मोठ्ठी किंकाळी ऐकू येते, काय झालं ते पाहायला चित्रपटगृह असूनही आपण नकळत थोडे पुढे वाकतो आणि पुढल्या रांकेतला सरदारबंधू पगडीसकट नेमका उजव्या हाताला झुकतो. सबंध स्क्रीनभर नुसती त्याची पगडीच पगडी दिसते! पुढचा सबंध सिनेमा लिफाफ्याला जसं तिकीट चिकटतं तसं आपलं लक्ष पगडबंद होतं.

फोनवर बोलणारा माणूस लवकर आटपतच नाही. असतं काम तिळाएवढं; पण त्याला शब्द मणाएवढे. आणि त्यात पुन्हा दर पाचव्या शब्दानंतर 'हॅलोऽऽ', अरेच्च्या पण मी ऐकतेय. बोला तुम्ही. हं. ऐकू येतंय ना पण 'हॅलोऽ?' आता काय करावं? अहो मिस्टर मी अगदी नीट लक्ष देऊन ऐकतेय्. तुम्ही बोला.

हं, मग हरकत नाही. नाही. नाहीतर हॅलोऽऽ? काऽऽ य?

नाही. काही काही वेळा लाईन खराब असते म्हणून. तर हॅऽऽलो?

आता त्याच्या बोलण्यावरचं लक्ष उडून त्याच्या हॅलोऽऽ वरच बसतं. अरे भाई बोलोऽऽ तरी आपलं हॅलोऽऽऽ!

कधी एखादा माणूस ऑफिसमध्ये भेटायला येतो. असाच वाक्यांचा घोळ. जे काम दोन मिनिटात होणारं असतं त्याकरता हा वीस मिनिटं घेतो. दर दोन

मिनिटांनी खुर्ची दोन पायांवर उचलतो. हो. ही याची खोड. दोन वाक्यं बोलला की उचलली खुर्ची दोन पायांवर. काही वेळानंतर मला सीसॉवर बसल्यासारखं वाटायला लागतं.

मनाचा हा असला चाळा मोठा विलक्षण असतो. लोकलने रोज प्रवास करणाऱ्याला ती नेमकी कुठे मधल्याच ठिकाणी थांबते ते माहीत असतं. तो स्टेशनची वाट न पाहाता त्या विनासंकेत थांबण्याच्या जागेचीच नकळत वाट पाहात राहतो.

आताच पाहा ना. इतका वेळ मी या पेनने लिहिते आहे, लिहिता लिहिता यातून कधीतरी एखादा शाईचा कुरूपसा थेंब गळतो. सघांपासून निर्विघ्नपणे लिहितेय; पण माझं सगळं लक्ष तो थेंब कधी पडेल याच्याकडे आहे तेव्हा ते थेंबायच्या आत मीच थांबते.

♣ ♣ ♣

३८ ◇ टेबलापलीकडचा माणूस

"नाही, पण ते एवढ्या लवकर जमेलसं वाटत नाही."

"पण जरा घाई करून बघा हो. बरेच दिवस झाले आम्ही तुम्हाला सांगून."

"तं खरं हो; पण आम्हालाही बरेच ठिकाणी लक्ष द्यायला लागतं ना. त्यात माणसांची कमतरता. साधनसामग्री तुटपुंजी, हाताखालची माणसं कामचुकार."

"नाही पण साहेब. शक्य तो जरा बघा, शक्य तेवढ्या लवकर शक्य ते जमेल ते."

"पाहू, प्रयत्न करू."

अशी आश्वासनं, अशी अजीजी, असं संभाषणं ऐकू आलं म्हणजे निश्चित समजावं की टेबलाच्या अलीकडचा इसम टेबलाच्या पलीकडल्या असामीशी बोलतोय्. मग ती पलीकडली असामी एरवी जरी अगदी सामान्य असली तरी त्यामध्ये असलेल्या टेबलाने तिला मानाचा तुरा अडकवलेला असतो.

ही टेबलापलीकडली माणसं म्हणजे दहा ते पाचच्या वेळातली एक स्वतंत्र जमात असते. त्या अगोदरच्या वेळात आणि नंतर ते बाप असतात, भाऊ असतात, पुतणे असतात, सासरे असतात. पण टेबल मध्ये आलं की यांची जात, रंग, रूप, नातं सगळं बदलतं. उरतं एकच नातं, टेबलापलीकडचा माणूस. चंदेरी परीच्या जादूच्या कांडीच्या बळशांनी गरीबड्या सिंडेलाला, झगमगत्या पोशाखातली अप्सरा बनवली. बाराच्या ठोक्याला मात्र पायातून सटकून गळून गेलेला एक सोनेरी बूट आणि पायात राहिलेला दुसरा सोनेरी बूट

अशी अवस्था झाली. टेबलापलीकडचा माणूस पाचनंतर असाच एका बुटानिशी घरी येतो ! संध्याकाळी मग तो पार्कात फिरायला मेटतो. एखाद्या व्याख्यानाला मेटतो. चित्रांच्या प्रदर्शनाला आलेला असतो. वर्षांतून एकदाच येणाऱ्या सर्कसला, घरच्या मुलाबाळांना घेऊन आलेला दिसतो. कधी एखाद्या देवळात, नंदीला हात लावून डोक्यावरली घंटा वाजवून, शंकराच्या गाभाऱ्यापुढे हात जोडून मनोभावे प्रार्थना पुटपुटत असलेला दिसतो. कधी चक्क शिंप्याच्या दुकानात मापं देत उभा असलेला दिसतो. लॉंड्रीतून कपडे आणताना, फुलांचा हार खरेदी करताना, लॉटरीचं तिकीट घेताना, बसमधून उतरतांना असा कुठे कुठे दिसत असतो. पण ते सिंड्रेलाचं बाराचे ठोके पडून गेल्यानंतरचं रूप !

म्हणूनच ते खरं असतं. टेबलापलीकडचा माणूस, पुढ्यात टेबल नसल्यामुळे कसा मोकळा मोकळा असतो. मोकळं बोलतो, मोकळं वागतो, मोकळं हसतो. मोकळेपणानं आपली विचारपूस करतो. मोकळेपणानं मेळ खातो. खाल्ल्यानंतर कागद रस्त्यावर फेकून देऊन मोकळा होतो. उद्यानात विहार केल्यासारखा अंगावर येणाऱ्या मोटारींची तमा न बाळगता मोकळेपणानं रस्ता ओलांडतो. मोकळी हवा खातो. मोकळा खिसा करतो आणि मोकळेपणानं इतर बायकांकडे बघतो. चंदेरी परीची जादूची कांडी याच्या बाबतीत उलटी फिरते. दहा ते पाचमध्ये याचं जगच आकसतं. दृष्टी आकुंचित होते. इच्छाशक्ती ओहोटते. चेहरा त्रासतो. कपाळ आठ्याळतं. शब्द कोरडे होतात. अलिकडच्या माणसाच्या सगळ्या प्रश्नांना हा टेबलापलिकडचा माणूस जास्तीत जास्त नकारार्थी उत्तरं देत राहतो. अलिकडच्या माणसाचं काम लांबणीवर टाकण्याकरिता अर्धा अर्धा तास कँटीनमध्ये वेळ काढतो. एक मधलं मेज ही सगळी किमया करतं आणि पलिकडला तो मेजर सर्व दुनियेकडे नेति नेति करीत आपला अहंकार कुरवाळीत राहतो.

एक खप्प पडावंसं मला नेहमी वाटतं एक मोठी कचेरी. त्यात छान बागेत विटांची नक्षी रचतात तशी टेबलांची शोभिवंत रचना. त्या टेबलांच्या पलिकडे माणसं. अलिकडेही माणसं. ही सगळी माणसं सारखी खुदूखुदू हसताहेत. घंट्या न वाजवता टेबलापलिकडला माणूस मजेत शीळ वाजवीत फाईल उचलून दुसऱ्या खोलीत जातोय्. अलीकडला माणूस आपली अडचण

हसत सांगतोय्. टेबलापलिकडला माणूस कपाळावर बिलकुल आठी न चढवता हसत हसत अडचणींचं निवारण करतोय्. नेमून दिलेली कामं सर्वजण हसत करताहेत. कॅन्टीन ओस पडलंय्. टेबलापलिकडचा माणूस हसत हुकूम सोडतोय् आणि कामकरी हसत त्याचं पालन करताहेत. त्यामुळे सगळी कचेरी कशी स्वच्छ, निर्मळ, हसरी वाटतेय् खिडक्या स्वच्छ, दारं स्वच्छ, बाथरूम स्वच्छ, भिंती स्वच्छ, आश्चर्यचकित होऊन अलीकडला माणूस पलिकडच्याला हसत विचारतो,

"अहो, पण इतकं सगळं जबाबदारीचं काम इतकं हसत हसत कसं काय पार पाडता बुवा तुम्ही?"

ह्यावर टेबलापलीकडला माणूस खुदकन हसून म्हणतो,

"काय सांगू राव तुम्हाला, अहो, हे टेबल फारच गुदगुल्या करतं बघा. सारखं हसतच ठेवतं."

हे ऐकून सगळी टेबलं आपल्या पलिकडल्या माणसांना भरपूर गुदगुल्या करतात. सगळी कचेरी खोखो हसायला लागते.

हसता हसता माझा पाय कशाला तरी लागून मला जाग येते. बघते तो माझ्याही पुढ्यात टेबल. समोर खुर्चीवर अलीकडला इसम माझ्याकडे टक लावून बघत. झोपेत का होईना टेबलापलिकडला हसरा माणूस बघायची ह्या बापड्याला सवय नसते. मी संपूर्ण जागी झाल्याची खात्री होताच हळूहळू तो प्रश्नांची माळ सुरू करतो. माझ्या नकळत माझं हसू मावळतं. चेहरा त्रासिक बनतो. कपाळावर आठी उभी राहते आणि टेबलापलिकडचा माणूस म्हणून मीही शोभून दिसू लागते.

♣ ♣ ♣

३९ ◇ तमसो मा ज्योतिर्गमय

द्रव्यदान, विद्यादान, वस्त्रदान, भूमिदान अशा दानांच्या विविध प्रकारांपैकी दीपदानाची कल्पना मला मोठी मनोरम वाटते. पाण्याच्या प्रवाहावर किंवा देवळासमोरच्या दीपमाळेवर अशा बदामाच्या आकाराच्या असंख्य ज्योती जेव्हा तरंगत वाहातात किंवा वेलीसारख्या आकाशातं चढतात, त्यावेळी पंच-महाभूतांपैकी आप, तेज, वायू एकत्र येऊन या पृथ्वीतलावरून आकाशाशी नातं जोडतात तसा काहीसा आधिभौतिक भास मला होतो. दीपज्योतींचा हा उत्सव हरद्वारी बघायला मिळतो. तिथं गंगा ही नुसती नदी न राहाता गंगा-मैय्या असते. हिमालयाच्या परिसरातली शीतल हवा. मोठ्या पातीने धाकट्या पातीला अगोदर पुढे पाठवावं तशी बर्फाळ शिखरं, पाठी राहून पांचूने मढलेले हिरवे डोंगर, प्रवाहाच्या चहूंबाजूंनी फेर धरून उभे गंगेच्या त्या जलराशीचा रंग अधिक शुभ्र, स्पर्श अधिक शीतळ की रूची अधिक मधुर अशा संभ्रमात आमच्यासारखे हलक प्रवासी आणि भाविक यात्रेकरू पडलेले. पूर्ण चंद्राची रात्र. सूर्य अस्तावलेला आणि चंद्र उगवलेला. हरकी पेडीच्या घाटावर उत्साही स्त्री-पुरुष मेळावा, भटजीपंड्यांचे श्लोक, मंत्र, आरत्या, झाडापानांच्या कोरीव सावल्यासाखे एकमेकात गुरफटलेले. आणि थोडीवरून पळसाच्या पानावर लालगुलाबी फुलांच्या पाकळ्यांत द्रोणातली इवलीशी ज्योत अलगद वाहत येते. बघता बघता दोनाच्या जागी दहा-दहाच्या जागी पन्नास, शंभर अशी तेजाची आरती. प्रवाहामध्ये त्याची शीशमहलासारखी अगणित प्रतिबिंबं. गंगेच्या प्रवाहाला ओघ जोरदार. तेजाला पाण्याचा आसरा पण वाऱ्याचा आग्रह. त्या आग्रहाला बळी पडून काही ज्योती तमोमय होऊन अंधारात विलीन होताहेत. काही-

यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ

सारख्या काही क्षण जोडीनं प्रवास करताहेत. साथ तुटतेय. भरकटताहेत. आणखी कुणा ज्योतीशी संग धरताहेत. कधी तीनचार एकत्र येऊन लखलखताहेत. असा अद्‌भुत नयनोत्सव.

गोव्यातल्या देवळात दीपमाळ कशी ॐकाराच्या अगोदर श्री काढावी तशी शुभ करीत उभी. फार वर्षांपूर्वी माघी पौर्णिमेच्या उत्सवाला मंगेशीची ती भव्य दीपमाळ लावलेली पाहिली. मंगेशीचा डोंगराळ परिसर, आरस्पानी जलाशय, चवऱ्या ढाळणारे माड, देवाची पालखी निघण्याअगोदर, माणसाने आकाशीच्या देवाला पाठवलेला निरोप घेऊन जाणाऱ्या दीपमाळेच्या ह्या असंख्य ज्योती. पार मंत्रचळ लावणारं दृश्य.

अंधार उजळून टाकणारा ज्योतींचा आणखी एक फेर नेपाळमध्ये पशुपतीनाथाच्या मंदिराभोवती धरतात. देवळाच्या सभोवती लोखंडी पट्ट्यावर हे पितळी दीप बसवूनच ठेवले आहेत. ज्याला जसं जमेल तसं त्यानं तेल घालीत जावं, ज्योती पेटवीत जावं. आम्ही दहाबारा जण होतो. प्रत्येकाने थोडं थोडं स्नेहबंधन केलं आणि मंदिर चौफेर तेजाळलं. एकूणएक ज्योती पेटवल्या. शरद पूर्णिमा होऊन गेली होती. आकाशाची खडी चमचमत होती. त्या लक्षदीपांकडून कृतज्ञतेने नजर वर वळवली की आभाळातल्या चंद्रज्योती स्निग्ध हसायच्या. दीप प्रज्ज्वलित करायला तेल नसलं म्हणून कुठे नडतं. मृच्छकटिकांतल्या चारुदत्ताला रजनीनाथ भेटलाच होता की नाही. अंधार ओशाळलाच होता की नाही.

मनुष्य आदिकाळापासून हेच करीत आलाय. अविद्येचा, अज्ञानाचा, अघाचा अंधार दूर करीत राहिलाय. पाठच्याने लावलेल्या ज्योतीत पुढला, पुढल्याने उजळलेल्या प्रकाशात त्याच्या पुढला, अशी ही माळ सरकतेच आहे. अंधारातून प्रकाशाकडे. तमसो मा ज्योतिर्गमय म्हणत.

♣ ♣ ♣

४० ◇ भले शाबास

" हा टांका कुठे चाललाय तुझा आभाळात ? आणि हा दुसरा पाताळात. त्या नलिनीचं शिवण बघ कसं दाणेदार आहे. आण ग नलिनी इकडे तुझं शिवण "... म्हणत म्हणत शिवणाच्या बाईंनी नलिनीला जवळ बोलावलं आणि तिचं शिवण हातात धरून न्याहाळलं. त्यांची खुषी त्यांच्या चेहेऱ्यावर स्वच्छ दिसली.

हात वर करून सगळ्या वर्गाला तो कापडाचा तुकडा दाखवीत शिवणाच्या बाई मोठ्याने म्हणाल्या, " बघा ग सगळ्याजणी. कसा मशीनसारखा टिपेचा टाका आहे तो–एकसारखा दुसरा. जरासुद्धा फरक नाही. नाहीतर तुमची शिवणं. झाडाच्या वाकड्यातिकड्या सावल्यासारखी. बकरीच्या ×× सुद्धा एकासारख्या एक असतात. (हो. आमच्या बाई उपमा देताना दणकून द्यायच्या !) " शाब्बास ग नलिनी. अशी माझ्याजवळ उभी राहा. तुम्ही ग साळकायांनो, एकेक जण या माझ्या टेबलाशी आणि बघा जरा हा टिपेचा टाका." आम्ही मग प्रत्येक जणीने जाऊन तो टाका पाहिला. आपल्याला तसा येत नसल्याबद्दल जरा खट्टूही झालो आणि प्रत्येकीला बाईंनी केलेली नलिनीची वाखाणणी ऐकून थोडा हेवाही वाटला. पण ते सगळं राहू दे. माझ्या लक्षात राहिली ती बाईंनी नलिनीला, सर्वांच्यादेखत दिलेली शाबासकी.

पूर्वी गोष्टीच्या पुस्तकात असं काहीतरी अद्‌भुत असायचं; कुठं राजकन्येची गेलेली दृष्टी मिळवायला एखाची सातासमुद्रापलिकडेच फक्त मिळत असलेली दुर्मिळ मुळी हवी असायची. मग एखादी जिद्दी राजपुत्र, वाटेतल्या असंख्य अडचणींचे डोंगर पार करून, राक्षस-चेटक्यांना तोंड देत, तळघरातून भु यारातून, गुहेतून प्रवास करीत शेवटी ती दैवी मुळी मिळवायचा. तसा-

सगळ्या अडचणींना तोंड देत परतीचा प्रवास करून राजापाशी यायचा आणि मुळी त्यांच्या स्वाधीन करायचा. राजकन्येला दृष्टी मिळायची आणि राजा भले शाबास म्हणून त्या बहादर राजपुत्राला आपली मुलगीच बक्षीस म्हणून देऊन टाकायचा. पुन्हा आपलं त्या गोष्टीतलं बाकी सगळं मी विसरून गेले. तेवढं ते भले शाबास लक्षात राहिलं.

मग मला बिरबलाची ती जुनी गोष्ट आठवली. बहुरुप्याचं बैलाचं सोंग. बिरबल एवढा करंगळीएवढा छोटासा मुलगा, चौदा-पंधरा वर्षांचा. बाकी बैलाचं सगळं सोंग बेमालूम बठलंय. पण चुणचुणीत बिरबलला आणखी एक परीक्षा घ्यावीशी वाटतेय. म्हणून तो एक बारीकसा कंकर उचलतो. रस्त्यातला आणि हळूच मारतो बैलाच्या पोटावर. काय गमत. बहुरूपी अगदी असली बैलासारखा पोटाची चामडी थरथरवतो. बिरबल खूष. 'भले शाबास' म्हणून डोईची टोपीच उडवितो बहुरूप्याकडे बक्षीस म्हणून. पुन्हा तेच. बाकीचं सगळं विसरलं आणि डोक्यात गाणं सुरू झालं फक्त 'भले शाबास'चं.

एखाद्या अनवट रागासारखे कधीतरी सठीसहामासी ऐकू येणारे शब्द. खरं म्हणजे ज्या दोन शब्दांनी, दमछाक झाली असताना साधा टांग्याचा घोडासुद्धा नव्या जोमाने पळायला लागतो. मोत्यासुद्धा लांबवर फेकलेला चेंडू पळत पळत घेऊन यायला लागतो. ढवळ्या-पवळ्यादेखील शर्यतीची गाडी वाऱ्याच्या वेगाने पळवत नेतात, ते प्रत्येक प्राणिमात्रातली बॅटरी चार्ज करणारे शब्द आपल्या कानांना ऐकू येणं मात्र दुर्मिळ झालंय.

साध्या साध्या गोष्टीतही मन घालून तिचा कायापालट करणारे काही मिडू असतात. कुणाचं अक्षर असं सुंदर की वेचावंसं वाटतं. कुण्या दुकानात कुणी विक्रेता, सरसर रंगीत दोरा बांधून, चटपटीतपणे कागद वाकवीत असं काही देखणं पुडकं बांधतो की घरी गेल्यावर देखील ते उघडूच नयेसं वाटतं. कुणाचा फोनवरचा आवाज आणि बोलायची पद्धत इतकी आर्जवी की पूर्वी ती चाफ्याची फुलं कशी डिम्पलूच्या बाटलीत भरून कायम टवटवीत ठेवायची तसे भरून ठेवावेसे वाटतात. कुणी कंडक्टर बसच्या प्रत्येक तिकिटावर इतकं गोल पंचिंग करतो की खाली उडालेल्या त्या गोल चकत्यांची एक माळ करून गळ्यात घालावीशी वाटते. कुणी चणेवाला काय सर्रकन तो कागदी कोन बनवतो आणि थोडा वेळ सतत पाहत बसलं तर एकापाठोपाठ एका गिऱ्हाईकाला

देताना प्रत्येक कोन साच्यामधून काढल्यासारखा शोभिवंत. या प्रत्येकाला आपण 'भले शाबास'चा बोनस दिला पाहिजे पण कुठे बेडूक अडकतो घशात कुणास ठाऊक. परवा तर ट्रॅफिक लाइटस्‌पाशी एक टॅक्सीवाला पाहिला. आदबशीरपणे, पादचाऱ्यांचं ते आखून ठेवलेलं क्रॉसिंग असतं ना, ते मोकळं ठेवून त्याच्या बाहेर टॅक्सी थांबवून दिवा बदलण्याची वाट बघत थांबलेला. मी तर फिदाच झाले. त्याच्याजवळ जाऊन त्याला 'भले शाबास' म्हटलं. असलं काही ऐकायची संवय नसल्याने तो इतका बावचळला की त्याने पटकन गाडी पुढे सरकवली आणि क्रॉसिंगमध्ये उभी केली !

प्रत्येकाच्या वाट्याला रोजचं काम असतंच. ते तर प्रत्येकजण करीत असतोच. तसंच दुसऱ्याच्या वाट्याला आलेलं दुसऱ्याचं काम जर तो कुणी दुसरा झकास करीत असेल तर आपण मारावी ना त्याच्या पाठीवर एखादी थाप आणि म्हणावं ना भले शाबास. अधिक चांगलं काम करायला लागेल तो. आपलं काय होतं, सतत आपल्यातच मश्गुल असतो आपण. आपल्याच चिंता, आपल्याच अडचणी, आपल्याच निराशा, उगाचच तोंडात एक कडवट चव घोळवीत. झापडं लावून संसाराचा गाडा ओढीत. आपली लायकी कुणी ओळखतच नाही असा जगाचा दुस्वास करीत. ती झापडं जरा काढली ना की अथांग दिसायलं लागतं त्या डोळ्यांना.

साधं लोकलमधून येताना विहिरीवर सोन्यासारख्या लखलखणाऱ्या पितळेच्या घागरी दिसतात. जागच्या जागी चटणी, कोशिंबिर, भाजी, आमटी, पोळी असं सुरेख वाढून आणलेलं शाबासकीयोग्य जेवणाचं ताट दिसतं. साधे कपडे असूनही रंगसंगती साधून, टापटिपीनं कपडे केलेला शाबासकी देण्यायोग्य एखादा भिडू दिसतो. शाबासकीच्या चष्म्यातून पाहिलं की सगळं कसं वाहवा देण्यासारखं दिसायला लागतं. आयुष्यभर जर देवाचं नाव कधी घेतलंच नसेल तर ते प्राण जाताना ओठात येणार नाही. तसंच आहे या शाबासकीचं. कधी संवयच नाही केली दुसऱ्याला वाखाणायची तर आपल्याला तरी कशाला कोण वाहवा म्हणेल. आणि मग आपल्या तरी हातून अधिकाधिक चांगली कामं कशी होतील.

प्रसिद्धीच्या झोतात असलेल्या माणसांना वाहवा म्हणणारे खूप असतात. ण रोजचं आखीव आयुष्य जगतानाही आपापल्यापरीने काहीतरी सुंदर कृती

करून, त्याचा आनंद नकळत इतरांना देऊन, रोजचा साधा दिवस सोनियाचा करणाऱ्या या साध्यासुध्या माणसांनाच शाबासकीची खरी गरज असते. पत्त्याच्या डावात राजाराणीखेरीज इतर पानंच अधिक असतात. आणि काही वेळेला एखादा निरुपद्रवी दुर्ऱ्या नाहीतर चव्व्यासुद्धा पटकन् खेळी करतो. त्यावेळी आपण म्हणतोच की नाही भले शाब्बास तसंच.

♣ ♣ ♣

४१ ◇ सहज

ऑफिसमध्ये पुष्कळ माणसं येतात भेटायला. म्हणतात, काही नाही, अगदी सहज आलो. आलोच होतो या बाजूला, म्हटलं डोकावावं!

हे डोकावतात पण मला माझं काम बाजूला सारून सहज आलेल्या यांच्याशी आता बोलावं लागतं. मी हातातलं पेन खाली ठेवते. विचारते, काही काम होतं का? हो. ऑफिसमध्ये माणूस सहज कशाला येईल हो. एवढ्या दुपारचा. भर उन्हात. आड बाजूला असलेल्या आमच्या ऑफिसमध्ये. तरी परत यांचं तेच पटवलं चालू–छे हो. अगदी सहज आलो. म्हटलं बरेच दिवसात गाठ पडली नाही. आता पडली खरी ठकाठका. मला तर या भल्या गृहस्थाचं नावही आठवत नाही की, चेहराही पाहिल्यासारखा वाटत नाही. शिष्टाचाराला बगल देऊन मी सरळच विचारते–माफ करा हं. पण नाव नाही आठवत मला आपलं–यावर तो सहज म्हणतो––अहो कसं आठवेल? तीन वर्षं झाली तुमच्या एका कार्यक्रमात मी भाग घेतला होता. त्याला त्यानंतर तुम्ही विसरूनच गेलात आम्हाला. म्हणून सहज आठवण करायला आलो होतो.

अस्सं. म्हणजे सहज नव्हे तर. मग मला आठवतो तो. कार्यक्रमही आठवतो. त्याच्यात त्याने अवडंबरी शब्द वापरून कार्यक्रमाचा केलेला बट्ट्याबोळही आठवतो. आता हा जितकं सहज खोटं बोलतोय तितकं सहज जर खरं बोलला असता त्या कार्यक्रमात, तर कितीतरी छाप पडली असती त्याची. पण हेच तर चुकतं आपल्यासारख्या साध्यासुध्या माणसाचं. आपण कुणीतरी फार मोठे तज्ज्ञ आहोत, विद्वान आहोत, बृहस्पती आहोत अशा आविर्भावात बोलायला जातो आपण आणि मग सिंहाचं कातडं पांघरलेल्या....पण जाऊ द्या.

तर अशा सहज कुठल्याच गोष्टी घडत नसतात आणि घडतात त्या फक्त सिनेमानाटकात. चित्रपटभर शेकडो गोष्टी सहज घडतात. योगायोग सहज येतात आणि पिक्चर अगदी सहज संपतं.

प्रत्यक्षात मात्र आपल्या आयुष्यात ज्या गोष्टी सहज घडतात, त्या नेहमी काहीतरी बला आणतात. गच्च भरलेल्या बसमध्ये वरच्या कातडी हँडलला लोंबकळून कसाबसा तोल सावरीत असतानाच आपल्या पायावर चार इंच उंच प्लॅटफॉर्म बुटाचा अगदी सहज पाय पडतो. अर्थातच सहज कळ उठते आणि पायापासून ते थेट मस्तकापर्यंत जाऊन अगदी सहज पोहोचते. आपण रागारागाने त्या लावण्यवतीकडे पाहाण्याच्या आधीच आपल्या पुढल्या चार माणसांनाही तसाच लत्ताप्रहार देऊन ती तरुणी अगदी सहज बसमधून बाहेर पडलेली असते. संस्कृत नाटकांमधून एक वर्णन येत असतं की, अशोकाला पालवी फुटण्याआधी एखाद्या सुंदरीला त्या वृक्षाला विधीपूर्वक लत्ताप्रहार करायला लावतात. मग तो अशोकवृक्ष पल्लवित होतो. अशोकाचा हा षोक त्या संस्कृत नाटकातूनच शोभो. आम्हा सगळ्यांच्या चपलांच्या पायावर, चार इंची उंच टाचांचा आघात करून आम्हाला मात्र त्या सुंदरीनं शोकात लोटलेलं असतं. त्यामुळे आयुष्यात घडणाऱ्या या सहज गोष्टीची मी भयंकर धास्ती घेतली आहे. आम्ही रस्त्याने निमूट चालत असावं तर सहज वरून कोणीतरी नेमकं आमच्याच अंगावर उसाच्या गडेऱ्याचा चोथा फेकतं. तिथे लाथा तर इथे चोथा.

खूप दिवसात काही खबर नाही म्हणून सहज मैत्रिणीला फोन करावा तर—

"आहेत हंऽऽ. बोलावतो हंऽऽ. थांबा थोडा वेळ.ऽऽ"

—असं सांगून कुणीतरी आमची सहज फिरकी घेतं. आपण आपल्या फोन धरून उभ्या. जरा वेळानं 'हॅलो हॅलो', म्हणून विचारणा केली की, फिदीफिदी हसत समोरचा माणूस अगदी सहज सांगतो—

"अहो आणखी थोड्या थांबा कीऽ. काय घाई आहे एवढीऽ?"

सहज सिनेमाला जावंसारख वाटावं. आणि तिकीट मिळावं हे तर आता इतिहासजमाच झालंय. आज पगार झालाय. तर बरेच दिवसापासून आपल्या मनात ते पुस्तक घ्यायचं आहे. नेमक्या त्या पुस्तकाच्या दुकानावरून चाललोच आहोत तर करावी सहज चौकशी म्हणून आत शिरून विचारावं तर,

दुकानात चढता चढता आपल्याला सहज धक्का मारून गेलेल्या त्या प्रौढशा गृहस्थाने नुकतीच शेवटची प्रत नेलेली असते. छे! हे सहज म्हणजे भलतंच कठीण आहे. सहज बोलणं, सहज हसणं, सहज वागणं, सहज चालणं या सगळ्यासाठी आपलं आतलं मन फार जागं असावं लागतं. आपण सहज म्हणून म्हणावं— बाकी पोहोण्यासारखा दुसरा सर्वांगसुंदर व्यायाम नाही. त्यातल्या त्यात सूर मारताना तर काय थ्रिल वाट—आणि महिन्यापूर्वी असाच सूर मारताना अपघाती निधन झालेल्या आपल्या कोवळ्या मुलाची आठवण येऊन आपल्या मैत्रिणीचे डोळे टचकन भरून यावेत. असलं सहज बोलणं काय कामाचं. सहजपणातही सावधपणा असावा. आपल्या सहज बोलण्याने ऐकणाऱ्याचा गौरव व्हावा. आपल्या सहज वागण्याने आजुबाजूच्या कुणाला कसलाही न्यूनगंड वाटू नये. आपल्या सहज हसण्याने समोरच्या माणसाची उदासी त्याच्या नकळत नाहीशी व्हावी.

म्हणून आता— सज्जनहो, आपण आपल्या कार्यबाहुल्यातून आपला बहुमोल समय काढून माझे हे शब्दयुक्त आणि प्रेरणात्मक असे वैचारिक मंथन वाचून मला जे उपकृत केलेत त्याबद्दल मी आपल्यासारख्या थोर प्रतिभावंतांची आजन्म ऋणी आहे— वगैरे न म्हणता सहज सांगते. अगदी मनातलं बोललेबाई तुमच्याशी. जुळली ना मतं आपली? कशी सहज जुळवाजुळव झाली बघ.

♣ ♣ ♣

४२ ◇ लज्जवंती

"लाज नाही वाटत धक्के मारायला. क्यूमध्ये उभी असल्यापासून बघतेय तुमचे थेर. उभ्याने धक्के मारून झाले. बसमध्ये चढताना पुन्हा धक्के मारलेत आणि आता जेमतेम उभं राहायला मिळालंय तर तिथंही धक्के मारता? शरम नाही वाटत?"

वीस वर्षं चाळीशीशी भांडत होती. लहानखुरीच दिसत होती मुलगी. बाप्या असेल पंचेचाळिशीचा. एवढ्या आरड्यानंतर त्याचा चेहरा पार टी. व्ही. स्क्रीनसारखा राखट काळपट झाला होता. वंशपरंपरेने लाजेचा वारसा चालत आलेली एक युवती घीट बनली होती. जाब विचारीत होती. चारचौघांसमक्ष गुन्हेगाराने रांगेत, बसमध्ये चढताना, जेमतेम उभं राहिलेलं असतानाही मारलेल्या धक्क्यांचा पंचनामा करीत दरडावीत होती आणि तो बाप्या.... वाटली शेळी पण निघाली बाघीण. या अनपेक्षित धक्क्याने बावचळून गेला होता. निम्माशिम्मा राहिला होता. पारंपरिक पुरुषी चाळे करीत असताना मिळालेल्या अनपेक्षित कलाटणीमुळे, उभ्या जागी वितळण्याच्या सिद्धीचा जप करीत होता.

पण गंमत अशी की, त्याच वेळी बसमधल्या इतर सगळ्या बायकांना मात्र भयंकर लाज वगैरे वाटत होती की काय बाई हा निर्लज्जपणा. बायकांच्या जातीला शोभतो का असला उद्दामपणा? चारचौघांसमोर असं नसता तमाशा. आम्ही नाही का निघालोय् ऑफिसला. आम्हाला नाही ते कुणी मारीत धक्के. या जरा अतिमॉडर्न मुलींची नाहीतरी जरा जास्तीच हो थेरं. लाजा सोडल्यायत अगदी.

हीही कुजबुज मी ऐकत होते. म्हटलं कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ. म्हणजे बायकांनी काय कायम मानापमानातल्या शाब्द नेसणाऱ्या, आणि तो नेसत असतानाच अधिक चांगला दिसतो म्हणणाऱ्या धैर्यधराच्या बोलण्यावर लाजलेल्या भामिनीसारखं लाजतच राहायचं की काय? छे. लाजणं कसं वेळच्यावेळी, टापटिपीनंच यायला हवं. रविवर्म्याच्या चित्रातलं नऊवारी नेसणं कसं जिथल्या तिथं, डौल सांभाळून, वळणं वेटाळून, निऱ्या घोळून, चुण्या शोभवून, खुललेलं असतं तसं असावं लाजेनं. बेताबेतानं, गमतीगमतीनं, वेळच्या वेळीच खुलावं. फुलानं जसं वेलीवर शोभावं तसं लाजेनं गालावर पसरावं. योग्य वेळी. योग्य ठिकाणी.

बाकी कामात चूक झाली आणि त्याबद्दल वरिष्ठांनी दोष दिला म्हणजे वाटते ती लाज निराळी. घरी पाहुणे आले असताना, आपला पाच वर्षांचं बाळ्या आचरटासारखे काहीतरी तारे तोडतो तेव्हा वाटते ती लाज वेगळी. हौसेनं म्हणून करायला जावं आणि केकची पोळी व्हावी तेव्हा वाटते ती एक तिसरीच लाज. गुरूने शंभर वेळा दाखविलेली तान जेव्हा आपल्या गळ्यातून निराळीच निघते तेव्हा वाटते...तो एक लाजेचाच निराळा प्रकार. उत्तम लघु-कथेबद्दल मिळालेलं बक्षीस स्वीकारायला व्यासपीठावर जाताना वाटत असते ती आनंदमिश्रित लाज, पण लाजेचाच प्रकार. मैत्रिणींना काहीतरी थातूरमातूर सांगून प्रियकराला संकेतस्थळी भेटायला जाताना आणि तो दुरून दिसल्यावर गालावर जमून आलेली गुलाबी लाज हा तर या शरमशायरीचा आखिरी शेर. खरं म्हणजे एवढा एकच प्रकार खरा शोभिवंत. खुबसूरत. असली. बाकी सगळे आपले पेंढा भरलेल्या वाघासारखे नकली.

पण परवा अशीच सगळी विशी-पंचविशी जमली होती. आमची कसलीशी तालीम चालली होती, एका संस्कृत नाट्यप्रवेशाची. आता संस्कृत नाटक म्हणजे आपली सांस्कृतिक परंपरा वगैरे आलीच. त्याच 'लज्जया अवनतमुखा' वगैरे नायिकेचं वर्णन. आणि नायिकेची तशी 'लाज वाटे आज बाई'ची अवस्था बघून तिची प्रियसखीही लाजलेली. नायिकेला जमला तो लाजण्याचा प्रकार. पण या प्रियसखीला काही जमेना.

मी म्हणतेय्, "अग लाज ना थोडीशी."

ती म्हणतेय्, "म्हणजे काय करू?"

"म्हणजे थोडंसं लायायचं!"

"म्हणजे काय करायचं? तुम्ही दाखवा ना लाजून. मला खरंच ठाऊक नाही कसं लाजतात ते!"

या भारताची सत्तारी आता खरोखरच प्रगतीपथावर आली असं मानून, त्या लजवंती मी अभिनंदन केलं आणि तिला लाजता येत नाही याची मला वाटलेली लाज, या लाजेच्या नवीन प्रकारची नोंद केली.

♣ ♣ ♣

४३ ◇ देशाटन

प्रवास हा चित्तथरारकच असतो. मग तो सोबतीनं केलेला असो किंवा एकट्याने असो. ते आपलं सुरक्षित घरकुल, आपली जपणूक करणारी माणसं, स्नेहीसोबती, आपला ठराविक दिनक्रम, आपलं कार्यक्षेत्र, आपलं गाव सगळं सोडून माणूस जेव्हा प्रवासाला निघतो तेव्हा त्याने सूर्याजीच्या थाटात तो घरचा दोर केव्हाच कापून टाकलेला असतो. मग तो एकटा असतो. बरोबर फक्त उदंड आत्मविश्वास.

मला तर वाटतं प्रवास एकट्यानेच करावा. सोबत वाटेत जोडत जावं. मद्रासला जाताना, आपलं मराठी आणि त्याची तामीळ यातून काढलेलं तोडीचं इंग्रजी मेटतं. गोहत्तीला जाताना गोलगोल रसगुल्यासारखं मिठाईत घोळलेलं इंग्रजी मेटतं. बनारसला जाताना गंगामैय्याच्या पवित्रताकी गोष्ट कहावत जाणारी पाक हिंदी मेटते. जम्मूच्या पुढे ओं की ठो ओळखता न येणारी काश्मिरी मेटते. राजस्थानमध्ये अठीनेसे बठीनेसे गोड मारवाडी मेटते सावंतवाडी–गोव्याला मधुमधुरा कोंकणीगिरा मेटते. भाषेबरोबरच डब्यातील इडली, सरसूच्या तेलातील आलूकी साग, मटक्यातली रबडी, मसालानी चाय, कोलंबीचं हुम्मण, पुरीपकोडे काय काय पोटात जातं.

परदेशात तर याहीपेक्षा अनवस्था प्रसंग. निदान आपला देश तर आपला असतो. भाषा, वेश, डब्यातले पदार्थ जरी निराळे असले तरी माणूस आपला असतो. कातडीचा रंग एकच असतो. के काळे असतात आणि कसल्याही पद्धतीने गुंडाळलेली असेना, नेसूची साडीच असते.

पण इटलीत भाषेची अडचण. फ्रान्समध्ये इंग्रजी ओळखीला मोताद. वर डेन्मार्क–स्वीडनमध्ये तर दात हे खाण्यापेक्षा तोंडभर हसताना दिसण्यासाठी

असतात हेच पटतं. सबंध यूरोप बोटांनी, डोळ्यांनी अभिनय करून मनातला हेतू सांगायला लावून तुम्हाला पुन्हा एकदा बाळपण आठवायला लावतं. त्यात त्या गाड्या चुकतात. भलत्याच स्टेशनवर आपण उतरतो. कारण स्टेशनची पाटी वाचूनही समजत नाही. Mount Blanc असं लिहिलेल्या पाटीचा उच्चार 'मो ब्लॉ' आहे हे कसं समजणार? त्यातच रात्र होते. नाहीतरी यूरोपमध्ये ऑक्टोबर–नोव्हेंबरात पाच वाजल्यापासूनच अंधार होतो. मग दिसेल त्या भल्या माणसाच्या बकोटीला धरून आपल्या हॉटेलचा पत्ता लिहिलेली चिठ्ठी दाखवीत दिशा विचारायची.

एखादा टॅक्सीवाला त्या अवस्थेतही इंगा दाखवतो आणि अगदी आपल्या देशातल्या त्याच्या ड्रायव्हर बांधवासारखा, नाकासमोरच्या मुक्कामासाठी शहरभर हिंडवून आणल्याची बतावणी करून भरपूर फ्रँक्स उपटतो.

जेवण तऱ्हेवाईक, आंधोळीची गैरसोय म्हणजे इतकी की शंभोऽऽ म्हणून बालदी डोक्यावर उपडी करण्याची आपली संवय मुंबईला परत येईस्तोवर थोपवून धरावी लागते. थंडी भरपूर. त्यामुळे गरम कपड्यांचं खोगीर जे सकाळी एकदा अंगावर चढवायचं ते रात्री बिछान्यात शिरताना उतरावायचं असा सगळा वनवास. तरीही मला प्रवास करायला आवडतो.

अशाच एखाद्या रस्ता चुकल्याप्रसंगी एखादा सत्तरीचा स्विस् माणूस भेटतो. झुरिक्मधून आपण La strasse मधून भटकत भटकत स्टेशन कुठे विचारीत चाललो असतो. आणि हा दयाळू स्विस् माणूस आपल्याशी इंग्रजीत बोलून पहिला दिलासा देतो. आपल्याला रस्ता नुसता बोटाने न दाखवता, आपल्याबरोबर चालत स्टेशनपर्यंत येतो. येता येता तो भारतात एका खिस् घड्याळ कंपनीत मॅनेजर म्हणून कसा सात-आठ वर्षं काम करीत होता ते सांगतो, आपल्याला मुंबईच्या ग्रीन्स हॉटेलविषयी विचारतो. खंडाळ्याच्या घाटातल्या जांभळं करवंदांविषयी विचारतो. कोल्हापूरच्या तालीमबाज कुस्तीगीरांविषयी विचारतो. जबलपूरचे स्फटिकाचे दगड, चितोडचा मिनार, काश्मीरचा चिनार सगळं सगळं त्याला आठवत असतं. क्षणभर आपण भारतातल्याच एखाद्या रस्त्यातून चालल्याचा आपल्याला भास होतो. खिस् माणूस, थेट स्टेशनात येऊन, गाड्यांच्या त्या जंजाळातून, आपल्याला हवी असणारी नेमकी गाडी हुडकून तीत आपल्याला बसवून देतो. आपण आता

तुम्ही गेलात तरी चालेल असं सांगितल्यानंतरसुद्धा, तो गाडी सुटेपर्यंत आपल्याशी गोष्टी करीत उभा राहातो. आणि शेवटी गाडी सुटल्यानंतर आपला काका-मामा जसा रुमाल हलवून आपल्याला निरोप देईल तसा गाडी दिसेनाशी होईतोपर्यंत रुमाल हलवीत राहातो. डोळ्यांत जमलेली आसवं पुसायला, डब्यातल्या इतर परदेशी प्रवाशांच्या देखतही आपल्याला लाज वाटत नाही.

अशा माणसांना बघायला, भेटायला, त्यांची सुखदुःखं आपल्याशी ताडून पाहायला, मला प्रवास करायला आवडतं. परत आल्यानंतर, आणलेल्या शोभेच्या वस्तू इतरांना देऊन टाकायला आणि या अशा आठवणी मनाच्या सेफ् डिपॉझिट व्हॉल्टमधे जपून ठेवायला मला फार आवडतं.

प्रवासाला जाताना आपण रिकामे असतो. येताना खूप भरभरून, समृद्ध होऊन येतो. ही श्रीमंती अशी शाश्वत असते की चोरही ती लुटून नेऊ शकत नाही.

अशाच एका प्रवासाला लवकरच निघालेय् मी. आज येत्या काही महिन्यांकरिता 'सदाफुल्ली'च्या वाचकांचा निरोप घेते आहे. प्रवासाला जाताना नेहमीच खूप उत्साह वाटतो. तसाच तो आज मला वाटतो आहे. पण पूर्वीच्या अनुभवावरून हेही ठाऊक आहे की काही दिवस सरले की आपल्या वरणाचा वास, मोगरीचा सुवास, कोऱ्या साडीची घडी, तंबोऱ्याचा झंकार, मायबोलीची हाक, देवळातली घंटा सगळे रंगरसस्पर्शगंध एकत्र येऊन परतीची साद घालतात. आणि देशाटनाला गेलेली मी ती साद येताच, असेन तिथून, असेन तशीपरतीच्या प्रवासाला निघते. मनात घोकत राहाते.

केल्याने देशाटन, पंडितमैत्री, समेत संचार
शास्त्रग्रंथविलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार....

♣ ♣ ♣

४४ ◇ हिरवा गालिचा

प्रवासामध्ये नेहमी काहीतरी अनपेक्षित घडतं. अद्‌भुत असं काहीतरी बघायला मिळतं. नित्य नव्या ओळखी होतात. एकमेकांचे पत्ते टिपून घेतले जातात. पुढे कधी पत्रव्यवहार होत नाही हा भाग निराळा. पण प्रवास म्हणजेच साहस. नवलाई भ्रमंती. पूर्वी सिंदबादच्या सफरी वाचताना काय भारल्यासारखं व्हायचं. काय त्या रत्नांच्या दऱ्या, फळाफुलांनी बहरलेल्या बागा, सूर्याचे किरणसुद्धा जमिनीवर पोहोचू न देणाऱ्या दाट वृक्षांची अरण्यं, त्या पाण्यातल्या सुसरी, त्या फुटलेल्या बोटी, तो गोठलेला किनारा, तो मोहाची दारू पाजून पाठुंगळीवर स्वार झालेला जराजर्जर पण चिव्वट लांब दाढीवाला म्हातारा, ती इजिप्त की कोणच्याशा देशातली बायकोच्या प्रेताबरोबर तिच्या नवऱ्यालाही गुहेत कोंडून, बरोबर दिलेले सात रोट संपताच, जिवंत मरण पत्करण्याची दिलेली सजा. एक ना दोन. अगदी सोडवत नसे पुस्तक. खाण्यापिण्याची, बोलण्या-झोपण्याची शुद्धच हरपायची सुदैवाने प्रवासाची पुस्तकंही खूप वाचायला मिळाली आणि प्रवासही चौफेर करायला मिळाला.

फार फार वर्षांपूर्वी पूर्वेला चीन बघायला मिळाला होता. दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत. आपल्याकडे दक्षिण हिंदुस्थानात जशी उंच उंच गोपुरांच्या मंदिरांची रेलचेल तशी चीनमध्ये जागोजाग पागोड्यांची पखरण. आजूबाजूच्या टेकड्या, हिरवीचार झाडं आणि मधूनच डोकावणारी लाल, पिवळ्या, निळ्या रंगाने रंगवलेली पागोड्यांची पायऱ्या पायऱ्यांच्या उतरंडीची सप्तरंगी छपरं. पण तरीसुद्धा चीनमध्ये मोहात पाडलं 'हांगचो' नावाच्या एका टुमदार गावानं. उदेपूर जसं सरोवरांचं गाव, तसंच हांगचो छोट्या छोट्या पुष्करिणींचं. त्या प्रत्येक पुष्करिणीवर एक नक्षीदार बगीचा. या बगिचात जाण्याकरता प्रत्येक

पुष्करिणीला एक इतक्या शोभिवंत आकाराचं दार की ह्या दारावरूनच आतल्या अधिक आकर्षक वास्तुशिल्पाची कल्पना यायची. कधी ते दार अर्ध-गोलाकार, तर कधी षट्कोनी, कधी दार म्हणून चांदणीचा आकार, तर कधी वाटोळ्या चंद्रबिंबाचा आकार आणि ह्या दारातून एकदा का आत गेलं की, ओ हो! किती ते देखणे छोटुले छोटुले पूल! एका तळ्याचेच पंचवीस भाग केलेले. त्या पंचवीस बेटांवर पंचवीस तऱ्हेची फुलं फुलवलेली. पंचवीस रीतींनी बहारदार बगीचे उभारलेले. आणि या पंचवीस बगीचांना पाण्याकरता पंचवीस छोटेखानी पूल बांधलेले. दहा फुटांचं अंतर तोडणारा पूल, झिगझॅग असा दहा ठिकाणी मुरडणारा. दुसरं आठ फुटांचं अंतर जोडणारा पूल, आधी पूर्वेकडं तोंड करून अचानक पश्चिमेकडं मोर्चा वळवणारा. कुठे जमिनीच्या जराशा उंचशा चौथऱ्यावरून निघून पाण्याशी आता गोष्टी करतो की काय इतका खाली टेकून पुन्हा डोकं वर उचलून पलीकडच्या जमिनीच्या चौथऱ्याशी हात मिळवणारा. एखादा चांगल्या लांब उडी मारणाऱ्या बहादराला उडी-पार करता येण्यासारख्या जागेवर देखील एखादा छोटुकलासा, जाळीदार कठड्यांचा उमदा पूल. असे विपुल पूल. त्या कालिदासाच्या शांकुतलाविषयी म्हटलंय् ना की साहित्यप्रकारात सर्वांत आकर्षक नाटक शाकुंतल. नाटकांच्या दुनियेत सर्वांत प्रभावी नाटक शाकुंतल. त्या शाकुंतलात मन ओढून घेणारा अंक चौथा आणि त्या चौथ्या अंकात संगमरवरात अक्षरं कोरावीत तसे मनात ठसून राहाणारे शकुंतलेच्या पाठवणीचे ते चार श्लोक.

तर प्रवासात नेहमीच असं काहीतरी एक अगदी कायमचं मनात कोरून बसतं. अमेरिकेच्या या खेपेच्या प्रवासात अशीच एक गोष्ट कायमची आठवणीत राहिली. अमेरिकेला गेला की प्रवासी कॅनडालाही जातोच. मीही तशीच गेले. कॅनडातली टोरांटो, मॉंट्रीयल, ऑटावा ही मोठमोठी शहरं अमेरिकेतल्या मोठ्या शहरांसारखीच, सगळी एका चेहऱ्यामोहऱ्याची. पण टोरांटोपासून दोनशे मैलावर किंग्स्टन नावाचं एक गाव आहे. तिथून चाळीस एक मैलांवर हा चमत्कार आहे.

चमत्कार नाही तर काय. नीळमण्यांचा चुरा पसरून ह्यावर पाचूची रांगोळी काढावी तशी नदीच्या निळ्याशार पाण्यावर एक हजार बेटुली पहुडली आहेत. एक हजार हं. शंभर दोनशे नाहीत. खरं म्हणजे तिथले रहिवाशी सांगतात की,

हजारापेक्षा काकणभर अधिकच भरतात ही बेटं. म्हणजे कॅनडाचा भूभाग रचून झाल्यावर, मातीनं भरलेले आपले हात जेव्हा त्या कोण्या विधात्याने झटकले असतील ना, त्यावेळी पडलेली जी माती, तेच हे हजार बेटांचं मृत्कमळ असावं. काय मनोहर दिसतो तो नजारा. सूर्याची किरणं जशी पाण्याच्या लाटांवरून फिरताना वाटतं ना. तशी आपली नजर या बेटुल्यांवरून फिरताना वाटतं. काळे उंदीर, गोरे उंदीर, भुरे उंदीर, जाडे उंदीर अशा त्या पुंगीवाल्याच्या उंदरांसारखी ही काही लहान, काही मोठी, काही गोल, तर काही लांबट अशी बेटं. सगळी हिरव्यागार झाडांनी शोभवलेली. एकंदरच पाश्चिमात्त्य लोकांना निसर्गाशी जवळचं नातं जोडण्याची नैसर्गिक आवड. त्यांत असा हा हजार बेटांसारखा दुर्मिळ खजिना हातात सापडल्यावर मग घरं बांधायला काय तोटा. आपण आपलं बोटींतून नागमोडी हिंडायचं. या बेटावरचं हे बाबूनी बांधलेलं घर छान दिसतंय की त्या दुसऱ्या बेटावरचं अंकल टॉम्च्या केबिन्सारखं बांधलेलं अधिक लोभसवाणं दिसतंय् हे इकडे आणखी एक आहे पाहा. चार खांबावर आफ्रिकेच्या पिग्मी लोकांच्या झाडावरच्या घरासारखं बांधलेलं. अरेच्या हे कसं गुहेसारखं दिसतंय बाहेरनं पण आतून डोकावणारा तो कळीदार झुंबर सांगतोय की हे आदिमानवाचं नसून कुणा धनिक वणिक बाळाचं आहे. काय ती घरांची वास्तुशिल्पं. कधी बेटांतून झाड उगवलेलं आणि झाडांतून घर फुटलेलं. कधी झाडातून नुसताच एखादा कठडा दिसत असलेला. लांबच लांब. त्या कठड्याच्या दुसऱ्या टोकाला घराचा आलिशान दिवाणखाना फुटलेला. काही काही बेटं तर इतकी छोटुली की, एका बेटावर राहातं घर तर दुसऱ्या बेटावर, मधे पूल टाकून खयंपाकघर. दोन दोन तास फिरलं तरी ही बेटी बेटं संपतच नाहीत. मग मेनलँडवर एक भला उंच मनोरा आहे. त्याच्या टोकावर जाऊन शोभा बघायची. ओहोहो, पिवळ्या काविळीसारखी डोळ्यांना हिरवी पानावळी होते.

या हिरव्या राऊळी जाऊ राहू सुवेळी
वरच्या ग पाणथळी उमलले मनमोकळी

मनोऱ्यावरून पाचूच्या त्या चुऱ्याकडे पाहताना मन-बेटं एकटेपणा विसरतं. अशीच खूप विखुरलेली मन-बेटं असतात. आपल्या अवतीभोवती. जरा त्यांच्या मधून तरी फिरावं, नाहीतर वरून तरी शोध घ्यावा. आपण एकटे नसतो

काही. खूप मनं असतात आपल्याचसारखी. मैत्री शोधणारी, प्रेम पसरवणारी, आसरा देणारी, विसावा दाखवणारी. मनाचा एकटेपणा कधी टोचायला लागला ना की, मला नेहमी त्या किंगस्टनच्या हजार बेटांची आठवण होते. एकमेकांच्या संगतीत कशी शोभून दिसतात बेटी. तऱ्हेतऱ्हेचे कॅलिडोस्कोपिक आकार दिसतात त्या मनोऱ्यावर उभं राहिलं म्हणजे एकच बेट. या पुंजक्याबरोबर बघितलं की एक नक्षी दिसते आणि त्या पुंजक्याबरोबर बघितलं की दुसरीच निराळी नक्षी तयार होते. गंधार जसा भूपाबरोबर निराळा आणि यमनाबरोबर निराळा.

हजार बेटांच्या या तरल्या हिरव्या गालिच्यावर बसून मी कैक वेळा किंगस्टनला जाऊन येते. कधी माझ्या मनाची अशी दुभंगून खूपशी बेटं झाली म्हणजे मी त्या हजार बेटांची आठवण करते. त्यांच्यावरती माणसाने बांधलेली सुंदर सुंदर घरं आठवते. नदीच्या वाहत्या प्रवाहातही चलबिचल होऊ न देता अढळ राहिलेली ही सानुली बेटं आठवते. त्यांची एकजूट आठवते आणि माझं दुभंगलेलं मन पुन्हा सांधतं. सुखाचा गालिचा हजर होतो आणि बेटं मन अलगद त्यावर स्वार होऊन, खूप वर जाऊन दुःखाकडे अलिप्ततेनं पाहातं.

♣ ♣ ♣

४५ ◇ 'अहं ब्रह्माऽस्मि'

काही गावांचं महत्त्व तिथे असलेल्या एखाद्या वास्तूमुळे वाढतं. ताजमहाल नसता तर कोण कशाला आग्र्याला गेलं असतं? कोणार्कचा सूर्यरथ नसता तर भुवनेश्वर ओस पडलं असतं. गोलघुमटामुळे विजापूरचं महत्त्व. पंचमहाल नाही तर जयपूरमध्ये काय राहिलं. मीनाक्षीचं ते भव्य मंदिर बघायला तर मदुरेला गर्दी लोटते. आपल्याकडे ऐतिहासिक शिल्पित वास्तूबरोबरच देवळांचंही महत्त्व. चारीधाम यात्रा, बारा ज्योतिर्लिंग यात्रा, काशी ते रामेश्वर यात्रा असा प्रवास श्रद्धेच्या पोटीही चालतो.

अमेरिकेतली शहरं तशी सगळी सारखीच. प्रत्येक डाऊनटाऊनमध्ये त्याच त्या आकाशाला भेटायला निघालेल्या उंच इमारती, तशाच त्या शहराच्या मध्यावरून वाहणाऱ्या नद्या, तेच ते मॅकडॉनलचे हाम्बर्गर्स विकणारी सुबक उपाहारगृहं, त्याच आर्ट गॅलरीज आणि तीच सजवलेली आकर्षक दुकानं. पण तरीसुद्धा प्रत्येक शहराचं एखादं वैशिष्ट्य असतंच. जशा न्यूयॉर्कच्या जगातल्या सर्वात उंच इमारती म्हणून वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या जोड-इमारती, वॉशिंग्टनचं व्हाईट हाऊस, फिलाडेल्फियाची लांबचलांब चीर गेलेली प्रचंड घंटा, बॉस्टनचं शैक्षणिक वैभव, टोरांटोचा सीन टॉवर, शिकागोचा प्रचंड लेक मिशिगन, लॉस अँजेलिसचं हॉलिवूड, सॅनफ्रॅन्सिस्कोचा देखणा गोल्डन गेट ब्रिज, न्यू ऑर्लीन्सचा चोवीस मैलांचा लांबच लांब कॉजवे, डेट्रॉइटमधला फोर्ड मोटारचा कारखाना, तसा ह्यूस्टनचा नासा सेंटर.

अमेरिकेत सर्वात जर मी कुठे भारून गेले असेल तर या नासाच्या वस्तीत शिरताना. वस्ती म्हणायचं कारण, चांगल्या तीनचार एकर जमिनीवर मोठाल्या तीनचार इमारती आहेत. प्रशस्त हिरवीगार हिरवळ, अधूनमधून

देखणी तळी, त्या तळ्यात केलेली नक्षीदार वृक्षकांची लागवड. छोट्या कारंजासारख्या वाटोळ्या पाणथळीत रंगीत दगडगोट्यांची शोभा, हिरवळीतून कोनचौकोन साधून धावणाऱ्या पांढऱ्या शुभ्र फरशीच्या पायवाटा, मुख्य इमारतीची दिशा दाखवणारे जागोजाग लावलेले शोभिवंत बाण, बाहेर प्रवेशद्वारातच उभी केलेली चंद्रयानाची एक हुबेहूब प्रतिकृती आणि हे सगळं पाहात पाहात माणसाच्या अचाट बुद्धिमत्तेनं निर्माण केलेल्या यंत्र, तंत्र आणि मंत्र ज्ञानाची परिसीमा असलेल्या ह्या चंद्रयात्रेच्या इमारतीत शिरणारे आपण.

अच्छा. हीच ती इमारत तर. इथेच ह्या चांद्रवीरांना तीन वर्षं प्रशिक्षण दिलं जातं. कुठे आहे ते दालन. मग ती चिवचिवाट करणारी आपली मार्गदर्शिका आपल्याला ह्या प्रचंड दालनात नेते. इथे म्हणे हवेशिवायचं वातावरण तयार करतात. व्हॅक्युम्. त्यात मग त्या चांद्रवीरांना संत्रयीसाठी दिवसचे दिवस प्रशिक्षण देतात. उलटपालट, वरखाली, आडव्या-उभ्या अशा कोलांट्या मारणाऱ्या विमानातून त्यांना भ्रमण करायला लावतात. पोटातली आतडी छातीत आणि डोक्यातला मेंदू पायात अशा स्थितीचा अनुभव घ्यायला लावतात. अशी खूपशी शारीरिक आणि त्याहीपेक्षा अवघड कसोटीवर घासून मानसिक अशी तयारी झाल्यावर मगच त्यांना अपोलो सातमधून 'जा आता चंद्रावर' असा आदेश दिला जातो. त्याप्रमाणे एकाला धीर द्यायला दुसरा आणि दुसऱ्याच्या साथीला तिसरा असे तिघेजण त्या चांद्रयानात बसतात. बोजड पोषाख घालून, तोंडाला नळ्या लावून, डोक्यावर पृथ्वीचा भार घेऊन त्यांच्या विशिष्ट खाद्यपदार्थांची शिदोरी बरोबर घेऊन, हजारो देशबांधवांच्या उपस्थितीत, त्यांच्या शुभेच्छा घेऊन हे यान रॉकेटसकट अंतराळात उडतं.

"आणि हेच ते दालन बरं का?"

"कसलं दालन?"

"जेथून त्यांच्या सर्व पुढच्या प्रवासावर नियंत्रण ठेवलं जातं ते दालन."

"म्हणजे अंतराळातल्या त्यांच्या प्रवासावर?"

"होय ना. चांद्रवीर सारखे या दालनातल्या शास्त्रज्ञांना संदेश देत होते."

"शास्त्रज्ञ त्यांच्याशी बोलत होते. मधून मधून हास्यविनोद करीत होते."

"अच्छा! विनोद देखील. दाखल्यादाखल?"

"जशी पाण्यात, कमरेखालचा भाग मासोळीचा आणि वरचं अर्धं शरीर लावण्यवती स्त्रीचं अशी मत्स्यकन्या मिळते, तशी तुम्हाला एखादी चंद्रचारुगात्री मिळाली तर आमचीही आठवण ठेवा. असं पृथ्वीवरल्या शास्त्रज्ञांनी सांगितलं."

"कमाल आहे! शास्त्रज्ञांसारख्या रुक्ष पंडितांना चक्क विनोदाचं इंद्रिय? बरं, यावर चांद्रवीर काय म्हणाले?"

मार्गदर्शिका मिस्किल हसून सांगते, "ते म्हणाले, 'आम्ही तिला तिथूनच अर्धचंद्र देऊ आणि तुम्हाला बहाल करू!'"

"वाहवा! एवढे निःस्वार्थी तुम्ही कसे काय झालात?" शास्त्रज्ञ खालून विचारतात.

त्यावर चांद्रवीर जे बावट उत्तर देतात ते ऐकून पृथ्वीवरच्या शास्त्रज्ञांची हसून मुरकुंडी वळते. हो, पण उत्तर कोणतं?

मार्गदर्शिका पुन्हा खळीदार हसून म्हणते—

"उपयोग काय?"

"पण आम्हाला सांगा ना उत्तर. आम्ही काही अगदीच म्हणजे हे ऽ ऽ नाही काही."

त्यावर खो खो हंसत मार्गदर्शिका म्हणते—

"हो का? मग मी तर केव्हाच दिलं उत्तर!"

आणि मग ते चांद्रवीर चंद्रावर पोहोचले. त्यातले दोघे त्या चंद्रभूमीवर 'चल चल चंद्रा' करीत चालले, अमेरिकेचे अध्यक्ष त्यावेळी त्या चांद्रवीरांशी या, याच दालनातल्या टेलिफोनमधून बोलले. त्यांचे अभिनंदन केले.

अबब! या दालनामधून? चक्क चंद्रावरच्या त्या वीरांशी पृथ्वीवरचा माणूस बोलला? हो, हो! आणि दूरदर्शनच्या पडद्यावर हे पृथ्वीवरल्या लाखो माणसांनी पाहिलं. मी तर थक्क होऊन खिळूनच राहिले. त्या दालनात मला ते सगळे विलक्षण उत्तेजित झालेले शास्त्रज्ञ, त्यांचे मदतनीस, त्या धावपळ करणाऱ्या टंकलेखिका, खाजगी चिटणीस, त्या केवढ्या तरी दूरदर्शनच्या सेटसच्या पडद्यावर ते बोजड पोशाखात अवजड पावलं टाकीत चंद्रभूमीवर लहान बाळासारखी 'चाल् चाल्' करणारे चंद्रवीर, सगळं सगळं दिसायला लागलं.

माणूस या अजब प्राण्याची ही अजोड तांत्रिक भरारी पाहून मी याच मनुष्यजातीत जन्माला आल्याबद्दल भयंकर अभिमान वाटायला लागला. अहं ब्रह्माऽस्मि या सूत्रातल्या विश्वशक्तीच्या आणि माझ्या मनुष्यशक्तीच्या अद्वैताची जाणीव झाली. मानवी मनाच्या आभासात्मक मळ्याच कुंपण पार करून थेट अंतराळात भरारी मारलेल्या त्या चांद्रवीरांचं आणि माझं जिगीषेचं नातं एकच असल्याची खूण पटली. ही चंद्रगाथा जरी लिहिली गेली तिकडे, तरी ती वाचली सर्व जगाने. फक्त इच्छाशक्ती हवी. ती असली तर प्रयत्नांची पराकाष्ठा करून माणूस चंद्रावरही जातो तर. मंगळावरही जाईल. गुरूवरही जाईल. ह्यूस्टनमधल्या त्या ऐतिहासिक चंद्रदालनाकडे पाहता पाहता माझ्या मनातले सर्व प्रश्न सुटले. सर्व शंकांचं निरसन झालं. विश्व म्हणजेच ब्रह्म आणि ब्रह्म म्हणजेच मी अशी तेजाची खूण पटली. सगळी उत्तरं मिळाली.

फक्त तेवढं ते मार्गदर्शिकेनं, गालाला मिस्किल खळी पाडून दिलेलं उत्तर मात्र मी अजून शोधतेय...

♣ ♣ ♣

४६ ◇ बोल बाई बोल ग !

कुणी तरी बोलत राहावं आणि आपण ते ऐकत राहावं असं घडतं नेहमीच. पण हे बोलणं ऐकावं असं आपल्याला वाटतच नाही. कधी सौजन्यापोटी ते ऐकावं लागतं. कधी वडील आहेत, उलट कसं बोलायचं या संस्कारांच्या ओझ्यापायी ऐकून घ्यावं लागतं. कधी अधिकाराने ज्येष्ठ असल्यामुळे गप्प बसावं लागतं. कधी जागेवरून उठून बटण फिरवायचा कंटाळा येतो म्हणून रेडिओवरचं भाषण ऐकावं लागतं. कधी बोलणं बरं नसलं तरी बोलणारी दिसते बरी म्हणून टी. व्ही वरचं भाषण सहन करावं लागतं. कधी सोसायटीच्या चौकातल्या ध्वनिक्षेपकावर आपलं नियंत्रण नसल्यामुळे तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागतो आणि आता गेला महिना-पंधरवडा तर भाषणं नकोत पण आश्वासनं आवरा असं मनातल्या मनात बजावीत असंख्य राजकीय पुढाऱ्यांची भाषणं ऐकावी लागली.

अगदी सहज बोलणं-ऐकणंही खरोखरच झाडावर एखादं फूल उमलताना बघण्याइतकी सुंदर गोष्ट आहे. फार फार पूर्वी जेव्हा पुण्याच्या राजभवनाची नुकतीच पुणे युनिव्हर्सिटी झाली होती, त्यावेळी त्या मूळ भव्य इमारतीसमोर एक सुरेख बगीचा होता. संध्याकाळी अधनंमधनं आम्ही तिथे फिरायला जात असू. अशाच एका संध्याकाळी फिरता फिरता सफेत लिलीच्या फुलांची रोपं दिसली. लिलीचं फूल मला मुळातच आवडतं. चांदणीसारखं त्याचं रूप आणि सुंदरीच्या मोहक स्मितासारखा त्याचा मंद नाजुक सुगंध. ही लिलीची फुलं सूर्याला लाजतात. तो जातो असं कळलं म्हणजे ही उघडायला लागतात. तर अशी ती चैत्रातली एक रमणीय अशी संध्याकाळ होती. लिलीच्या ताट-ट्याच्या बाजूबाजूने आम्ही चार मैत्रिणी फिरत होतो. संगीतातल्या कोमल

सुरांसारखी सूर्याची कलती किरणं हळवी झाली होती. बागेमध्ये झाडांच्या पानांचा एक वास स्वयंभू होताच. त्यात आता उमलणाऱ्या फुलांचा सुवास मिसळून सुवासाची एक वेगळीच दुनिया बहरत होती. आमच्या बोलीगप्पा कधी थांबल्या आणि फुलापानांशी अबोली गप्पा कधी सुरू झाल्या ते आमचं आम्हालाच कळलं नाही. तिथे गुलबक्षी होती, मधुमालती होती, मोगरा-चमेली तर होतीच. शिवाय कर्दळी, गुलाब, कण्हेर सोनटाका सगळे सभासद मौजूद होते. सगळे वास एकमेकात मिसळले होते. रंगांच्या आणि वासांच्य या जादुई-चमनमध्ये हरवल्यासारख्या आम्ही हिंडत असतानाच, मखमालीच्या किड्याला स्पर्श केला असता तो जितका आवाज करील, तितका आवाज करीत लिलीच्या एका टपोऱ्या कळीनं आपल्या पाकळ्या उघडल्या. 'टप' असा इवलासा आवाज करून कळीची चांदणी झाली. आणि हे सगळं याचि डोळा आम्ही पाहिलं. मग आम्ही वेड्याच झालो. टपोरी कळी धुंडायची, तिच्या पुढ्यात जाऊन वाट पाहात बसायचं. बराच वेळ आम्हाला झुलवून 'टप' असा मखमाली आवाज करून ती आमच्यासमोर तिचा लावण्यसंभार खोलायची.

तेव्हापासून मला वाटतं बोलणं कसं लिलीच्या फुलाच्या सहज उमलण्या-सारखं सुंदर असावं. उमललेल्या त्या फुलाकडे कितीही वेळ पाहिलं तरी तृप्ती होत नाही. तसं बोलणं कितीही ऐकलं तरी आणखी ऐकावं असं वाटत राहिलं पाहिजे. त्या बोलण्यात जसा सहजपणा असावा, तसाच जिव्हाळाही असावा. विश्वास असावा. तसाच गोडवाही असावा. माहिती असावी. तशीच खेळीमेळीही असावी. आज आठवण व्हायचं कारण या निवडणुकीपायी अशी बरीच रूक्ष, कोरडी, कृत्रिम, लेखी भाषणं अलिकडे ऐकली. आणि नुकतीच परदेशात ऐकलेली काही टी. व्ही.वरची अशी राजकीय भाषणं आठवली. राजकीय विषय असूनसुद्धा तिथली माणसं फार सहजतेनं बोलतात. खुस-खुशीत, नर्मविनोद करीत, हसवणारे किस्से सांगत, तोंडाबरोबर डोळ्यांनीही गंमती करीत. गंमत कशी गमतीगमतीनं खुलवीत. कधी संपू नयेतशी वाटणारी भाषणं. राजकीय भाषणांची एवढी जादू तर तास-तासभर निखळ बोलून खिळवून ठेवणाऱ्या जॉनी कार्सनसारख्या शब्दसम्राटांची कथा काय सांगावी. गेली सतरा वर्षं हा जॉनी कार्सन बोलत राहिलाय आणि अमेरिकन प्रेक्षक-

श्रोते दुसरी सगळी कामं बाजूला ठेवून त्याचा टॉक-शो टी. व्ही. सेटला खिळून बघत राहिले आहेत. हा जॉनी कार्सन बोलतो, गातो, कविता म्हणतो, नकला करतो, बरोबर दोनचार सवंगडी घेऊन नाटुकली करतो, सुंदर पोरींचा हात हातात धरून भविष्य सांगतो, आघाडीच्या टेनिसपटूला बोलावून त्याची मुलाखत घेताना टेनिसविषयीचे इतके किस्से सांगतो की त्या टेनिसपटुबरोबर याचा ड्यूस होतो. त्याचे बॉल आणि याचे बोल. एखाद्या चाळिशीमधल्या चारुगात्रीशी बोलताना तिला तिच्या आईचं वय बहुधा पन्नास-पंचावन्न असावं असा तर्क लढवून तिला होणाऱ्या आनंदाच्या गुदगुल्या बघून प्रेक्षकांना एक छोटासा डोळा मारून 'कसं खुलवलं' याची पावती घेतो. कुणा वेटलिफ्टिंग चँपियनला बोलावून आपलीही दंडाची बेटकुळी कशी बलदंड आहे ते दाखवतो. त्या चँपियनच्या चेहऱ्यावरचं आश्चर्य बघतो आणि मग हळूच दंडावर लावलेलं प्लास्टिकचं खोटं आवरण काढून टाकून प्रेक्षकांशी मिष्किल हसतो.

असे अनेक जॉनी कार्सन आपल्याला अमेरिकेत भेटतात. रस्त्यात, लिफ्टमध्ये, सब-वेमध्ये, बसमध्ये, उंचउंच इमारतींच्या शिखरांच्या सौधामध्ये, विमानामध्ये, नाट्यगृहाच्या बारमध्ये, म्युझियममध्ये, बागेमध्ये. जिथे जावं तिथे सहज बोलतात. मनापासून बोलतात. माहीत असतं तेवढं सगळं मोकळेपणानं सांगतात. माहीत नसतं तेही प्रांजळपणानं कबूल करतात. पण बोलत राहातात. तुम्हाला बोलतं करतात. कॅनडामध्ये टोरांटोच्या बसमध्ये एक ऐंशी वर्षांची टुणटुणीत आणि चुणचुणीत म्हातारी मला भेटली. दोन तासांच्या आमच्या त्या सफरीत, किंग्स्टन युनिव्हर्सिटीमधून डिग्री घेतलेली ती बाई, काव्यशास्त्रविनोद करीत इतकं सुरेख बोलत होती की आमच्या वयातलं अंतर रस्त्यातल्या अंतरासारखेच क्षणाक्षणाला कमी होत राहिलं आणि मी मनात म्हणत राहिले,

बोल बाई बोल ग.
तुझ्या बोलाचं काय मानू मोल ग....

♣ ♣ ♣

४७ ◇ पडदा

लिहिताना उन्हाची तिरीप सारखी त्रास द्यायला लागली. रस्त्यावरून मोटार पळाली की तिच्या टपावरून प्रकाशाचा एक सरसरीत किरण निघायचा. नेमका माझ्या कागदावरून सरकायचा. म्हणून उठले आणि पडदा ओढला. म्हटलं आता कसलाही त्रास नाही. पडदा ओढलाय. आता बाहेरची दुनिया बंद. आता शांत चित्ताने लिहावं. पण चित्त तसं शांत होईना. त्या ओढलेल्या पडद्याकडे परत परत लक्ष जायला लागलं. वाटलं पडदा नसता तर ?

खरंच. पडदा नसता तर. पडदे के पीछे होणारं सगळं नाट्य खलास झालं असतं. तो मखमलीचा पडदा, त्याचा तो हार. आत रंगमंचावर चाललेली धावपळ, डायरेक्टरचा अर्धा झालेला जीव. पात्रांची दाढ्यामिशा लावताना उडालेली तारांबळ. अरे दुसरी घंटा झाली. चला घाई करा. पडदा उघडायची वेळ झाली. नांदीचे लोक कुठे आहेत. अरे त्या हडपची अर्धी मिशी गडप झालीय बघा. बर्वेबाईंचं झालं की नाही सर्व ? त्यांचं नऊवारी लुगडं. तरी सांगत होतो सारखा की तालमीला आठवडाभर सकच्छ नेसून या. शेवटी सगळी पात्रे जमली तर नेमका तबलजी गायब. मग ती आरडून ओरडून म्हटलेली नांदी. आणि शेवटचं पात्र आत जायच्या आधीच पडदेवाल्याने उघडलेला पडदा. त्या पळत आत जाणाऱ्या पात्राने काढलेली लांब जीभ.

चेहऱ्यावरून आणि अंगावरून ओढून घेतलेल्या पडद्याने तर कित्येक कथा-कादंबऱ्यांना मॅटर पुरवलंय. अंगावर बुरखा पांघरून आलेली कृत्तिका जर संशयकल्लोळात नसती तर नाटकाचा पडदा खूपच आधी पाडायला लागला असता. रहस्यकथांमध्ये तर बुरखाधारी व्यक्ती नेहमीच ऐन मोक्याच्या प्रसंगी

उपटते. बाईला हात कसा लावायचा म्हणून गुंडांच्या मनाची चलबिचल चाललेली असतानाच, त्या बुरख्यामधून एक केसाळ राकट हात बाहेर येतो आणि त्या हातात रोखलेलं पिस्तुल असतं !

कथा-कादंबरीत सुंदर फुलाफुलांचे पडदे आपल्या बेडरूमला लावीत असताना नायिकेची मनःस्थिती मोठी रोमँटिक असते. खिडकीच्या बाहेर रातराणी असते. तिची एकच फांदी खिडकीत रेंगाळत असते. खिडकीतून हिरव्या चाफ्याचंही झाड दिसत असतं. शेजारच्या अंगणात लावलेली पपई तिच्या कोरीव पानांनिशी खिडकीतून दिसत असते आणि नायिका खोलीच्या रंगसंगतीला खुलून दिसतील असे निळ्याजांभळ्या फुलापानांचे पडदे लावीत खिन्निल नजरेने नायकाचा विचार करीत असते.

चित्रपटात याच सिच्युएशनमध्ये नायिकेला एक मोठ्ठा बिझिनेस असतो. आधीच ध्वनिमुद्रित झालेल्या गाण्यासाठी ओठ हलविण्याचा, मग त्या पडद्याबरोबर ती कितीतरी लीला करते. कधी त्या पडद्यापाठीपागून, तिची नुसती कुंतलशोभाच दिसते. कधी छान लांब वाढवून, कातरून रंगवलेल्या लांबसडक नखांचा नाजूक हातच दिसतो. कधी फक्त एकाच कानातला लोलक, एकच डोळा. एकच भिवई आणि अर्धेच ओठ दिसतात. कधी काय तर कधी काय. हायहाय प्रेक्षकांची उत्सुकता वाढवणारी आयडिअल सिच्युएशन. केवळ एका पडद्यामुळे.

दुकानांच्या शोभेच्या, प्रशस्त काचेच्या शो-विंडोजचा पडदा ओढलेला असला की समजावं आत उभ्या केलेल्या लाकडी किंवा प्लॅस्टिकच्या मॉडेलच्या गोट्यावर केसांचा आकर्षक टोप घातला जातोय. साडीचोळी नेसवून, अलंकार मढवून त्या सांगाड्याचं एखाद्या लावण्यवतीत रूपांतर चाललंय.

मोटारीच्या पाठल्या काचेवरही लेसचे झुळझुळीत पडदे. खरं म्हणजे हे फायद्यापेक्षा तोटाच अधिक करतात. पडदा ओढलेला असला म्हणजे समोरच्या टांगत्या आरशातून पाठची वाहनं पाहणाऱ्या ड्रायव्हरला काही एक दिसू शकत नाही. अपघात व्हायची मीती तरी पडद्याची हौस.

एका खोलीचे दोन भाग करायला पडदा. अडगळीच्या वस्तू दिसू नयेत म्हणून पडदा. हे जंगल, हा राजवाडा, ही चाळ असं दाखवणारा नाटकातला रंगवलेला पडदा. खिडकीवर पडदा. दारावर पडदा. गॅस-सिलिंडर दिसू नये,


म्हणून स्वयंपाकघराच्या ओट्याला पडदा. हॉस्पिटलमध्ये जनरल वॉर्डमध्ये एखाद्या रोग्याला स्पंज करायचं असेल तर लाकडी चौकटीवरून, तात्पुरता ओढून त्या खाटेवरच्या रोग्यापुरती खाजगी खोली निर्माण करणारा पडदा. 'जुने जाऊ द्या मरणालागुनि' म्हणत जुन्या भांडणतंट्यावरून आपणच ओढून घेतलेला विस्मरणाचा पडदा. हळूहळू सरकत संपूर्ण चंद्रबिंब दाखवणारा ढगांचा पडदा. एकमेकांचं लग्नाच्या वेळीच सालंकृत सुभगदर्शन घडवण्याकरता ऐन मोक्याच्या वेळी, वधूवरांच्या मधोमध धरलेला अंतरपाटाचा पडदा. कळीचं उमलेलं फूल अकस्मात दिसावं म्हणून हिरव्या पानांनी धरलेला पडदा. सगळ जग अचानक गुलाबी दिसायला लावणाऱ्या यौवनाचा साक्षात्कार घडवण्याआधी त्या जागी असलेल्या निरागस बाल्याचा पडदा.

छे! पडदा पाहिजेच. ओढलेला पडदा उघडल्यानंतर जे अनपेक्षित अनुभवायला मिळतं त्याकरिता पडदा हवाच. हो. आणि पडदा उघडल्यावरच नाट्य असतं असं नाही. तर तो पाडल्यावरही एक अनुभूती येते. तो पडदा पडतो आणि आपल्या मनाचा पडदा उघडतो. पाहिलेल्या नाटकाबद्दल, वाचलेल्या पुस्तकाबद्दल, ऐकलेल्या गाण्याबद्दल आपलं मन आपल्याशी बोलू लागतं. मन कसं पॅराशूटच्या छत्रीसारखं असतं. पॅराशूट उघडलं तरच त्याचा उपयोग. तसंच मनाचा पडदा उघडलेलं खुलं मन आपल्याशी खूप गोष्टी करतं. जुन्यांची आठवण देतं, नव्यांची प्रेरणा देतं. सुखाचा शोध घेत दुःखावर फुकर घालतं. आशेला पालवतं. निराशेला मालवतं. स्वतः उमलतं आणि आपल्याही उजळवतं.

तर म्हणून पडदा हवाच. कधी ओढलेला तर कधी उघडलेला आणि हो, फार ताणलेल्या, जरा अधिकच लांबलेल्या एखाद्या प्रकरणावर पाडायला तर पडद्याचा फारच उपयोग होतो. जसा आता या माझ्या मनोगतावर पाडू या.



REFBK-0023290





संस्कृत विषयांत मुंबई विश्वविद्यालयाची एम्.ए. ची पदवी.
संगीताचा अनेक वर्षांचा व्यासंग.
सरकारी सांस्कृतिक शिष्यवृत्ती.
एकपात्री प्रयोगांच्या आद्यजनक.
सौभद्र, मानापमान व स्वयंवर या तीन नाटकांचे,
भारतांत आणि परदेशांत अडीचशेवर प्रयोग.
भगवग्दीतेची प्रदीर्घ ध्वनिमुद्रिका.
देशविदेशांत विपुल प्रवास.
सध्या मुंबई दूरदर्शनवर निर्माती.

अदाफुली

सुहासिनी
मुदगांवकर

हे पुस्तक अनेक
क्षणांचे, स्थळांचे आणि
मनांचे रंग एकत्र होऊन तयार झाले आहे.
प्रत्येक पानापानात
तुम्हाला संवेदना जाणवतील.
निर्माण झाली तरी आस्तित्व
ठेवणारी मने, भेटलेली माणसं,
आयुष्यभर फिरताना पावलं बांधून
ठेवणारी स्थळं आणि पुन्हा पुन्हा
डोकावसा वाटणारा
भूतकाळ झालेला क्षण.
सुहासिनी मुदगांवकरांनी स्वतःशीच
केलेला हा संवाद वाचून असं वाटतं की
आपणही आपल्यात फिरून एकदा
डोकावून पहावयास हवं ।।

श्री विद्यारंभ प्रकाशन